# महिला आणि त्यांचे कायदेविषयक अधिकार






लेखक

**डॉ. संभाजी संतोष पाटील**

सहाय्यक प्राध्यापक

श्री.शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब ना.स.पाटील साहित्त्य

व मु.फि.मु.अ.वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे.

**Kripa Drishti Publications, Pune.**

# महिला आणि त्यांचे कायदेविषयक अधिकार


**डॉ. संभाजी संतोष पाटील**

सहाय्यक प्राध्यापक
श्री शि. वि. प्र. संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य
व मु. फि. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे.



**Kripa-Drishti Publications, Pune.**

Book Title: **महिला आणि त्यांचे कायदेविषयक अधिकार**

Author by: **डॉ. संभाजी संतोष पाटील**

1st Edition

ISBN: 978-93-90847-09-9

Published: **Oct 2021**

**Publisher:**

**Kripa-Drishti Publications**
A/ 503, Poorva Height, SNO 148/1A/1/1A,
Sus Road, Pashan- 411021, Pune, Maharashtra, India.
Mob: +91-8007068686
Email: editor@kdpublications.in
Web: https://www.kdpublications.in

© **Copyright KRIPA-DRISHTI PUBLICATIONS**
All Rights Reserved. No part of this publication can be stored in any retrieval system or reproduced in any form or by any means without the prior written permission of the publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

# मनोगत

पुर्वी महिलांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते. चार भिंतीच्या बाहेर त्या जाऊ शकत नव्हत्या. पुरुषप्रधान वर्चस्वामुळे त्यांना दुय्यम स्वरुपाचे स्थान देण्यात येत होते. स्त्री-पुरुष समानता नव्हती. महिला सक्षमीकरणासाठी न्या. रानडे, आगरकर, राजा राममोहन रॉय यांनी फार मोठे योगदान दिले आहे. तसेच समाजातील महिला सक्षम होण्यासाठी महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मुलींसाठी शाळा सुरु केल्यात. महिला शिकल्यामुळे त्या स्वावलंबी होत आहेत. विविध क्षेत्रामध्ये त्या नैपुण्य प्राप्त करीत आहेत. हे करीत असतांना त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. भारतीय संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ असल्यामुळे महिला सक्षम होणे गरजेचे आहे. भारतीय राज्यघटनेत महिलांसाठी विविध कायदे करण्यात आले आहेत. तसेच महिला सबलीकरणासाठी शासनाकडून ज्या विविध उपाययोजना केल्या जात आहेत त्यांची माहिती प्रस्तुत ग्रंथामध्ये करण्यात आली असुन मानवी हक्क, महिलांचे घटनात्मक व कायदेविषयक अधिकार, अल्पबचत योजनेद्वारा महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकास, पंचायतराज व ग्रामीण विकास, धर्मनिरपेक्षता आणि भारतीय लोकशाहीची पायाभरणी व ब्रिटीश कालीन कायदे यांची मांडणी या ग्रंथात करण्यात आली आहे. या ग्रंथाच्या लेखन कार्यास मला अनेक मित्र व हितचिंतकांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो. माझ्या लेखन कार्यास माझे गुरुवर्य अप्पासाहेब प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे यांची प्रेरणा लाभली आहे. श्री. शि.वि.प्र. संस्थेचे अध्यक्ष आमदार बाबासो श्री. कुणाल पाटील, उपाध्यक्ष डॉ. संजय पाटील, शिंदखेडा महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री. प्रफुल्लकुमार सिसोदे, उपाध्यक्ष श्री. अशोक पाटील, प्रशासकीय अधिकारी श्री. प्रमोद पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहरराव पाटील, डॉ. सुधीर पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य

डॉ. मोहन पावरा, प्राचार्य डॉ. एस.टी सोनवणे, एन. मुक्टोचे मा. अध्यक्ष प्रा.डॉ. संजय सोनवणे, प्राचार्य डॉ. एम.व्ही. पाटील, प्राचार्य सी.व्ही. पाटील, ज्येष्ठ प्रा. डॉ. पी.यु. नेरपगार, प्रा. ए.डी. पाटील, प्राचार्य डॉ. एम.एच. शिंदे, प्राचार्य डॉ. अशोक खौरनार, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, प्राचार्य डॉ. बी.आर. चौधरी, प्रा.वाय.एन. साळुंके, प्रोफेसर डॉ. सुरेंद्र मोरे, उपप्राचार्य डॉ. एस.व्ही. बोरसे, प्रा. ए.आर. पाटील, प्रा. के.व्ही. महाले, प्रा. शशीकांत बोरसे, डॉ. रवि वाघ, केंद्रीय एन. मुक्टोचे सचिव डॉ. जितेंद्र तलवारे, प्रा. डॉ. एस.के. जाधव प्रा. डॉ. दिपक पाटील तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाज्यांचे सहकार्य लाभले.

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्ष, विचारमंथन संशोधन पत्रीकेचे संपादक प्राचार्य डॉ. प्रमोद पवार यांचे मोलाचे सहकार्य व अनमोल मार्गदर्शन मिळाल्याने मी हा ग्रंथ आपल्या हाती देत आहे. कौटुंबीक परिवारातून आई सौ. जयवंताबाई संतोष शिंदे, वडील अण्णासो. श्री. संतोष नथु शिंदे, पत्नी सौ. संगिता पाटील, मुलगी कु. दिव्या, मुलगा चि. नीलवर्ण यांच्या सहकार्यामुळे लिखाणाचे काम पुर्णत्वाला आले. प्रस्तुत ग्रंथाचे टायपिंग व मुद्रणदोष तपासणी कार्य करणारे डॉ. दिपक विश्वासराव पाटील (कलाविश्व कॉम्प्युटर्स, सौंदाणे) यांचे मनापासुन आभार. प्रस्तुत ग्रंथ प्रकाशीत करण्याची जबाबदारी उचलणारे **कृपा दृष्टि** पब्लीकेशनचे संचालक यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो.


**डॉ. संभाजी संतोष पाटील**

सहाय्यक प्राध्यापक

श्री शि. वि. प्र. संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य

व मु. फि. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे.

## समर्पित

आदरणीय गुरुवर्य

प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद

# INDEX

**प्रकरण 1: धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव एक दृष्टीक्षेप**......................................................1

1.1 'धर्मनिरपेक्ष' या संकल्पनेत पुढील गोष्टीचा समावेश होतो: ..................................................2
1.2 भारतीय संविधानातील धर्माचे स्थान: ......................................................................5

**प्रकरण 2: जागतिकीकरण आणि भारत**.................................................................8

2.1 प्रस्तावना:..........................................................................................8
2.2 जागतिकीकरणाचा अर्थ: ..........................................................................8

**प्रकरण 3: मानवी हक्क सामाजिक न्यायाची वास्तवता**......................................................18

3.1 मानवी हक्क आयोगाची भूमिका व कार्यपध्दती:..............................................................18

**प्रकरण 4: मानवी हक्क**..................................................................................29

4.1 प्रस्तावना:..........................................................................................29

**प्रकरण 5: भारतीय लोकशाहीची पायाभरणी आणि ब्रिटीशकालीन कायदे**.......................36

5.1 प्रस्तावना:..........................................................................................36

**प्रकरण-6: भारतीय लोकशाहीतील महिलांचे सबलीकरण** ...............................................47

6.1 प्रस्तावना:..........................................................................................47

**प्रकरण - 7: अल्पबचतगट योजनेद्वारा महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण**..........52

7.1 प्रस्तावना:..........................................................................................52

**प्रकरण 8: महिला सक्षमीकरण आणि त्यांचे घटनात्मक व कायदेविषयक अधिकार ........ 65**

8.1 प्रस्तावना:..........................................................................................65
8.2 विषयाचे महत्व:....................................................................................66
8.3 शोधनिबंधाचा उद्देश: ..............................................................................67

8.4 संशोधन पध्दत: ........ 67
8.5 महिला सक्षमीकरण: ........ 68
8.6 महिला सक्षमीकरणासाठी साधने: ........ 70
8.7 महिला सक्षमीकरणासाठी साधने: ........ 72
8.7.1 साक्षरता: ........ 72
8.7.2 आर्थिक स्वावलंबन: ........ 73
8.7.3 राजकीय प्रक्रियेतील सहभाग: ........ 74
8.7.4 प्रसारमाध्यमे: ........ 75
8.7.5 दबावगट: ........ 76
8.7.6 महिला कल्याणासाठीचे कायदे: ........ 76

**प्रकरण 9: स्वयंसहाय्यता बचतगट आणि महिला सक्षमीकरण ........ 80**

9.1 प्रस्तावना: ........ 80
9.2 विषयाची ओळख: ........ 81
9.3 विषयाचे महत्व: ........ 81
9.4 अध्ययन उद्देश: ........ 82
9.5 उद्दिष्टे: ........ 82
9.6 संशोधनाची गृहितके: ........ 83
9.7 महिला सबलीकरणाचा अर्थ: ........ 83
9.8 महिला सबलीकरणाची उद्दिष्टे: ........ 84
9.9 महिला बचत गटाचे फायदे: ........ 87
9.10 अल्पबचत गटांपुढील अडचणी: ........ 88
9.11 महिला सक्षमीकरणासाठी शासनाचे प्रयत्न: ........ 88
9.12 महिलांच्या विकासासाठी भारत सरकारने ठरविलेले धोरण: ........ 89
9.13 मुल्यमापन: ........ 89

**प्रकरण 10: पंचायत राज आणि ग्रामीण विकास ........ 91**

10.1 73 वी घटना दुरुस्तीचे प्रमुख उद्देश पुढील प्रमाणे - ........ 92
10.2 पंचायतराज व्यवस्थेला अधिक सक्रिय बनविण्यासाठी पुढील गोष्टी महत्वाच्या आहेत - ..... 93
10.3 पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आल्यानंतर झालेला बदल - ........ 93
10.4 निष्कर्ष: ........ 94

**प्रकरण 11: मुलभूत हक्क आणि भारतीय संविधान .................................................. 95**

11.1 प्रास्ताविक:.......................................................................................95
11.2 शोधनिबंधाचा उद्देश: ..............................................................................96
11.3 संशोधन पध्दत: .....................................................................................96
11.5 गृहितके: ..............................................................................................97
11.6 विषयाचे महत्व:.....................................................................................97
11.7 भारतीय मुलभूत हक्कांचा इतिहास:.............................................................98
11.8 मुलभूत हक्कांचा अर्थ: .............................................................................98
    11.8.1 समतेचा हक्क:................................................................................ 100
    11.8.2 स्वातंत्र्याचा हक्क:............................................................................ 104
    11.8.3 शोषणाविरुध्दचा हक्क:....................................................................... 105
    11.8.4 धर्म स्वातंत्र्याचा हक्क:....................................................................... 106
    11.8.5 शिक्षण आणि संस्कृतीचा हक्क:............................................................. 107
    11.8.6 घटनात्मक उपाययोजनेचा हक्क:........................................................... 107

**प्रकरण 12: अनुसुचित जाती-जमातीसाठी कायदे एक विश्लेषणात्मक अभ्यास ........... 110**

12.1 अनुसुचित जाती आणि भारतीय संविधान:.................................................. 112
12.2 सरकारी सोई सवलती: ........................................................................... 113
12.3 आदिवासींच्या संदर्भात संविधानातील तरतुदी:.............................................. 114
12.4 आदिवासी उपयोजना: ........................................................................... 116
12.5 अनुसुचित जाती जमातींसाठी संविधानातील तरतूद व कायदे: .................................... 116

**प्रकरण 13: भारतीय राज्यघटनेचा सरनामा एक विश्लेषणात्मक अभ्यास ................... 120**

13.1 प्रस्तावना:.......................................................................................... 120
13.2 शोधनिबंधाचा उद्देश: ............................................................................ 120
13.3 शोधनिबंधांची उद्दिष्टे:............................................................................ 121
13.4 विषयाचे महत्व:.................................................................................... 121
13.5 सरनाम्याचे आधारभूत तत्वे:..................................................................... 124
13.6 मूल्यमापन: ......................................................................................... 131

**प्रकरण 14: महिला सबलीकरण आणि कायदे ......................................................... 133**

14.1 प्रस्तावना:.......................................................................................... 133
14.2 शोधनिबंधाचा उद्देश: ............................................................................ 134

14.3 संशोधन पध्दत: ........ 134
14.4 संशोधनाची उद्दिष्टे: ........ 134
14.5 गृहितके: ........ 135
14.6 विषयाचे महत्व: ........ 135
14.7 महिला सबलीकरण म्हणजे काय?: ........ 136
14.8 भारतात महिला सक्षमीकरणाची गरज का भासत आहेत त्याची काही कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील: ........ 140
14.9 निष्कर्ष: ........ 145

**प्रकरण 15: स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण ........ 146**

15.1 प्रस्तावना: ........ 146
15.2 विषयाची ओळख: ........ 147
15.3 विषयाचे महत्व: ........ 148
15.4 संशोधन पध्दती: ........ 148
15.5 अध्ययन उद्देश: ........ 149
15.6 लघुशोध निबंधाची उद्दिष्टे: ........ 149
15.7 संशोधनाची गृहितके: ........ 149
15.8 स्वयंसहाय्यता अल्पबचत गटासमोरील अडचणी: ........ 151
15.9 मूल्यमापन: ........ 151
15.10 संदर्भ सूची: ........ 152

ISBN: 978-93-90847-09-9

# प्रकरण 1

# धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव एक दृष्टीक्षेप

'धर्मनिरपेक्षता' या मराठी शब्दासाठी इंग्रजीत Secular हा शब्द वापरण्यात येतो. मात्र 'Secular' या शब्दाचा अर्थ 'ऐहिक' किंवा 'जे पारलौकीक नाही ते' असा आहे. ऐहिक म्हणजे इहलोकीचे किंवा पृथ्वीतलावरील जीवन होय. याउलट पारलौकीक म्हणजे मृत्युनंतरचे जीवन होय. तेसच पाप-पुण्याबाबतचे विचार किंवा पारलौकीक जीवनाबाबत धर्मगुरुंचे नियंत्रण असावे. परंतु जे ऐहिक जीवन आहे त्याबाबत धर्मगुरुंचे नियंत्रण नसावे. व्यक्तीच्या ऐहिक जीवनातील वर्तनावर धर्मगुरुंना नियंत्रण ठेवता येणार नाही. ऐहिक बाबतीत धर्मगुरुंचे नियंत्रण असता कामा नये असा दृष्टीकोन पाश्चात्य समाजात स्विकारला गेला. धर्मगुरुंनी धर्म म्हणजे काय ते सांगावे. त्यांनी ऐहिक बाबतीत हस्तक्षेप करु नये असा धर्मनिरपेक्ष शब्दाचा अर्थ घेतला जातो. धर्मनिरेपक्ष राज्य म्हणजे राज्याचा कोणताही अधिकृत धर्म नसणे ह्या अर्थाने वापरला जातो. धर्मनिरपेक्षतेमध्ये धर्म व राज्य यांची फारकत झालेली असते.

ज्या देशात विविध धर्माचे लोक राहतात अशा देशात कोणताही एखादा धर्म राज्याचाधर्म म्हणून ठरविला जाऊ नये असा धर्मनिरपेक्षता या शब्दाचा अर्थ आहे. विभिन्न धर्म असणाऱ्या देशात धर्मनिरपेक्षतेचा स्विकार करणे आवश्यक आहे. प्राचिन इतिहासात धर्मसत्ता व राजसत्ता ह्या एकाच व्यक्तीकडे होत्या. धर्मगुरुकडेच राजसत्ता होती. म्हणजेच राजा धार्मिक बाबतीत मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप करु शकत होता. कारण दोन्ही सत्तांचे केंद्रीकरण एकाच व्यक्तीकडे होते. नंतर धर्मसत्ता व राजसत्ता यात संघर्ष निर्माण झाला. त्यातून

धर्मसत्ता व राजसत्ता यांचे अलगीकरणाच्या प्रक्रियेतून "धर्मनिरपेक्षता" या संकल्पनेचा उदय झाला.

## 1.1 'धर्मनिरपेक्ष' या संकल्पनेत पुढील गोष्टीचा समावेश होतो:

अ) कोणतेही राजकीय पद राज्यसंस्थेने कोणत्याही धर्माच्या व्यक्तीसाठी राखून ठेवता कामा नये.

आ) राज्यसंस्थेने आपल्या देशात कोणत्याही एका धर्मास विशेष दर्जा देऊ नये.

इ) ऐहिक बाबींमध्ये सर्व व्यक्तींना सारखीच वागणूक असावी.

ई) राजसंस्थेकडूनच सर्व निर्णय घेतले पाहिजेत. राज्यसंस्थेच्या निर्णयात धर्मसंस्थेने हस्तक्षेप करु नये.

उ) व्यक्तीला धर्माचे पालन करण्याचे, त्या धर्मात सांगितल्याप्रमाणे पूजा-अर्चा, उपासना, श्रध्दा बाळगणे याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. तसेच एखाद्या व्यक्तीला कोणत्याच धर्माचे पालन करावयाचे नसेल तर त्या व्यक्तीला तसे करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते.

"धर्मनिरपेक्षता" यात राज्याचा अधिकृत कोणताही धर्म नसावा ह्या विचाराला महत्व आहे. तसेच राज्यात सर्व लोकांना समान स्वरुपाची वागणूक असावी हा विचार महत्वाचा आहे. कोणत्याही व्यक्तीस धर्म, वंश, जात इत्यादींमध्ये भेदभाव करुन वागणूक दिली जाऊ नये हा विचार धर्मनिरपेक्षता या संकल्पनेत महत्वाचा आहे. राज्यसंस्थेने कोणत्याही धर्मास दुय्यम स्थान देऊ नये. राज्यातील सर्व धर्मांना सारखीच वागणूक द्यावी हे अभिप्रेत असते. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील धर्माचे स्थान व त्या व्यक्तीच्या दृष्टीकोनातून ऐहिक व पारलौकिक क्षेत्राचे असणारे परस्पर संबंध ह्याबाबतचे तिचे विचार हे पूर्णत: तिचे खाजगी विचार आहेत यालाच धर्मनिरपेक्ष राज्यामध्ये प्राधान्य दिलेले असते. स्वातंत्र्यपूर्व काळात भारत हा देश धर्मनिरपेक्ष असावा की

धर्माधिष्ठीत असावा हा विचार विकसीत झाला होता. त्यामुळे भारतीय संविधान तयार करतांना धर्मनिरपेक्षता व धर्म स्वातंत्र्य यांचा समावेश होणे स्वाभाविक होते. त्यामुळेच समतेचा हक्क, धर्मस्वातंत्र्य, शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार यात धर्मनिरपेक्षतेचा अंतर्भाव केला गेला. प्रत्यक्ष धर्मनिरपेक्षता ह्या शब्दाचा समावेश संविधानात करण्यात आलेला नव्हता तरी तरतूदींमध्ये धर्मनिरपेक्षता अंतर्भूत करण्यात आली. भारतात अनेक धर्म आहेत. धर्मसत्ता व राजसत्ता वेगळी करुन भारतातील प्रश्न मिटणार नाहीत.
एकाच धर्मात वेगवेगळ्या ठिकाणी भिन्नता दिसून येते. उदा. गोव्यातील ख्रिश्चन, केरळ महाराष्ट्रातील ख्रिश्चन यांच्यात फरक आढळून येतो. त्या सर्वांच्या चालीरिती, रुढी, परंपरा भिन्न आहेत. त्यासाठी धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव असणे महत्वाचे आहे.
इंग्रजांच्या काळात हिंदु-मुसलमान हा संघर्ष धर्मनिरपेक्षतेसाठी एक महत्वाचा मुद्दा बनला. स्वातंत्र्य पूर्वकाळात 1909 च्या मार्लेमिंटो कायद्याला महत्व मिळाले. कारण त्यानुसार मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाले. त्यातून स्वतंत्र राष्ट्र मिळावे अशी मागणी करण्यात इंग्रजांना प्रोत्साहन मिळाले.

स्वातंत्र्यपूर्वकाळात हिंदु जसे संघटीत होते तसेच मुसलमान देखील संघटीत होते. हिंदु महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा हिंदू संघटना निर्माण झाल्या. महात्मा गांधी, पंडीत जवाहरला नेहरु, मौलाना अबुल कलाम आझाद यांनी धार्मिक सलोखा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. मुस्लीम लिगने स्वतंत्र राष्ट्राची मागणी केली तरीदेखील महात्मा गांधी यांनी हिंदु-मुस्लीम ऐक्यासाठी प्रयत्न सुरुच ठेवले.

महात्मा गांधी हे कोणत्याच धर्माच्या विरोधी नव्हते. प्रत्येकाने आपआपला धर्म पाळावा अशा मताचे ते होते. सर्व धर्मांना सारखीच वागणूक मिळावी, धार्मिक सलोखा असावा, सर्वधर्मसमभाव असावा असे मत गांधीजींनी

वेळोवेळी मांडले आहे. त्यांची धर्माची कल्पना हिंदु-मुस्लीम, ख्रिश्चन या धर्माच्या पलीकडे आहे. गांधीजींवर गोखल्यांचा प्रभाव होता.

'जर हिदुंत्वावादी विचारांमुळे मुस्लीम लोकांवर अन्याय होत असेल तर तर मी हिंदु नाही असे' विधान गोखल्यांनी केले होते. त्यांचा गांधीजीवर प्रभाव होता. सर्व धर्मांचा अभ्यास केल्यानंतर सर्व धर्मांमध्ये काही समान तत्वे असतात हा विचार गांधीजींनी मांडला. प्रत्येक धर्म प्रेम व अहिंसा यांचा पुरस्कार करतो. त्यामुळे सर्व धर्म सारखेच असतात असे त्यांनी म्हटले आहे. भारत हा देश स्वतंत्र झाल्यानंतर ते हिंदुराष्ट्र असणार नाही. कोणत्याही एका धर्माचे राज्य न राहता ते सर्व धर्मियांचे राष्ट्र असेल. तेथे धर्माच्या बाबतीत भेदभाव नसतील. सर्व धर्माचे लोक एकत्र येऊन राज्यकारभार करतील.

निवडणुक लढवितांना धर्म हा निकष असणार नाही तर व्यक्तीचे कार्य व तिची गुणवत्ता यावर आधारित निवडणूक झालेली असेल. म्हणजेच धर्म हि व्यक्तिची खाजगी बाब आहे. त्यास राजकारणात अजिबात स्थान असणार नाही. राजकारण हे संप्रदायापासुन अलीप्त असावे अशी कल्पना गांधीजींनी मांडली.

मौलाना आझाद स्वतः सश्रध्द असले तरी धर्माच्या अध्यात्मीक अंगापेक्षा योग्य आचरणाची प्रेरणा देण्याच्या क्षमतेवर त्यांनी भर दिला. धर्म हा उलेमांचा प्रांत आहे असे मानून धर्मापासुन लांब राहणाऱ्या पुढारलेल्या मुस्लीमांना जागृत करण्यासाठी त्यांनी आवाहन केले. भारत पाक फळणीस त्यांचा विरोध होता. धर्माच्या आधारावर एक स्वतंत्र राष्ट्र अस्तीत्वात यावे हि कल्पना त्यांना मान्य नव्हती. फाळणी हि मुसलमानांसाठी देखील घातक आहे असे मत त्यांनी मांडले.

धर्माच्या आधारावर वेगळे राष्ट्र उभे करणे म्हणजे भारतीय इतिहासापासून लांब जाण्यासारखे आहे हे मत त्यांनी माडले. धर्मनिरपेक्षतेमुळे भारतातील मुसलमान सुरक्षित राहु शकतात. त्यामुळे येथील मुसलमानानी भीती बाळगू नये. मुसलमानांसारखेच येथे इतर अनेक धर्माचे लोक देखील आहेत. त्यांच्या सहवासात मुसलमान सुखाने राहु शकतात असे त्यांनी स्पष्ट केले.

## 1.2 भारतीय संविधानातील धर्माचे स्थान:

भारताच्या संविधान समितीत हिंदु, मुस्लीम, शिख, ईसाई अशा अनेक धर्माच्या लोकांना प्रतिनिधीत्व देण्यात आले. मुसलमानांसाठी राखून ठेवलेल्या सर्व जागा मुस्लीम लिगला होत्या. अशारितीने संविधान समितीने कामकाजाला सुरुवात केली होती. पण जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा फाळणी झाली. तेव्हा संविधान समितीतून पाकीस्थानमध्ये गेलेल्या भागांचे प्रतिनिधीत्व वगळले गेले. धर्म हा घटक सामाजिक जीवनात अत्यंत महत्वाचा असतो.

त्यामुळे जरी धार्मिक क्षेत्रात राज्याने हस्तक्षेप करु नये असे म्हटलेले असले तरी देखील भारतात वर्षानुवर्ष चालणाऱ्या रुढी परंपरा, चालीरिती फारच हानीकारक होत्या. त्यासाठी शासनाला वेळोवेळी धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करावा लागला. उदा. सतीबंदी, अस्पृशांना मंदिरात प्रवेश, जेव्हा जेव्हा शासनाने धर्मात हस्तक्षेप केला तेव्हा शासन विरुध्द नागरिक असे संघर्ष झाले. धर्मनिरपेक्षता असेल तरच भारतीय नागरीक सुखा-समाधानाने राहु शकतील हे लक्षात घेवून घटनाकर्त्यांनी धर्मस्वातंत्र्याच्या तरतुदींचा संविधानात समावेश केला.

धर्मविषयक स्वातंत्र्याचा अंतर्भाव भारतीय संविधानात करतांना समितीत बरीच चर्चा झाली. डॉ. आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने धर्मस्वातंत्र्याचा आराखडा आधीच तयार केलेला होता. संविधान समितीतील इतर सदस्यांनी डॉ. आंबेडकरांना शंका विचारल्या त्या शंकांचे निरसन केल्यानंतरच त्या तरतुदी संविधानात समाविष्ट करण्यात आल्या. शासनाने कोणताही धर्म हा राज्याचा अधिकृत धर्म असणार नाही, सर्व धर्मांना समान वागणुक हे तत्व भारतीय संविधानात मांडण्यात आले. भारत हे धर्माधिष्ठीत राज्य नाही हे दाखवून दिलेले आहे. पण 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द भारतीय संविधानात नाही अशी परिस्थिती एकेकाळी होती. भारतात हिंदु व मुसलमान यांच्यातील संघर्षाचे प्रमाण कमी व्हावे, धार्मिक अल्पसंख्याकांना भारतात रहावे असे वाटावे, आपल्या अधिकाराविषयी खात्री वाटावी यासाठी धर्मनिरपेक्षता या शब्दाला महत्व दिले गेले. व भारताच्या सरनाम्यात 42 व्या घटना दुरुस्तीने 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द टाकण्यात आला. भारतात 1980 नंतरच्या काळात सर्वच धार्मिक समुहामध्ये जमातवादी राजकारण करणाऱ्या गटांचे महत्व वाढलेले दिसून येते. त्यातून राजकारणातील स्पर्धेबरोबरच धार्मिक दंगलीचे प्रमाण वाढले, जमातवादातून होणाऱ्या दंग्यांमध्ये मुख्यत: दुर्बल आर्थिक गटातील लोक भरडले जातात.त्यांचे व्यवसाय, रोजंदारी यांचे नुकसान होते.

जमातवादी दंग्यांमध्ये सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान व नासधूस होते. त्याखेरीज समाजातील सहिष्णू वृत्ती कमी होते. असुरक्षितता वाढते, अविश्वास वाढतो. या सर्व दृष्टचक्रातून भारतीय समाज व्यवस्थेस वाचविण्यासाठी एकमेव पर्याय म्हणजे धर्मनिरपेक्षवादी तत्वांचा अंगिकार करणे गरजेचे आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर मात्र अल्पसंख्यांकांना सुरक्षित वाटावे हि प्राथमिक गरज होती. त्यामुळे राज्यघटनेमध्ये धर्मनिरपेक्षता असणे अपरिहार्य बनले.

त्यामुळे घटना समितीने धर्मस्वातंत्र्य व धर्मनिरपेक्षता या दोन गोष्टी राज्यघटनेत मांडल्या. भारत स्वतंत्र झाल्याच्या सुरुवातीच्या काळात जमातवादी राजकारणाचा फारसा प्रभाव नसला तरी धार्मिक मुलतत्ववाद व जमातवाद या घटकामुळे भारतात अस्थिरता निर्माण झाली आहे. ह्यामुळे भारतीय लोकशाहीस धोका निर्माण झाला आहे.

*ISBN: 978-93-90847-09-9*

# प्रकरण 2

# जागतिकीकरण आणि भारत

## 2.1 प्रस्तावना:

1970 पासुन जगातील बहुतेक राष्ट्रांनी आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम हाती घेतलेला दिसून येतो. जगात आर्थिक सुधारणांची सुरुवात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रिगन व इंग्लंडच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांनी केली. त्यानंतर लोकसंख्येने जगात सर्वात मोठा देश असलेला चीन या देशाने आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम हाती घेतला. या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण आणि बाजारीकरण हि आर्थिक सुधारणांची प्रमुख साधने आहेत.

भारताची अर्थव्यवस्था आज जागतीक अर्थव्यवस्थेचा एक भाग झालेली आहे. गेल्या काही वर्षांपासून भारतीय अर्थव्यवस्था जागतीक अर्थव्यवस्थांशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. भारतात 1991 पासून आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

## 2.2 जागतिकीकरणाचा अर्थ:

स्टिग्लिटझ यांच्या मतानुसार "जागतिकीकरण हे एक जगातील विविध देश आणि नागरिक यांचा घनिष्ठ समन्वय आहे. जे वाहतूक आणि दळणवळण साधनांच्या खर्चातील कपातीमुळे घडून आले आहे. याचा परिणाम म्हणून वस्तु व सेवांच्या प्रवाहातील कृत्रिम अडथळे समाप्त झाले आणि सीमांवरुन लोकांचे येणे-जाणे वाढले." प्रा. दिपक नय्यर यांच्या मते "देशाच्या राजकीय

आणि भौगोलिक सीमा रेषा ओलांडून केले जाणारे आर्थिक व्यवहार म्हणजे जागतिकीकरण होय."

दिपक नय्यर यांच्या मते जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक व्यवहारांचे सखोल एकात्मिकरण होते, आर्थिक खुलेपणा वाढतो, अर्थव्यवस्थांचे परस्परावलंबन वाढते. जागतिकीकरणात आर्थिक व्यवहारांबरोबर आर्थिक संघटनेचेही जागतिकीकरण होते. यावरुन असे दिसून येते की, जागतिकीकरण हि एकरुपता आणि समरुपतेची अशी प्रक्रिया आहे की, ज्यात संपूर्ण जग आकुंचित होते. भांडवलशाही आणि समाजवादी अर्थव्यवस्थांचे एकमेकांमध्ये रुपांतरण होते.

भांडवल, सेवा, वस्तु, कामगार, तंत्रज्ञान इत्यादी देशाच्या सीमारेषा ओलांडून दुसऱ्या देशात जातात. याच्यावर शासनाचे कोणत्याही स्वरुपाचे नियंत्रण नसते. सर्व प्रवाह हे मुक्त स्वरुपाचे असतात.

जागतिक व्यापार संघटना स्थापन झाल्यानंतर भारतही त्यात सामील असल्याने जागतिक मुक्त व्यापाराचे भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम व दुष्परिणाम झाले याचाही अभ्यास करणे उपयुक्त आहे. भारताविषयी सांगावयाचे झाल्यास जागतिकीकरण करण्यासाठी पुढील गोष्टींची पुर्तता करणे आवश्यक राहील.

1.आयातीवरील बंधने सौल करणे.
2.निर्यात वाढीसाठी प्रोत्साहन देण्याऐवजी विनीमय दरात सुधारणा करणे.
3.भारतातील कंपन्या परकीय कंपन्यांसोबत सहयोग करायला (Collaboration Agreement) परवानगी.
4.परदेशात गुंतवणूक करण्यास भारतातील कंपन्यांना परवानगी इत्यादी.

5.निर्यात वाढीसाठी प्रोत्साहन देण्याऐवजी विनीमय दरात सुधारणा

1991 च्या आर्थिक सुधारणांनी भारतीय अर्थव्यवस्थेची जोड जागतिक अर्थकारणाशी घालण्यात आली. 1989 ते 91 पर्यंत भारतात अल्पमताचे सरकार होते.

त्यामुळे आर्थिक प्रश्न सुटु शकले नाहीत व शेवटी सरकारकडील सोने गहाण ठेवण्याची पाळी पंतप्रधान चंद्रशेखर यांच्यावर आली. त्यावेळी भारतीय अर्थव्यवस्था डबघाईस आली होती. प्रामुख्याने परकीय व्यापाराच्या क्षेत्रात तर भारताची परिस्थिती नामुष्कीची होती. आखाती युध्दाने पेट्रोल, डिझेल व इतर तेलाच्या किंती वाढल्या. परदेशी व्यापारातील तुट प्रचंड झाली.

पुन्हा भारतास जागतिक खुल्या बाजारातून भांडवली व इतर वस्तु महाग किंमतीला खरेदी करुन आयात करावी लागली.

यामुळे आयात बिले फुगली व आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारात कोंडी निर्माण झाली. यातुन बाहेर पडण्यासाठी मुद्राकोष (IMF) किंवा जागतिक बँक (World Bank) यांच्याकडून भारताने आर्थिक सहाय्य मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु काही अटींवर हे आर्थिक सहाय्य देण्याचे मान्य केले.

**अ) त्या अटी पुढीलप्रमाणे:**

1.राज्य वित्तीय तुटीचे प्रमाण कमी करणे.
2.देशातील साधनसंपत्तीचे वाटप खुल्या बाजारातील मागणी पुरवठ्याप्रमाणे होऊ देणे.
3.पैशाचा पुरवठा दर (Rate of money supply) सीमित करणे.

4.अंतर्गत अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक, किंमती उत्पादने यावरील नियंत्रणे शिथील करुन जास्तीत जास्त स्वातंत्र्य देणे
5.आयात-निर्यातीत खुलेपणा आणणे.

- अशा अटी भारतास मान्य कराव्या लागल्या. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय मुद्राकोष यांनी घातलेल्या अटींमुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिकीकरणाकडे झुकत गेली.
- जागतिकीकरणाचे परिणाम.
- जागतिकीकरणाचा स्विकार करुन भारताला आज 26 वर्ष पुर्ण झाली. 1991 नंतर भारतात सरकारे बदलली तरीही जागतिकीकरणाचची प्रक्रिया सुरुच राहिली.
- जागतिकीकरणाचे भारताच्या अर्थव्यवस्थेवर सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही परिणाम समोर आले आहेत.

आ) **जागतिकीकरणाचे भारतावरील परिणाम पुढीलप्रमाणे:** 1) परकीय कर्ज उचलण्याचे प्रमाणही बरेच कमी झाले. 2) देशाच्या परकीय चलनात काही प्रमाणात वाढ झाली, 3) आंतरराष्ट्रीय व्यापारातील चालु खात्यातील तुट कमी प्रमाणात झाली. 4) निर्यातीला उत्तेजन देऊन निर्यात मोठ्या प्रमाणात वाढली. 5) पूर्ण परिवर्तनियता आणल्यानंतरही रुपयाचा विनीमय दर तुलनेने स्थिर राहिलेला दिसून आला.

इ) **जागतिकीकरणाचे भारतावर झालेले दुष्परिणाम:** भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या हल्ल्यामुळे काही स्वदेशी बाबतीत जागृत व चिंताग्रसत लोक आठवण करुन देतात की, ईस्ट इंडिया कंपनीस भारतात व्यापार करण्यासाठी परवानगी दिल्याने त्याचा जुर्माना भरुन द्यावा लागला आणि तो आज 250 वर्षाची गुलामगिरी होय.

आज 5000 पेक्षा जास्त कंपन्या या जागतिकीकरणामुळे व्यापाराच्या नावावर भारताला लुटत आहेत.
बहुराष्ट्रीय कंपन्या प्रत्येक वर्षी 1 लाख 25 हजार कोटी रुपयांची विदेशी मुद्रा नफ्याच्या स्वरुपात आपल्या देशाच्या बाहेर नेत आहेत. हळूहळू या मार्गाने देश आर्थिक गुलामगिरीच्या खाईत लोटला जात आहे.
अशा या जागतिकीकरणामुळे भारताला दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. ते पुढील मुद्यांवरुन सांगता येईल.

**1.बेकारी:**

मुक्त व्यापार आणि स्पर्धा यामुळे संपूर्ण जागतिक व्यापार खुला होत आहे. व्यापारामुळे स्वस्त परकीय माल (कापड, बुट, घड्याळे, मोबाईल, दुध, तुप, दारु, खेळणी, इलेक्ट्रीक वस्तु, मोटार सायकल, ट्रॅक्टर, साबण इत्यादी) आपल्या देशात येऊ लागल्या आहेत. भारतीय उत्पादक आपली फॅक्टरी बंद करुन कशीतरी उपजीवीका करण्याच्या मागे आहे. विदेशी वस्तु आपल्या देशाच्या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. ज्या बाबुगेनूने परदेशी मालाची होळी करतांना हौतात्म्य पत्करले. त्याचठिकाणी सन्मानाने परदेशी वस्तुंना आयातीमुळे आमचा लघु व मध्यम उद्योग अक्षरश: चिरडला जात आहे. त्यामुळे आपल्या देशात बेकारी वाढत आहे. देशातील उद्योगधंद्यांचे वस्तुंचे उत्पादन बंद होत आहे व लोक विदशी मालाचे स्वागत करु लागले आहेत. हा मुक्त अर्थव्यवस्थेचा भीषण व भयावह परिणाम आहे.

**2.शेती व्यवसाय धोक्यात:**

जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवर अयोग्य परिणाम होत आहे. शेती क्षेत्र गॅट करारात सामील केल्यामुळे जागतिकीकरण सुरु झाले आहे. भारतात 70% लोक शेतीवर अवलंबून आहेत, तर विकसीत देशात 2 ते 5% लोकच शेतीवर अवलंबुन आहेत. आपल्या देशात शेती व्यवसाय हा पोटासाठी केला जातो तर प्रगत देशामध्ये हा व्यवसाय नफ्यासाठी केला जातो.

अशा वेळेस प्रगत देशातील शेतीप्रमाणे भारतासारख्या देशातील शेतीला एकच नियम लावणे अयोग्य आहे. जागतिक बाजारपेठेत मुठभर बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व आहे. त्यांना बाजारपेठ खुली करुन देण्यासाठी गॅट करारात नवे बदल करण्यात आले.

त्यानुसार शेतीमालाच्या आयात-निर्यातीवर निर्बंध शिथील करणे, रासायनीक खते, वीज इत्यादीवरील अनुदान बंद करणे व विदेशी बियाणे कंपन्यांना मुक्त प्रवेश अशा देश विघातक अटी आहेत त्यांचे अनिष्ठ परिणाम जाणवू लागले आहेत. यामुळे भारतातील शेतीव्यवसाय अडचणीत आला आहे.

**3.ग्रामीण आर्थिक प्रश्न:**

जागतिकीकरणामुळे ग्रामीण अनेक समस्या निर्माण होत आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्याचा माल खेड्यापाड्यात पोहचत आहे. (उदा. पाण्याची बाटली, खेळणी, कापड, इलेक्ट्रीक वस्तु, बी-बीयाणे, खते, अन्नधान्य इत्यादी) त्यामुळे ग्रामीण भागात सुरु असलेले लघु व कुटीरउद्योग आपोआप बंद पडत आहेत. यामुळे बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे तसेच शेतीवरील भार वाढत आहे. शेती व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्य व्यवसाय हे व्यवसाय जागतिकीकरणामुळे धोक्यात येऊन ग्रामीण आर्थिक प्रश्न निर्माण होत आहेत.

## 4.निसर्ग संपत्तीवर बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव:

अनेक वनस्पतींचा ठेवा भारतात आहे. वनस्पतींच्या लाखो जाती आपल्या देशात जगत आहेत. त्यात औषधी वनस्पतीही आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या लुटीमुळे काही दुर्मिळ वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्याचे संरक्षण करण्याऐवजी सरकारने हि अनमोल निसर्गसंपत्ती साम्राज्यवादी लुटखोरांना बहाल करणारे कायदे करण्याचे ठरविले. शेती क्षेत्रातील पेटंटबाबत गॅट करारात तीन तरतूदी करण्यात आल्या आहेत. 1) वनस्पतींच्या नवीन जातीवर / वाणांवर वनस्पती पैदास कारकाचे हक्क, 2) सुक्ष्म जीवांवर पेटंट (हक्क) 3) सुक्ष्म जीवशास्त्रीय प्रक्रियांवर पेटंट. यामुळे अमेरिकेच्या संशोधकांनी आपल्या पारंपारीक उत्पादनावरही पेटंट घेण्याचे धारिष्टकेले.

"जागतिक स्पर्धेला तोंड देतांना आपले उद्योग गडबडले. प्रचंड मंदिचे वातावरण आज उद्योगसृष्टीत आले आहे. सबसिडी कमी केल्याने तसेच अन्य प्रतिकुल परिस्थितीमुळे शेती अडचणीत आली आहे. मुळात बेरोजगारांची भयावह समस्या असतांना रोजगार वाढण्याऐवजी कमी होऊ लागले. त्यामुळे या खुल्या आर्थिक धोरणाचा आम जनतेला लाभ होऊन तो हिताचा ठरेल याबद्दल विश्वास कुणी देऊ शकत नाही अशी आज स्थिती आहे.

## 5.स्पर्धा क्षमतेतील घट:

भारतीय उद्योग अजुनही परंपरागत व कालबाह्य उत्पादन पध्दतीचा वापर करुन उत्पादन करतात. तर परकीय उद्योग अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन वस्तुंचे उत्पादन करतात.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारतीय वस्तु व भारतातील विदेशी कंपनीने तयार केलेली वस्तु यांच्या स्पर्धेत भारतीय वस्तु मागे पडत आहेत. उदा. भारतातील

कापड, साखर, सौंदर्य प्रसाधने, खनिजे, हस्तकौशल्याच्या वस्तु, चामड्याच्या वस्तु, तागाच्या वस्तु, इलेक्ट्रॉनिक वस्तु इत्यादी.

**6.सार्वजनिक क्षेत्र धोक्यात:**

भारतातील राजकीय व्यवस्थेमध्ये काही दोष आहेत. जो सत्ताधारी पक्ष असतो तो केवळ सत्तेसाठी, संपत्तीसाठी व स्वार्थासाठी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कोणताही देशविघातक सौदा करु लागलेले आहेत. भारतात ज्या ठिकाणी सार्वजनिक क्षेत्राचे (सरकारचे) अस्तित्व होते ते डळमळीत झाले. त्याचा परिपाक म्हणून रेल्वे, विमा कंपन्या, दूरसंचार, बँका, परिवहन इ. चे खाजगीकरण करण्याची प्रक्रिया सुरु आहे. यामुळे विदेशी कंपन्यांना पुन्हा आमंत्रीत करण्यात येत आहे.

**7.इतर परिणाम:**

जसजसे उदारीकरण वाढेल तसे भारतीय अर्थव्यवस्थेवर सामाजिक, आर्थिक, राजकीय दुष्परिणाम वाढत जातील. समाजात गरीब व श्रीमंत यांच्यातील अंतर वाढत आहे. भारतातील 70% गरीब जनता 30% श्रीमंत व्यक्तींना जास्त श्रीमंत करीत आहे.

त्यामुळे जीवनमानाचा स्तर उंचावू शकत नाही. बौध्दिक शारीरिक क्षमता असून सुध्दा केवळ आर्थिक दुर्बलतेमुळे व्यक्ती उत्पादनाच्या प्रवाहात येऊ शकत नाही. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे पर्यावरण, प्रदुषण, शेती व्यवसाय, लोकांचे आरोग्य, निवारा इत्यादींवर दुष्परिणाम होत आहेत. शेतीविकासासाठी शासनाच्या पंचवार्षिक योजनांमधील तरतूदी यशस्वी होऊ

शकल्या नाहीत. शासनाने केवळ औद्योगिक क्षेत्राला, खाजगी क्षेत्राला अवास्तव महत्व दिल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अडचणीत येत आहे.

- **मूल्यमापन:**

भारतीय लोकांनी स्वदेशी वस्तु वापरण्याचा आग्रह धरला तर जागतिकीरणाचा दुष्परिणाम भारतावर पाहिजे तेवढ्या प्रमाणात पडू शकणार नाही. सरकारने देशाच्या विकासासाठी अनेक उपाययोजना केल्यात. गेल्या 69 वर्षाच्या वाटचालीत काही प्रमाणात त्या दिशेने आपण प्रगती करुन देशतील निरक्षरता कमी करण्याचा प्रयत्न व दारिद्रय निर्मुलनाचा प्रयत्न केलेला दिसतो.

परंतु खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण आणि कंत्राटीकरण यामुळे भारत देश पुन्हा आर्थिक गुलामगिरीच्या खाईत लोटला जाण्याची भिती निर्माण होत आहे. स्वार्थी राजकारणात दुरदृष्टीचा अभाव असल्यामुळे ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व विश्व व्यापार संघटना यांच्याशी दुष्ट करार करीत आहेत.

इतिहासाची दुष्ट पुनरावृत्ती होऊन देश पुन्हा आर्थिक गुलामगिरीत बुडत जाण्याची शक्यता असून सर्व सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण होऊ घातलेले आहे. स्वदेशी खाजगी उद्योग मोडीत निघत आहेत. तंत्रज्ञानाचा वापर करुन कामगारांवर बेकारीची कुज्हाड कोसळलेली आहे. या सर्वांचा परिणाम देश आर्थिकदृष्ट्या नफेखोर बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या जाळ्यात पुर्णपणे अडकत चालला आहे. देशात या कंपन्यांद्वारा होणाऱ्या प्रसार माध्यमातून गैरवापरातून चंगळवाद फोफावत चालला आहे. त्याचा फायदा या बहुराष्ट्रीय कंपन्या घेऊन मोठ्या प्रमाणात नफा कमवुन त्या पैशाचा ओघ आपल्या देशाकडे नेत आहेत. राजकीय नेते नाणेनिधी, विश्वव्यापार संघटना

आणि जागतिक बँक यांच्याकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊन देश गहाण टाकण्यास निघाले आहेत.

एकंदरीत देश पुन्हा एकदा आर्थिक वसाहतवादाच्या जबड्यात सापडला आहे. राजकीय गुलामगिरीपेक्षा हि आर्थिक गुलामगिरी अत्यंत भयावह ठरणारी आहे. या दुरावस्थेतून देशाला वाचविण्यासाठी आपणास पुन्हा स्वदेशी आंदोलनाचा आधार घेतल्याशिवाय पर्याय नाही.

*ISBN: 978-93-90847-09-9*

# प्रकरण 3

# मानवी हक्क सामाजिक न्यायाची वास्तवता

## 3.1 मानवी हक्क आयोगाची भूमिका व कार्यपध्दती:

संयुक्त राष्ट्रसंघाच्या उद्‌दिष्टांपैकी एक उद्‌दिष्ट म्हणजे मानवी मुलभूत अधिकारांची स्थापना करणे व जतन करणे हे असून जगातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व मानवी समस्या सोडविण्यासाठी आर्थिक सहकार्य प्राप्त करुन वंश, लिंग, भाषा व वर्णभेद न बाळगता जगातील सर्व नागरीकांना मानवी हक्क आणि स्वातंत्र्याचा सारखाच लाभ मिळावा म्हणून श्रीमती रुझवेल्ट यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमण्यात आले.

या कमिशनने आपला अहवाल संयुक्त राष्ट्रसंघटनेला सादर केला. 1945 च्या स्॑ॉन फ्रान्सीस्कोच्या सहाव्या सम्मेलनात जनरल रुपट यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या प्रस्तावनेत या मानवी अधिकाराच्या घोषणेचा समावेश करावा असा प्रस्ताव मांडला.

10 डिसेंबर 1948 रोज संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत हा प्रस्ताव समाविष्ठ करण्यात आला या प्रस्तावाला 10 डिसेंबर 1950 रोजी 58 राष्ट्रांनी मान्यता दिली. 10 डिसेंबर हा 'मानवी हक्क दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.'मानवी अधिकार म्हणजे मानवाला स्वत:च्या गरजा भागविण्याचा आणि स्वत:च्या पध्दतीने जीवन जगण्याचा हक्क होय.'या हक्कावर कोणाचेही गंडांतर येवू नये अशी या मागची रास्त भावना आहे. खऱ्या अर्थाने मानवी हक्काबरोबरच तो मानवी कर्तव्याचाही दिवस आहे. कारण आपल्या हक्काची जाणीव इतरांना

असावी अशी अपेक्षा करतांना इतरांच्या हक्काचा मान राखणे हे माझे कर्तव्य समजतो.

मानवी हक्काच्या संदर्भातील हे अशा प्रकारचे संबंध प्रस्थापित करणे हे एक आव्हान आहे. कुटूंब, शाळा, समाज किंवा सरकार या सर्व स्थरावर न्याय प्रस्थापित करण्यासाठी परस्परांच्या हक्कांची व त्याबरोबरच कर्तव्याची जाणिव असणेही आवश्यक आहे.

**अ) मानवी अधिकाराचा उद्घोष: 10 डिसेंबर 1948:**

'ज्यास्तव मानव परिवारातील सर्व सदस्याची जन्मजात प्रतिष्ठा, समानता आणि अविभाज्य अधिकाराची जाणिव ही विश्वातील स्वातंत्र्य, न्याय आणि शांतीची मुहुर्तमेढ आहे. मानव अधिकारांबाबतच्या उपेक्षा आणि घृणा यातून मानव समाजाच्या विवेकबुध्दीचा तळ ढवळुन काढुन लोकांना भाषण धर्मस्वातंत्र्य आणि भय व अभावापासून युक्ती असेल ही सामान्य लोकांची सर्वोच्च आकांक्षा म्हणून घोषित करण्यात आलेली आहे.' कुठल्याही अन्यायी शासनाच्या जुलमापासून मानवी अधिकारांचे संरक्षण केले जाईल. असे आश्वासन देण्यात आले आहे.म्हणून सर्व राष्ट्रातील मैत्रीचे संबंध वाढीस लागावेत ज्यास्तव संयुक्त राष्ट्राच्या जनतेने या अधिकारनाम्यात मुलभूत मानवी अधिकार, मानवी व्यक्तिमत्वाची जन्मजात प्रतिष्ठा आणि योग्यता, तसेच स्त्री-पुरुषांचे समान हक्क या विषयी आपण विश्वास घोषित केला आहे.

याचा उद्देश सामाजिक प्रगती आणि अधिक व्यापक स्वातंत्र्यात जीवनस्तर उंचावला जाईल व सर्व राष्ट्रांनी मानवी अधिकार आणि सार्वभौमत्वाचे संरक्षण करणे महत्वाचे आहे. म्हणून ही सभा मानवी अधिकारांची सार्वभौम घोषणा जी सर्व लोकांसाठी आणि सर्व राष्ट्रांच्या नागरीकांसाठी समतेचा एक समान मापदंड असेल याचा उद्देश असा की प्रत्येक व्यक्ती आणि समाजातील प्रत्येक

घटक ही घोषणा मनात निरंतर बाळगून अध्यापन आणि शिक्षणाद्वारा सतत हे अधिकार आणि स्वातंत्र्य यांच्या प्रती आदर वाढीस लागावा म्हणून प्रागतिक स्वरुपाची राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय धोरणे आखून त्यांच्या सार्वत्रिक आणि प्रभावकारक मान्यता लाभावी आणि त्याचे आचरण व पालन व्हावे यासाठी सदस्य राष्ट्रांची जनता आणि त्याच्या प्रशासनाखालील जनतेमध्ये सदैव प्रयत्नशील राहतील. अशा पध्दतीने मानवी अधिकाराच्या या सार्वभौम घोषणेत सामाजिक न्यायाच्या तत्वावर आधारीत 30 कलमांचा समावेश करण्यात आला. अनुच्छे 1 - सर्व मनुष्यमात्रांना जन्मजात स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते. अनुच्छेद - 2 वंश, धर्म, जात, रंग, पंथ, भाषा यावर भेदभाव केला जाणार नाही.

अनु. 3 - प्रत्येकाला जीवन, स्वाधिनता आणि वैयक्तिक सुरक्षिततेचा हक्क आहे. अनु. 4 कुणालाही गुलामगिरीत व वेठबिगारीत ठेवले जाणार नाही. अनु. 5 कुणाला शारीरिक यातना, शिक्षा व अपमानास्पद व्यवहार केला जाणार नाही. अनु. 7 कायद्यासमोर सर्व समान असतील व समान संरक्षण असेल. अनु. 12 व्यक्तीजीवनात शासन हस्तक्षेप करणार नाही. व्यक्तीच्या प्रतिष्ठेला आघात पोहचविणार नाही. अनु. 13 - प्रत्येक व्यक्तीत आपल्या राज्याच्या सीमा रेषेने कुठेही रहाता येईल व सचार करता येईल. अनु. 19 प्रत्येक व्यक्तीस विचार, आचार व उच्चाराचे स्वातंत्र्य असेल. अनु. 20 - सभा व संघटन स्थापन करण्याचा अधिकार असेल. अनु. 23 - प्रत्येक व्यक्तीस स्वयंरोजगाराचा, आपला व्यवसाय निवडण्याचा व समान कामासाठी समान वेतन मिळविण्याचा हक्क कुणालाही नाकारता येणार नाही. अनु. 26 - शिक्षण मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे. मानवी अधिकाराच्या घोषणापत्रातील ही कलमे सामाजिक न्यायाची द्योतक आहेत. या मानवी हक्काच्या प्रस्थापनेसाठी युनोने काही करार केले. ते जवळ जवळ 21 करार केलेत. उदा

वांशिक हत्या थांबविण्यासाठी (1950, मानवी व्यापार (1951), गुलामगिरी नष्ट (1953), निर्वासितांचा प्रश्न (1954), महिलांच्या राजकीय हक्काबाबत (1954) गुलामांचा व्यापार बंद 1957), विवाहीत महिलांच्या राष्ट्रीयत्वाबाबत (1958), राज्यविहीत व्यक्तीचा दर्जा (1960), वांशिक भेद निर्मुलन (1969) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार (1979) महिलांबाबत होणारा पक्षपात (1981) बालकांचा अधिकार (1989) मानवी हक्कांबाबत कृती कार्यक्रम (व्हिएन्ना - 1993).

या करारान्वये व्यक्तिच्या जीवित, मालमत्ता, स्वातंत्र्यावर जगातील कोणत्याही राष्ट्राने आक्रमण करु नये हा उद्देश युनोचा होता. तसेच सर्व मानव जातीस समान स्थान मिळावे व समान प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून युनोच्या सदस्य राष्ट्रांनी या संधींना मान्यता देवून त्यांचे मानवी हक्काचे सदस्य राष्ट्रांनी या संधीना मान्यता देवून त्याचे मानवी हक्काचे पालन व जपणूक करण्याचे अभिवचन दिले. फ्रेंच राज्यक्रांतीने समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव ही त्रिसुत्री दिली. समता हे प्रधान मुल्य आहे. समतेचा अर्थच मुळी सर्वांना समान वागणुक देणे व विकासाची संधी उपलब्ध करुन देणे होय. सर्व माणसे जन्मतःच मुक्त व स्वतंत्र आहेत. म्हणून हक्क व दर्जा बाबतीत सर्व समान आहेत. अनु. 21 व 22 नुसार जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याची हमी देण्यात आलेली आहे. अनु. 23 नुसार मानवी व्यापार व वेठबिगारी पासून संरक्षण व मार्गदर्शक तत्वातील अनु.38 नुसार व्यक्तीच्या कल्याणाची शास्वती देण्यात आली आहे. घटनेच्या 4 थ्या भागात अनुसुचीत जाती-जमातींच्या हितरक्षणासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. भारतीय घटनाकारांनी मानवी अधिकारांच्या तरतूदींचा घटनेत समावेश करुन एकूण व्यक्तीविकास संरक्षण याची हमी दिलेली आहे व ती जबाबदारी शासनावर टाकलेली आहे.

## आ) घटनात्मक तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी केलेले उपाय:

घटनात्मक तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी व सामयिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी काही कायदे करण्यात आले. त्यात

1.महिलांसाठी कायदे

2.हिंदू विवाह कायदा 1955

3.1956 चा हिंदू वारसा कायदा

4.1956 चा अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा

5.पारसी, ख्रिस्ती समाजातील बालविवाह व द्विभार्या विवाहास पायबंद घालण्यासाठी 1954 च्या कायद्यात विवाहाची नोंदणी करण्याची तरतूद करण्यात आली.

6.1971 चा हुंडा प्रतिबंधक कायदा

7.1974 चा घटस्फोट व निर्वाह रक्कम (पोटगी) देण्याबाबतचा कायदा

8.1984 व 1986 या दोन्ही वेळेस हुंडा प्रतिबंधक कायद्यात दुरुस्ती करण्यात आली.

9.1986 चा स्त्री प्रतिनिधींचा कायदा

10.1987 चा सतीसंबंधी कायदा वेगळ्या स्वरुपात करण्यात आला.

11.1987 चा देवदासी प्रथेविरुध्द कायदा

12.1987 चा समान वेतन कायदा

13.1988 चा मातृविषयक कायदा करण्यात आला

14.22 डिसेंबर 1992 मध्ये संसदेने 73 व 74 वी घटना दुरुस्ती करुन पंचायत राजसंस्थेत स्त्रियांना 33% आरक्षणाची तरतूद करण्यात आली व त्याची प्रत्यक्षत अंमलबजावणीही झाली.

15.जुलै1998 मध्ये केंद्र व घटक राज्याच्या कायदेमंडळात, संसदेत 33% आरक्षण असावे या संदर्भात विधेयक मांडले गेले. परंतू ते संसदेच्या विचाराधीन आहे. (84 वी घटनादुरुस्ती)

16.1994 - गर्भजल प्रतिबंधक कायदा

17.आणि आज संसदेने मान्यतेसाठी स्त्रीयांना वडिलांच्या स्थावर मालमत्तेत समान अधिकार देण्याबाबत आहे. अजुन हे बिल संसदेत मंजूर व्हावयाचे आहे. वरील कायद्याशिवाय भारतीय दंड विधान संहितेतील अनु. क्र. 354, 362, 372, 376, 377, 509 यांना संरक्षण देण्यात आले आहे.

## इ) सामाजिक न्यायासाठी समाजसुधारकांनी केलेले कार्य:

सामाजिक न्याय प्रस्थापीत करण्यासाठी भारतातील समाजसुधारकांचे फार मोठे योगदान आहे. त्यांनी केलेले कार्य हे समाजाच्या प्रगतीसाठी होते. प्रस्थापीत व्यवस्थेशी त्यांनी लढा देवून समाजपरिवर्तनाचे कार्य केलेले आहे. हे समाजसुधारक भारतीय इतिहासात अजरामर झालेत.

मानव मुक्तीसाठी त्यांनी संघर्ष केला. सर्व जातीधर्माच्या लोकांना आपल्या प्रगतीसाठी स्वातंत्र्याचा उपभोग घेता आला पाहिजे. समाजसुधारकांच्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे -

### 1.राजा राममोहन रॉय:

रॉय यांनी स्त्री बंधनाला प्रखर विरोध केला आणि स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांच्या काळात भारतातील स्त्रीयांचा दर्जा अतिशय हिन स्वरुपाचा

होता. अनिष्ट रुढी व परंपरेच्या बंधनांनी स्त्रीला बांधुन ठेवले होते. पतीच्या मृत्युनंतर तिला सती जावे लागत होते.

म्हणजेच स्त्रीयांना जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेतला होता. अशा बिकट परिस्थितीतून स्त्रीयांना मुक्त करण्याचा विचार त्यांनी मांडला.

त्यांनी सांगितले की, सती प्रथा योग्य असेल तर पुरुषांनीही आपल्या मृत पतीबरोबर स्वतःला चितेवर झोकून द्यावे असा क्रांतीकारक विचार त्यांनी मांडला. स्त्रीयांना जीवीताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, मालमत्तेचा हक्क नाकारलेला होता.
अशा परिस्थितीत स्त्री स्वातंत्र्यासाठी त्यांना बंधनातून मुक्त करण्यासाठी रॉय यांना फार कष्ट करावे लागले. 1815 मध्ये त्यांनी कलकत्त्याला "आत्मीय सभा" स्थापन केली. जातीभेद व रुढी विरोधी या संस्थेने कार्य केले. 1818 मध्ये रॉय यांनी हिंदू धर्मातील "सतीची चाल" या विरोधी मोहिम सुरु केली.

त्यानंतर गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंन्टीक यांनी 1828 मध्ये सतीची चाल बेकायदेशीर ठरवून रद्द केली. रॉय यांनी ब्राम्हो समाजाची स्थापना केली. रॉय यांनी समाजात एकात्मता प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न केला. रॉय यांच्या मते समाजातील सर्व व्यक्ती समान आहेत म्हणून जातीचा आधारावर व्यक्तीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव करणे अयोग्य आहे.

पूर्वी समाजातील कनिष्ठ जातींना अपमानकारक आणि वाईट वागणूक दिली जात होती. या कनिष्ठ जातीतील लोकांना न्याय मिळवून देण्याचे महान कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले.

**2.महात्मा फुले:**

महात्मा फुले हे थोर समाजसुधारक होते. सामाजिक विषमता, अन्याय, शोषण यावर आधारीत व्यवस्थेला त्यांचा विरोध होता. शुद्रातीशुद्र कनिष्ठ वर्गाचे उच्चवर्णीयांनी जे शोषण चालविले आहे ते थांबविण्याखेरीज न्यायाधिष्ठीत समाजव्यवस्था प्रस्थापीत होणे शक्य नाही असे त्यांचे मत होते. शुद्रातीशुद्र वर्गातील लोकांनी संघटीत होऊन ब्राम्हणी वर्चस्वाविरुध्द संघर्ष केला पाहिजे असे त्यांचे मत होते.

शुद्रातीशुद्र वर्गातील लोकांनी संघटीत होऊन ब्राम्हणी वर्चस्वाविरुध्द संघर्ष केला पाहिजे असे त्यांचे मत होते. 1851 साली सर्व जातीच्या मुलांसाठी आणि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मुलामुलींसाठी शाळा काढून म. फुले व सावित्रीबाई फुले यांनी आपल्या सार्वजनीक जीवनास व सेवेला सुरुवात केली. म. फुले यांनी बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार होण्याबाबत आग्रह धरला. बहुजन समाजाला शिक्षण मिळाल्याखेरीज त्यांची प्रगती होणार नाही असे त्यांचे मत होते. म्हणून शिक्षणाच्या सार्वत्रीक प्रसाराकडे सरकारने लक्ष द्यावे अशी त्यांची मागणी होती.

त्यांनी 1852 मध्ये अस्पृश्य मुलांसाठी पुण्यातील भोकरवाडी येथे शाळा सुरु केली. 1868 साली त्यांनी आपल्या घराचा पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला करुन दिला. हि सामाजिक न्यायाची कृतीपूर्ण क्रांती फुलेंनी केली. म. फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य पददलीत जनतेच्या व समाजाच्या उध्दारासाठी खर्च केले. सामाजिक अन्याय व विषमता याविरुध्द त्यांनी आवाज उठविला. समाजकार्याच्या प्रत्येक क्षेत्रात ते अग्रभागी राहिले आणि खऱ्या मानवधर्माचा त्यांनी सतत पुरस्कार केला.

सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवणारा समाजसुधारक, अस्पृश्यांसाठी शाळा सुरु करुन त्यांना शिक्षणाचे

दरवाजे खुले करणारा पहिला दलीतोध्दारक, शुद्रातीशुद्र, बहुजन समाजाच्या वेदनांना वाचा फोडणारा बहुजन समाजातील पहिला नेता म्हणजे महात्मा फुले होय. ते केवळ समाज सुधारक नव्हते तर मुलग्राही समाजक्रांतीकारक होते.

## 1.छत्रपती शाहु महाराज:

शाहु महाराजांच्या काळात बहुन समाज शिक्षणापासुन वंचित होता. त्यांनी वंचीत समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या कार्यास प्रथम प्राधान्य दिले. तसेच त्यांनी कोल्हापुरात वेगवेगळ्या जातीधर्माच्या विद्याथ्र्यांसाठी केलेली वसतीगृहाची स्थापना हे त्या दिशेने उचललेले महत्वाचे पाऊल होय. 18 एप्रिल 1901 रोजी मराठा विद्याथ्र्यांसाठी व्हिक्टोरीया मराठा बोर्डींग हाऊसची स्थापना त्यांनी केली. त्यानंतर सारस्वत, लिंगायत, जौन, मुसलमान, देवज्ञ, शिंपी, वैश्य, ढोर चांभार नाभीक या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वस्तीगृहे सुरु केलीत. शिक्षण क्षेत्रात उचललेले क्रांतीकारक पाऊल 8 सप्टेंबर 1917 मध्ये कोल्हापुर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासंबंधीचा आदेश त्यांनी काढला. पददलीत व मागासलेल्या वर्गाची उन्नती हे शाहु महाराजांनी आपले जीवीत कार्य मानले.

अस्पृश्यांवरील अन्यायाचे निवारण करण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केला.अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून 1907 मध्ये शाहु महाराजांनी कोल्हापुरात त्यांच्यासाठी मिस क्लार्क बोर्डींग या नावाने वसतीगृह सुरु केले.

तसेच अस्पृश्यांना आर्थिकदृष्ट्या स्वत:च्या पायावर उभे राहता यावे यासाठी त्यांनी अस्पृश्यांना व्यवसाय सुरु करण्यास प्रोत्साहन दिले आणि अस्पृश्य

जातीच्या लोकांना उपहारगृहे, दुकाने चालविण्यासाठी शाहु महाराजांनी आर्थिक सहाय्य केले.

अस्पृश्यांना ताठ मानेने जगता यावे म्हणून त्यांना सरकारी नोकऱ्या मिळून दिल्यात. महार, मांग, चांभार जातीतील सुशिक्षित लोकांना त्यांनी वकीलीच्या सनदा दिल्यात. आपल्या संस्थांनात अस्पृश्यता पाळली जाऊ नये याकडे त्यांनी लक्ष दिले.

पाणवठे, दवाखाने, शाळा, सार्वजनिक विहीरी, सार्वजनीक इमारती इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना समानतेने वागवावे यासाठी शाहु महाराजांनी आदेश काढले होते. 18 सप्टेंबर 1918 रोजी आपल्या राज्यातील महार वतने त्यांनी रद्द केली. त्या जमीनी त्यांनी अस्पृश्यांच्या नावावर रयतवारीने करुन दिल्या. शाहु महाराजांनी मागासवर्गीयांनी आपल्या राज्यात नोकरीमध्ये 50% आरक्षण दिले. बहुजन समाजाची अस्मिता जागृत करण्याचे काम शाहु महाराजांनी केले.

**2.डॉ. बाबासाहेब आंबेडकर:**

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांची स्थिती सुधारण्यासाठी सुरुवातीपासून प्रयत्न केला होता. त्यांना लहानपणापासुन अस्पृश्य असल्याचे चटके सहन करावे लागले. शिक्षण घेतेवेळी त्यांना अनेक कटु अनुभव आले. माणुसकीला काळीमा लावणाऱ्या अस्पृश्यतेच्या अनिष्ट रुढी प्रथेचे उच्चाटन करण्याच्या कार्यास त्यांनी स्वत:स वाहून घेतले. त्यांनी दलीतांना न्यायहक्कासाठी व अन्यायाचा प्रतिकार करण्यास शिकविले. 1927 मध्ये त्यांनी महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. हा सत्याग्रह म्हणजे मानवी हक्कांची चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केली. हक्क भिक्षांदेहीच्या मार्गाने मिळत

नसतात. त्यासाठी लढा द्यावा लागतो. लाचार व गुलामासारखे जीवन जगण्यापेक्षा मरण चांगले असे अस्पृश्यांना सांगून त्यांच्यात चौतन्य निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले. जातीसंस्थेला बळकटी देणाऱ्या मनुस्मृती या ग्रंथाचे त्यांनी 25 डिसेंबर 1927 रोजी दहन केले. हिंदुच्या देवालयात अस्पृष्यांना प्रवेश दिला जात नव्हता. डॉ. आंबेडकरांनी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करुन अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव करुन दिली. त्यांनी सत्याग्रहाची हाक देताच संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांचे हजारो अनुयायी नाशिक येथे दाखल झाले. 2 मार्च 1930 रोजी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह झाला.

हिंदूच्या मंदिरात प्रवेश करणे हा आपला हक्क आहे हे त्यांनी दलीतांना सांगितले. इ.स. 1935 मध्ये त्यांनी येवले येथे भरलेल्या अस्पृश्य परिषदेच्या अध्यक्ष पदावरुन बोलतांना धर्मांतराची घोषणा केली. तेव्हा त्यांनी असे उद्गार काढले की, दुर्दैवाने मी हिंदू म्हणून अस्पृश्य जातीत जन्मलो असलो तरी मी मरतांना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही. त्यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे बौध्द धर्माची दिक्षा असंख्य अनुयायांसह घेतली. त्यांनी बहिष्कृत भारत व मुकनायक या नियत कालीकातून आपल्या झोपलेल्या समाजास जागे केले.

शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा हा संदेश त्यांनी लोकांना दिला. त्यांनी जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करुन भारतासाठी स्वतंत्र राज्यघटना लिहीण्याचे कष्टमय काम केले. 2 वर्ष 11 महिने 18 दिवसात राज्यघटनेचे काम पुर्ण झाले. त्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्यायाचा संदेश लोकांपर्यंत पोहचला.

ISBN: 978-93-90847-09-9

# प्रकरण 4

# मानवी हक्क

## 4.1 प्रस्तावना:

दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर जगातील बरीच राष्ट्रे साम्राज्यवादाच्या जोखडातुन मुक्त होवून स्वतंत्र झालीत. स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाला प्राधान्य देवून लोकशाही प्रणालीचा स्विकार केला. राष्ट्रपरत्वे लोकशाहीचे स्वरुप भिन्न असले तरी व्यक्तीचे स्वातंत्र्य, राज्यकारभारातील व्यक्तीचा सहभाग व व्यक्तीच्या कल्याणासाठी शासन ही संकल्पना त्या त्या राष्ट्रांच्या राज्यघटनानी स्वीकारली. तरीही त्या त्या देशांच्या अडसरीची बिजे दडलेली दिसुन येतात. त्यामुळे समाजातील विविध घटकांना आर्थिक, सामाजिक व राजकीय न्यायाचे उद्‌दिष्ट कागदोपत्री निश्चित केलेले असले तरी प्रत्यक्षात ते अस्तित्वात येवू शकले नाही.

भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केलेला असुन स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय निर्माण करण्याचे अभिवचन देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर मानवनिर्मित सामाजिक विषमतेतून भारतातील सामाजिक दृष्टा दुर्बल घटक विकासापासुन बराच दुर आहे याची जाणिव ठेवून समाजातील अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती यांचा विकास साधण्यासाठी व त्यांना जीवन जगण्याचा अधिकार सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने घटनेत त्यांच्यासाठी विशेष तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्यांच्यासाठी शासकीय पातळीवर अनेक विविध योजना आखण्यात आल्या. तरीदेखील आजही आदिवासी समाज आपला जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त करु शकला नाही असे दिसुन येते.

जन्मास आलेल्या प्रत्येक मनुष्याला जीवन जगण्याचा अधिकार असला पाहिजे. तसेच कसेही जीवन जगत असताना विशिष्ट सर्वांगिण विकासाचे ध्येय बाळगुन जीवन जगता आले पाहिजे. आज आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण जवळपास 6 टक्के आहे. पण आजही आदिवासी समाज सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासापासून वंचित असलेला दिसून येतो.

मानवाधिकाराची संकल्पना आधुनिक आहे. जागतिकीकरणातुन मानवाधिकाराच्या संकल्पनेचा उदय झाला. जगात मानवाधिकाराच्या संकल्पनेला विकसित पाश्चिमात्य राष्ट्रांनी आधीच मान्यता दिली. भारतात प्राचीन काळापासूनच मानवाधिकाराची संकल्पना अस्तित्वात असल्याचे ऐतिहासिक दाखले सापडतात. मात्र खऱ्या अर्थाने 1992 ला गॅट करारावर भारतने सही केल्यानंतर संसदेने 1993 ला मानवाधिकाराला संरक्षण देणारे कायेद व धोरण ठरविले.

1989 मध्ये फ्रान्समध्ये फ्रेंच राज्यक्रांती झाली. या क्रांतीने अनियंत्रित राजेशाही आणि समाजातील उच्चवर्णीयांचे विशेष अधिकार यांच्याविरुध्द आवाज उठविला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्वांना मान्यता दिली. त्यातून मानवी हक्कांना मान्यता मिळाली. 1945 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या निर्मतीनंतर मानवी हक्कांना प्राधान्य देण्यात आले. मानवी हक्कांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या महासभेने 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा प्रसिध्द केला. या जाहिरनाम्यात 30 प्रमुख मानवी हक्काचा समावेश करण्यात करण्यात आला.

सर्व मानव जन्मानेच स्वतंत्र आहेत. जात, धर्म, भाषा, लिंग इ. भेदभाव न पाळता सर्व मानवांना मानवी मुलभूत हक्क प्राप्त आहेत. उदा. जिविताचा हक्क, संपत्तीचा हक्क आणि स्वातंत्र्याचा हक्क, इ. मानवी अधिकार हक्क

प्राप्त आहेत. या जाहीरनाम्यामुळे मानवाला एकांकततेचा व कुटुंबाचा निवारा अधिकार आहे. तसेच राजकीय अधिकारात भाषण स्वातंत्र्याचा, संघटना स्थापन करण्याचा, मतदानाचा व शासन निवडण्याचा अधिकार प्राप्त आहेत.

संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्काच्या प्राप्तीसाठी आणि रक्षणासाठी आंतरराष्ट्रीय मानवी आयोगाची स्थापना केली आहे.

संयुक्त संघटनेचेच विविध उपविभाग, विविध राज्याची पाहणी करुन मानवी हक्कासंबंधीच्या समस्या इ. बाबत आपला अहवाल या आयोगास सादर करतात.

**आर्थिक:** सामाजिक मंडळ: हे मंडळ मानवी मुल्यांच्या रक्षणाची जबाबदारी पार पाडीत असते. गरीबी व निर्धनचे प्रश्न व त्यातून मानवी हक्काची होत असलेली पायमल्ली या संबंधीचा अहवाल मानवी हक्क आयोगाला सादर केला जातो.

हे मंडळ महासभेस जागतिक आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक विषयावर आपला अहवाल सादर करित असते.

**युनिसेफ:** य संस्थेद्वारे मुलांच्या आरोग्याचे सर्वेक्षण करुन अहवाल सादर करुन त्यावर उपाययोजना सुचविले जातात. बालक निधी जगातील मुलांच्या आरोग्यासाठी उपयोगात आणला जातो.

**आंतरराष्ट्रीय कामगार संघटना:** कामगारांच्या बेकारी निवारण्याचे प्रश्न त्यांचे आजार, आरोग्य, वेतन, कामाचे तास इत्यादी बाबत पहाणी करुन मानवी मुल्यांच्या जोपासणेसंबंधी विचार करीत असतात.

**जागतिक आरोग्य संघटना (WHO):** जगातिल लोकांना रोगमुक्त जीवन जगण्यास मदत करणे तसेच साथीचे आजार नष्ट करणे, प्रतिबंधक लस उपलब्ध करुन देणे, आरोग्याच्या दृष्टीने मानवी हक्कांचे रक्षण करीत असते.

संधीवात, पोलिओ, कॅन्सर, क्षय, महारोग, इ. रोग नाहिसे करण्याचा प्रयत्न या संघटनेद्वारे केला जातो. युनेस्को - संयुक्त संघटनेची, शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना युनेस्कोद्वारे आंधळ्यांना शिक्षणासाठी मदत केली जाते.

वैज्ञानिक संस्थांना मदत करणे, शिक्षणासाठी प्रसार माध्यमांचा उपयोग उपलब्ध करुन देत असतो. साक्षरता प्रचार व शिक्षण विषयक समस्यांचा उलगडा करण्याचे कार्य ही संस्था करीत असते.

**खाद्य व कृषि संघटना (F.A.O.):** पौष्टीक आहाराची व्यवस्था करणे, राहणीमान वाढविणे, अन्न आणि शेतमाल यांच्या उत्पादनात आणि वाटपात आर्थिक कार्यक्षमता आणणे, ग्रामीण भागातील राहणाज्यांची स्थिती सुधारणे याबाबत ही संघटना शिफारस करीत असते. 1960 मध्ये (F.A.Q.) ने "भूकेपासुन जगाची मुक्तता" अशी घोषणा केली.

**U.N.O:** युनोला स्थापन होऊन 70 वर्ष पूर्ण होऊनही मानवी अधिकाराची हमी देऊनही माणसाला मानवी हक्काची खरोखरच उपलब्धी झाली आहे काय? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी दिले जाते. कारण की, मागील 70 वर्षात जगात वर्णविद्वेष, वांशिक कत्तली, सांप्रदायिक दंगली, मानवी संहार, बालमजुरांचे शोषण, कुपोषण, पोलीसी अत्याचार, स्त्रियांवरील अत्याचार आणि आदिवासी जीवन जगण्याच्या अधिकाराची पायमल्ली इत्यादी समस्या उभ्या राहिल्यामुळे मानवी हक्कांची अवहेलना फार मोठ्या प्रमाणावर झाली आहे.

**याचे मुख्य कारण म्हणजे:**

1.मानवी हक्क आयोगापुढे येणाऱ्या तक्रारी व त्यांच्या निवारणाचा उपाय यांचे स्वरुप केवळ शिफारस वजा असते. या अहवालातील उपायांची सक्तीने अंमलबजावणी होत नाही.
2.मानवी हकांची अवहेलना करणाऱ्याना कठोर दड देणारी यंत्रणा स्वतंत्र नाही.
3.F.A.Q. ची भुकेपासून जगाला मुक्त करु ही घोषणा फक्त कागदावरच राहिली. प्रत्यक्षात अनेक भुकबळी पडलेले दिसतात. बालकांच्या कुपोषणामुळे होणाऱ्या मृत्युंची संख्या भयानक आहे.
4.स्त्रियांवरील अत्याचारांची संख्या वाढतच आहे. स्त्रियांच्या विक्रीचे प्रमाणही चालुच आहे. भारतासारख्या देशात अजुनही सती जाण्याचे व बालविवाहाचे प्रकार घडतात. म्हणूनच स्त्रियांबाबत मानवी हक्कांची पायमल्ली मोठा प्रमाणावर होतांना दिसते.
5.युनोच्या मानव हक्क समितीने 1988 ते 1990 य काळात विविध राज्यात पोलिस कस्टडीत झालेल मृत्युचा रिपोर्ट मागविला, परंतु राज्यांनी या मागणीकडे दुर्लक्ष केले. एकूण मानवी हक्कांची हमी केवळ कागदावरच आहे. प्रत्यक्षात मानवी हक्कांची कुचंबना होत आहे.

**भारतीय राज्यघटनेत मानवी अधिकाराचे प्रतिबिंब:**

मानवी प्रतिष्ठेच्या संकल्पनेशी मानवाधिकार निगडीत असल्याने आपल्या राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेत व घटनेच्या विविध तरतूदीत मानवी प्रतिष्ठेची हमी व सामाजिक न्यायाची हमी देण्यात आली.

घटनेच्या उद्देशपत्रिकेत समाजाचे सर्वांगिण कल्याण आणि व्यक्तिगत वर्णन यांचा समन्वय म्हणजे न्याय अशी व्याख्या केलेली आहे.

म्हणूनच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्रस्थापित करण्याचा उद्‌देश व्यक्त केला आहे. कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी सामाजिक न्यायाची आवश्यकता असते. सामाजिक विषमतेचे निर्मुलन करणे म्हणजे सामाजिक न्याय प्रस्थापित करणे होय. वर्णव्यवस्था ही सामाजिक विषमतेवर आधारलेली आहे.

**म्हणून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 15 मध्ये:**

1)धर्म, वंश, जात, लिंगभेद व जन्मस्थान या कारणावरुन राज्य भेदाभेद करणार नाही.

2)नुसार सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारला जाणार नाही.

3)नुसार स्त्रिया व मुले यांच्यासाठी खास कायदे करण्यात येतील.

4)नुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या अनुसुचित जाती जमातीच्या नागरिकांसाठी विशेष तरतुदी करण्याचे बंधन शासनावर टाकण्यात आलेले आहे.

**अनुच्छेद 16:** नोकरीची समान संधी देण्याबाबत आश्वासन देण्यात आले आहे. त्यात, धर्म, वंश, जात, लिंगभेद असा भेदभाव केला जाणार नाही. तसेच मागासलेल्यांना योग्य प्रतिनिधीत्व नसल्यास त्यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवण्यात येतील.

**अनुच्छेद 17:** अस्पृश्यता नष्ट केलेली असून अस्पृश्यतेचे पालन करणे हा गुन्हा मानला आहे. तसेच आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी घटनेत अनुच्छेद - 38, 39 व 40 मध्ये मार्गदर्शक तत्वाद्‌वोर आर्थिक समस्येसंबंधी धोरण सुचविण्यात आले आहे.

घटनेतील अनुच्छेद - 326 नुसार जात, धर्म, वर्ण, लिंग, मालमत्ता यावर आधारीत भेदभाव केला जाणार नाही व सर्व नागरिकांना निवडणुकीला उभे राहण्याचा, मतदान करण्याचा व प्रशासक म्हणून काम पहाण्याच्या अधिकाराबाबत राजकीय न्याय देण्यात आला आहे प्रो. हॅरॉल्ड लास्कीच्या मते - व्यक्तिच्या पूर्ण व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी आवश्यक अशी परिस्थिती म्हणजे स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्य हे केवळ व्यक्तिगत मुल्य नसुन ते सामाजिक मुल्य आहे. समाजातील सर्वच व्यक्तींचा विकास साधने होय.

म्हणून घटनेच्या अनुच्छेद 19 मध्ये स्वातंत्र्याचा अधिकार बहाल करण्यात आला असून व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती, उच्चार, पुजा, संघटना, व्यवसाय, मालमत्ता इ. स्वातंत्र्य देण्यात आले आहे व अनुच्छेद 14 नुसार भारतातील कोणत्याही व्यक्तीस कायदेविष्ज्ञयक समता आणि कायद्याचे समान संरक्षण नाकारले जाणार नाही म्हणून न्यायालयीन सममा मान्य करण्यात आली आहे.

*ISBN: 978-93-90847-09-9*

# प्रकरण 5

# भारतीय लोकशाहीची पायाभरणी आणि ब्रिटीशकालीन कायदे

## 5.1 प्रस्तावना:

इ.स. 1600 मध्ये ब्रिटीश भारतात व्यापाराच्या निमित्ताने आले. अनेक ठिकाणी व्यापारी वसाहती स्थापन झाल्यात. काही कालावधी नंतर ते भारताचे मालकच बनले. ईस्ट इंडीया कंपनीला राणी एलिझाबेथ व्यापार करण्यासाठी सनद दिली.

1950 मध्ये प्लासी लढाईत यश मिळाल्यानंतर बंगाल प्रांतावर व्यापारी सत्ता कंपनीने प्रस्थापित केली. सत्तेचे दृढीकरण करण्याचा ब्रिटीशांनी प्रयत्न केलेत.

संस्थानिकांना ब्रिटीश साम्राज्यात विलीन करण्यात आले. ईस्ट इंडीया कंपनीने भारताच्या राजकारणात हस्तक्षेप केला. नंतरच्या 100 वर्षाच्या काळात राज्यकारभाराची सर्व सत्ता ब्रिटीशांनी आपल्या हातात घेतली. ब्रिटीशांनी भारतीयांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण केले. जनतेचे हित लक्षात न घेता भारतातील सर्व संपत्तीचा ओघ इंग्लंड या देशाकडे जाऊ लागला.

ईस्ट इंडीया कंपनीच्या बाबतीत भारतीय लोकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली. भारतीय लोकांचे हित लक्षात न घेता ब्रिटीश भारतात राज्यकारभार करु लागले. याची परिणती 1857 च्या बंडात झाली. हेच भारतीय स्वातंत्र्याचे पहिले पर्व होते. भारतीय लोकांमधील असंतोष पाहुन

ब्रिटीश सरकारने कायदा करुन ईस्ट इंडीया कंपनीचा सर्व कारभार 1858 साली आपल्याकडे घेतला.

संस्थानिकांना आणि राजांना त्यांच्या प्रदेशाची हमी देण्यात आली. तसेच कोणत्याही स्वरुपाच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप केला जाणार नाही याची ग्वाही दिली. ब्रिटीशांनी भारतातील लोकशाही प्रक्रियेला चालना देण्यासाठी पुढीलप्रमाणे कायदे केलेले दिसून येतात.

**1) प्रथम कौन्सिल कायदा (1861):**

हा कायदा भारतातील लोकशाही निर्मितीतील प्रथम प्रयत्न मानला जातो. या कायदयामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. या कायदयानुसार केंद्रीय विधीमंडळात कमीत कमी सहा आणि जास्तीत जास्त बारा सदस्य नेमण्याचा अधिकार गव्हर्नरला देण्यात आला.

अशाप्रकारे पहिल्यांदाच भारतीयांना कायदेविषयक कार्यामध्ये प्रतिनिधीत्व देण्यात आले. यामुळे भारतीयांना कायदा निर्मिती काम करण्याचा अनुभव आला.

भारतात लोकशाहीच्या निर्मितीला निकोप वातावरण तयार होऊ लागले. 1861 पुर्वी भारत सरकार आणि प्रांतीय सरकारे यांच्यात विषयाबाबत निश्चित स्वरुपात विभागणी केलेली नसल्यामुळे दोन्ही सरकारे परस्परांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करित असत. आयकराच्या प्रश्नांवरुन भारत सरकार आणि मुंबई व मद्रास सरकार यांच्यात मतभेद निर्माण झाले होते. यांच्यातील संघर्ष व मतभेद टाळण्यासाठी या कायद्याची आवश्यकता भासत होती.

**2) दुसरा कौन्सील कायदा (1891):**

लॉर्ड रिपन व लॉर्ड मेयाने केलेल्या ठरावामुळे लोकशाही विकेंद्रीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्य केले. पण त्यामुळे भारतीय जनतेतील असंतोष कमी करु शकले नाहीत.

भारतीयांतील असंतोष कमी व्हावा यासाठी ब्रिटीशांनी हा कायदा केला. या कायद्यामुळे प्रांतिक व केंद्रीय समित्यांमध्ये वाढ करण्यात आली. या समित्यांच्या प्रतिनिधींची अप्रत्यक्ष का होईना निवड करण्यासाठी निवडणूक पध्दतीची सुरुवात केली.

या कायदयानुसार विधी समिती सदस्यांचे अधिकार वाढविण्यात आले. अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा प्रश्न विचारण्याचा अधिकार व टिका करण्याचा अधिकार सदस्यांना देण्यात आला. ब्रिटीश पार्लमेंन्टने दुसऱ्या कौन्सील कायद्यानुसार भारतीय लोकांना काही अधिकार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र हा कायदा जनता व राष्ट्रीय सभेचे समाधान करु शकला नाही.

### 3) **मोर्ले - मिंटो सुधारणा कायदा** (1909):

लॉर्ड कर्झनची दडपशाही स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या स्वायत्ततेचे अपहरण, बंगालचे विभाजन यामुळे भारतीयांमध्ये ब्रिटीश सत्तेविरुध्द तीव्र असंतोष पसरला होता. या असंतोषात ब्रिटीश सरकारचे दुष्काळग्रस्तांबाबतचे अनास्थेचे धोरण आणि ब्रिटीशांचे आर्थिक धोरण यामुळे भारतीयांचा जीवनस्तर दिवसेंदिवस घसरु लागला होता. त्यातून उग्र राष्ट्रवाद आणि क्रांतीकारी राष्ट्रवादाचा उदय झाला. काँग्रेसमधील उदारमतवादी नेत्यांचाही घटनात्मक मार्गावरील विश्वास उडाला.

ब्रिटीशांच्या धोरणामुळे ते असंतुष्ट होते. राष्ट्रीय काँग्रेसची शक्ती वाढत गेली. लॉर्ड कर्झन नंतर मिंटो यांनी जेव्हा भारतीय गव्हर्नर जनरल या पदाची सुत्रे हाती घेतली तेव्हा भारतीयांना संतुष्ट करण्यासाठी लवकरात लवकर काही सुधारणा अंमलात आणणे आवश्यक आहे असे त्यांना वाटु लागले. त्यावेळी भारत सचिव म्हणून लॉर्ड मोर्ले होते. भारतात जास्त काळ निरंकुश शासन पध्दतीचा अवलंब करणे घातक ठरेल याची लॉर्ड मोर्ले यांना कल्पना होती.

या कायद्यानुसार कायदेमंडळातील बिनसरकारी सदस्यांची संख्या वाढविण्यात आली. त्या प्रतिनिधींना कायदेमंडळातील अंदाजपत्रकासहीत सर्व विषयांवर चर्चा करण्याचा, पसंती व नापसंती दाखविण्याचा अधिकार देण्यात आला. पण कायदेमंडळाचे निर्णय गव्हर्नरवर बंधनकारक नसल्याने जबाबदार शासन निर्माण होऊ शकले नाही. या कायदयानुसार मुसलमान व शिखांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले आणि हिंदू व मुलसमानांमध्ये फुट पाडण्याचा प्रयत्न या कायद्याने केला.

## 4) 1919 चा सुधारणा कायदा:

1858 चा राणीचा जाहिरनामा पुढील साठ वर्षांपर्यंत ब्रिटीशांचे भारतातील धोरण ठरवित होता. नंतर परिस्थितीत बदल झाला. नवीन धोरणाची गरज निर्माण झाली. भारतीयांचे प्रशासनात सहभागाची मागणी वाढत होती. पहिल्या महायुध्दात भारताने ब्रिटनला मदत केली. हिंदु व मुसलमान यांच्यातील विरोध वाढत होता. सामाजिक शांततेचा भंग होत होता. ब्रिटीशांना ते हवे होते. या दोघांमधील विरोध लक्षात घेऊन हिंदु व मुस्लीम ऐक्यासाठी लखनौ करार करण्यात आला.

काँग्रेसमध्ये जहाल आणि मवाळ असे दोन गट पडले. 1919 च्या कायद्यानुसार ब्रिटीश भारतात उत्तरदायी शासन प्रस्थापीत करण्याचे ठरविण्यात आले. जबाबदार शासन पध्दत स्थापन करण्यात येईल. भारतासाठी संविधानाची निर्मिती आणि त्यात परिवर्तन करण्याचा अधिकार संसदेला असेल. द्विगृही कायदेमंडळाची निर्मिती करण्यात आली. कनिष्ठ सभागृहाला विधानसभा आणि वरिष्ठ सभागृहाला राज्य परिषद ही नावे देण्यात आली. महत्वाची खाती राखीव ठेवण्यात आली आणि त्याची जबाबदारी ब्रिटीशांकडे देण्यात आली तर कमी महत्वाची खाती भारतीयांकडे देण्यात आली.

शिक्षण, कृषी, आरोग्य ह्या खात्यांची जबाबदारी भारतीयांकडे दिली. केंद्रीय विधीमंडळाला भारतासाठी स्वतंत्र राज्यघटना तयार करता येणार नाही तसेच ब्रिटीश पार्लमेन्टच्या विरोधी कायदा करता येणार नाही. हि बंधने लादल्यामुळे जबाबदार स्वरुपाची राज्य पध्दती निर्माण झाली नाही. तसेच मंत्रीमंडळ व कार्यकारीमंडळात सामंजस्य नव्हते. मंत्री हे एकाच पक्षाचे नव्हते. गव्हर्नरच्या मर्जीवर मंत्रीपद हे अवलंबून होते.

मतदानाचा अधिकार मर्यादित नागरीकांना देण्यात आला. महात्मा गांधीजींनी या कायद्याला विरोध केला. कायदेभंग चळवळ, असहकार आंदोलन, लाहोर येथील अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय निश्चित करण्याचे ठरविण्यात आले. गोलमेज परिषद, पुणे करार व 33 ची श्वेतपत्रीका अशा गोष्टी घडल्यात. त्या सर्वांवर आधारित 1935 चा भारत प्रशासन कायदा करण्यात आला.

### 5) 1935 चा भारत प्रशासन कायदा:

भारताच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने हा कायदा महत्वाचा ठरला. भारतापासुन ब्रम्हदेश वेगळा करण्यात आला. देशातील प्रांताच्या राज्यकारभारासाठी

जबाबदार शासन प्रणालीचा स्विकार करण्यात आला. गव्हर्नरनेही मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने राज्यकारभार करण्याचे ठरले. 1937 मध्ये पहिली सार्वत्रीक निवडणूक झाली. 11 पैकी 8 प्रांतांमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले. काँग्रेसने या प्रांतात सरकारे स्थापन केली. 1939 मध्ये दुसरे महायुध्द सुरु झाले.

ब्रिटीश सरकारने हिंदी जनतेस विश्वासात न घेता, नागरीकांची संमती न घेता भारतात युध्दात उतरविले. याचा काँग्रेस कार्यकारीणीने विरोध केला. या कायद्यानुसार भारतात संघराज्याची निर्मिती करण्यात आली. संरक्षण, पत्रव्यवहार, अर्थ इत्यादी महत्वाचे विषय गव्हर्नर जनरलकडे सोपविण्यात आले. या कायद्यानुसार द्विगृही कायदेमंडळाचा स्विकार करुन प्रातिनिधीक गृहात 375 प्रतिनिधी आणि राज्यसभेत सर्व नियुक्त 260 प्रतिनिधी राहतील. प्रातिनिधीक सभागृहात अल्पसंख्याकांना प्रतिनिधीत्व देऊन त्यांचीही संख्या निश्चित करण्यात आली. मुख्य न्यायाधीश सर मॉरीस ग्वायर हे 1935 च्या कायद्याचे प्रमुख शिल्पकार होते. भारतात प्रातिनिधीक स्वरुपाचे जबाबदार शासन निर्माण करणे हा या कायद्याचा उद्देश होता असे त्यांचे मत होते.

### 6) 1942 ची क्रिप्स योजना:

पंतप्रधान चर्चील यांनी मार्च 1942 मध्ये भारतीयांचा असंतोष कमी करण्यासाठी सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स यांना भारतात पाठविले. क्रिप्स यांनी काँग्रेस, मुस्लीम लिग, हिंदु महासभा आणि संस्थानिकांशी चर्चा केली.

या चर्चेत पुढीलप्रमाणे तरतूदींचा समावेश होता.

अ) अंतर्गत कारभार व परराष्ट्र व्यवहार याविषयी धोरण ठरविण्याचे भारताला पुर्ण स्वातंत्र्य राहील. आवश्यक वाटल्यास राष्ट्रकुलातून बाहेर जाण्याचे स्वातंत्र्य राहील.

आ) भारतासाठी संघराज्य स्थापन करण्यात येईल यात सामील व्हायचे किंवा नाही हे ठरविण्याचे स्वातंत्र्य प्रातांना देण्यात येईल. प्रातांच्या गटाला स्वत:चे संघराज्य स्थापन करता येईल.

इ) युध्द समाप्तीनंतर भारताची घटना बनविण्यासाठी घटना समिती स्थापन करण्यात येईल.

ई) सत्तांतरासाठी ब्रिटीश शासन आणि संकलीत घटना समिती यांच्यात करार होईल, या करारात धार्मिक व वांशीक अल्पसंख्यांकांच्या हक्काच्या रक्षणासाठी खास तरतूदी राहतील.

या क्रिप्स योजनेत भारताच्या भावी स्वातंत्र्याची कल्पना अभिप्रेत होती यात सत्तांतरासाठी योग्य तारीख नव्हती. त्यामुळे महात्मा गांधी यांनी याची संभावना करतांना 'पुढील तारखेचा चेक' असे म्हटले. कैंद्रात राष्ट्रीय सरकार स्थापनेस क्रिप्स मिशनने विरोध केल्याने कॉंग्रेसकडून हि योजना फेटाळण्यात आली.

तसेच मुस्लीम लिगने त्यास विरोध केला. कारण पाकिस्तानच्या मागणीचा समावेश त्यात नव्हता. क्रिप्स योजनेचे कोणालाच समाधान मिळाले नाही. त्यामुळे हि योजना पुर्णपणे फेटाळण्यात येऊन कॉंग्रेसने ताठर भुमीका घेतली आणि 8 ऑगस्ट 1942 रोजी 'चलेजाव' चा ठराव केला आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठी राष्ट्रव्यापी आंदोलन तीव्र करण्यात आले.

**7) कॅबीनेट मिशन योजना:**

इंग्लंडमध्ये दुसऱ्या महायुध्दानंतर सत्तांतर झाले. मजूर पक्षाचे नेते ॲटली पंतप्रधान झाले. भारतास लवकरात लवकर स्वराज्य देण्यात येईल अशी त्यांनी घोषणा केली. त्यांनी भारतात कॅबीनेट मिशन पाठविले. लॉर्ड वेव्हेल यांनी भारताच्या भविष्याविषयी चर्चा करण्यासाठी सिमला परिषद भरविली. परंतु ही परिषद अपयशी ठरली.

नंतर पंतप्रधान ॲटली यांनी लाड्र पेथीक लॉरेन्स, सर स्ट्रॅफोर्क क्रिप्स, ए.व्ही. अलेक्झांडर या तीन मंत्र्यांचे शिष्टमंडळ भारतात पाठविले. त्यांनी भारतातील संस्थानिक, राजकीय पक्ष यांच्याशी चर्चा केली. 16 मार्च 1946 रोजी त्यांनी आपली योजना सादर केली. त्यातील तरतूदी पुढीलप्रमाणे

1)या योजनेनुसार हिंदुस्थानात संघराज्य निर्माण करुन हिंदुस्थान अखंड राहणार होता. या संघराज्यास संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, दळणवळण या विषयांवर कायदा करण्याचा आणि पैसा उभा करण्याचा अधिकार राहील.
2)संघराज्यासाठी ब्रिटीश प्रांत आणि संस्था यांच्या प्रतिनिाधींचा समतोल असलेले विधीमंडळ व कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात यावे.
3)प्रांतिक विधासभेच्या सदस्यांकडुन घटना समितीच्या सदस्यांची निवड करावी. सदस्यांची संख्या प्रांतातील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार राहील.

धार्मिक व जातीयतेचा प्रश्न हे बहुमताच्या आधारे सोडविले जाणार होते. घटनेच्या निर्मितीसाठी घटना परिषद स्थापनेस मान्यता देण्यात आली. घटना समिती तयार होईपर्यंत पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यात आले. मात्र पाकिस्तानच्या निर्मितीसाठी मुस्लीम लीगने घटनेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला.

पाकीस्ताची मागणी मान्य व्हावी म्हणून प्रत्यक्ष कृतीदिन साजरा करण्यात आला. संपूर्ण हिंदुस्थानात हिंदु व मुसलमान यांच्यात दंगली सुरु झाल्या.

**8) फाळणीची योजना:**

लॉर्ड माउंटबॅटन हे 24 मार्च 1947 राजी भारताचे गव्हर्नर झाले. त्यावेळी भारतात अशांतता होती. सर्वदूर जातीय व धार्मिक दंगलीचे लोण पसरले होते. बंगाल व पंजाबमध्ये फाळणीचे प्रयत्न सुरु होते. यामुळे भारताचे अंखडत्व राखणे शक्य नव्हते. लॉर्ड माउंटबॅटन यांनी भारतातील नेत्यांशी चर्चा केली. नंतर ते ब्रिटीश शासनाशी चर्चा करण्यासाठी इंग्लंडला गेले. परत आल्यानंतर 3 जून 1947 रोजी त्यांनी आपली अंतीम योजना मांडली. त्यानुसार हिंदुस्थानची निर्मिती होणार होती. ज्या भागात मुसलमान बहुसंख्य आहेत उदा. पुर्व बंगाल, पश्चिम पंजाब, सिंध यांचा समावेश पाकिस्तानात होणार होता. सरहद्द प्रांत व बलुचिस्तान या प्रदेशांनी कोठे सामील व्हावे हे सार्वमत घेऊन ठरवावे. हिंदुस्थानातील संस्थानीकांनी भारतात किंवा पाकीस्तानात सामील व्हावे असे सुचविले.

भारत व पाकीस्तान यांच्यासाठी वेगवेगळी कायदेमंडळे अस्तित्वात येणार होती. भारतीय जनतेच्या ईच्छेनुसार सत्ता हस्तांतरीत करावी या दोन्ही देशांसाठी वेगवेगळ्या घटना समित्या असतील आणि फाळणी मान्य झाल्यावर भारत व पाकीस्तान या दोन्ही देशांच्या सिमा निश्चित केल्या जातील.

मुस्लीम लिगने या योजनेला 9 जून तर कॉँग्रेसने 15 जून 1947 रोजी मान्यता दिली. 4 जुलै 1947 रोजी याविषयीचे एक विधेयक ब्रिटीश पार्लमेन्टमध्ये मांडण्यात आले. 18 जुलै 1947 या दिवशी या विधेयकास मान्यता देण्यात

आली. अशारितीने भारत आणि पाकिस्तान या दोन स्वतंत्र राष्ट्रांची निर्मिती झाली.

**9) भारतीय स्वातंत्र्याचा कायदा:**

15 ऑगस्ट 1947 या दिवशी भारत आणि पाकिस्तान ही दोन राष्ट्र स्थापन करण्यात आली. दोन्ही देशांसाठी ब्रिटीशांनी एक गव्हर्नर जनरल नेमला. दोन्ही देशात स्वतंत्र कायदेमंडळे असतील. आपल्या देशासाठी कायदे करण्याचा अधिकार त्यांना देण्यात आला. 15 ऑगस्ट 1947 नंतर भारतासंबंधी कोणतीही जबाबदारी ब्रिटीश सरकारवर असणार नाही. लष्करी दले, मालमत्ता, देणी-घेणी यांचे वाटप करण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात येईल. नवीन राज्यघटना निर्माण होईपर्यंत घटना समित्या कायदेमंडळाचे काम करतील. या समित्यांना ब्रिटीश कायद्यात दुरुस्त्या करण्याचा अधिकार देण्यात आला.

हिंदी संस्थानावरील ब्रिटीशांची सत्ता संपुष्टात येईल व त्यांना त्यांच्या निवडीप्रमाणे भारत किंवा पाकिस्तानात सामील होता येईल. स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर लॉर्ड माउंटबॅटन झाले. पंडित जवाहरलाल नेहरु हे भारताचे पहिले पंतप्रधान झाले. राजगोपालचारी हे 1948 मध्ये भारताचे गव्हर्नर जनरल झाले. भारत मंत्र्याचे पद संपुष्ट करण्यात आले.

नवीन राज्यघटना तयार होईपर्यंत प्रत्येक राज्याचा आणि प्रांताचा राज्यकारभार 1935 च्या भारत प्रशासन कायद्यानुसार चालविण्यात येईल. कॅबीनेट मिशननुसार भारतासाठी राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समिती नेमण्यात आली. घटना समितीने घटना बनविण्याचे काम सुरु केले. 29 ऑगस्ट 1947 रोजी घटना समितीने मसुदा समिती नेमली. मसुदा

समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी आपला अहवाल 21 फेब्रुवारी 1949 रोजी तयार केला आणि 5 नोव्हेंबर 1949 या दिवशी समितीने घटना स्वीकृत व मान्य केली. 26 जानेवारी 1950 पासून घटनेची अंमलबजावणी सुरु झाली. घटना तयार करण्यासाठी 2 वर्षे 11 महिने 18 दिवस इतका कालखंड लागला. घटनेच्या आराखड्यानुसार 114 दिवस विस्तृत चर्चा झाली.

ब्रिटीशांनी केलेल्या वरील कायद्यामुळे भारतातील संसदिय लोकशाहीच्या विकासास व पायाभरणीस मदत झालेली असल्याने या कायद्याचा अभ्यास करणे महत्वाचे व आवश्यक आहे.

ISBN: 978-93-90847-09-9

# प्रकरण - 6

# भारतीय लोकशाहीतील महिलांचे सबलीकरण

## 6.1 प्रस्तावना:

स्वातंत्र्यानंतर भारतीय घटनेने सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात दर्जा आणि संधीच्या दृष्टीने स्त्री-पुरुषांमध्ये समानता प्रस्थापित केली आहे. धर्म, वंश, जात, भाषा, लिपी, संस्कृती इत्यादीच्या आधारावर भेदभाव करण्यास कायद्याने बंदी घातली आहे. परंतू समाजात स्त्री पुरुष अशी विषमता दिसुन येते.

म्हणून सबलीकरणाची गरज आहे. देशात जवळजवळ संख्येने निम्म्या असलेल्या महिलांना समाजात स्थान नाही म्हणून भारतीय लोकशाहीत महिलांचे सबलीकरण होणे गरजेचे आहे, जेणेकरुन महिलांचा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकास होऊ शकेल.

महिलांचे सबलीकरण करण्याची आवश्यकता पुरुषी वर्चस्वाची मानसिकता दुर करुनच सबलीकरणाची प्रक्रिया होणे योग्य ठरणार आहे.

- **विषयाचे महत्व:**

हजारो वर्षांपासून पुरुषांच्या मानसिक संस्कृतीमध्ये अडकलेली स्त्री आता हळूहळू स्वयंपुर्णरित्या आर्थिक विकासावर स्वावलंबनाने चाललेली आहे. तसेच सामाजिक, राजकीय आणि आर्थिक दृष्टीकोनातून सक्षम होण्याचा ती निर्धार करीत आहे. हे करीत असतांना स्त्रियांना अनेक संकटांना तोंड द्यावे

लागते. त्यासाठी समाजातील पुरुषांच्या मानसिकतेत बदल होणे महत्वाचे आहे आणि महिलांचे सबलीकरण होण्याची आवश्यकतेची खात्री झालेली आहे.

- **सबलीकरण म्हणजे काय?**

भारतीय लोकशाहीत सबलीकरण म्हणजे स्त्रीयांना सर्व क्षेत्रामध्येस्वावलंबी बनविणे असा अर्थ घेतला जातो. समाजात स्त्रीयांवर अन्याय केला जातो. त्या अन्यायाची भरपाई करणे म्हणजे कायदेविषयक नैतीक अधिकार देणे होय. नैसर्गिक अधिकार देणे म्हणजे सुध्दा सबलीकरण होय. समानता या गोष्टीवर महिलांचे सबलीकरण अवलंबून असते. समाजात स्त्री-पुरुष विषमतेवर आधारीत श्रमविभागणीत बदल झाला पाहिजे. तरच महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल, आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मुल्यांना लोकशाहीत अर्थ प्राप्त होईल.

जो घटक लोकशाही व्यवस्थेपासुन वंचीत आहे त्यांचा विकास करण्यासाठी सरकार कटीबंध असते. देशाचा विकास आणि महिलांचे सबलीकरणाची खरी सुरुवात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारातून रुजविण्याचा प्रयत्न झाला पण त्यांच्या मार्गात विविध अडथळे निर्माण करण्यात आले. त्यांनी अस्पृश्य महिला आणि विधवांना 1852 मध्ये आपल्या सुरु केलेल्या शाळेत प्रवेश दिला होता. महिलांचे सबलीकरण झाले तर समाज खऱ्या अर्थाने सामथ्र्यशाली होऊ शकतो. त्यासाठी शिक्षण हा घटक महत्वाचा असतो शिक्षणाने संस्कार होतात आणि त्या संस्कारातून चांगल्या संस्कृतीचा उदय होतो आणि संस्कारीत पिढी देशासाठी चांगले काम करु शकते.

- **शिक्षणातून महिलांचे सबलीकरण:**

कौशल्य वाढीसाठी किमान साक्षरता असावी लागते. स्त्रीयांची शैक्षणिक पात्रता आणि स्वच्छता, आरोग्य, मुलींचे शिक्षण, कुटूंबाचे कल्याण याचा परस्पर संबंध असतो हे आता सिध्द झाले आहे.

1988-1989 च्या जागतिक अहवालानुसार स्त्री शिक्षण हे आर्थिक विकासासाठी सहाय्यभूत ठरते. शिक्षणामुळेच स्त्रीयांमधील सुप्त गुणांचा विकास होतो. भारतीय सामाजिकशास्त्रे परिषदेतर्फे (1969-79) शिक्षणासंदर्भात सांगण्यात आले होते की, शिक्षणाचे सर्वात महत्वपूर्ण उद्दिष्ट म्हणजे समाजाला आधुनिक बनविणे होय.

सुप्रसिध्द समाजसेविका दुर्गाबाई देशमुख यांच्या मते, "एका मुलाचे शिक्षण म्हणजे एका व्यक्तीचे शिक्षण होय, तर "एका मुलीचे शिक्षण म्हणजे संपूर्ण कुटुंबाचे शिक्षण होय." म. जोतीबा फुले यांचे स्पष्ट मत होते की, "कोणताही समाज तोपर्यंत खऱ्या अर्थाने साक्षर होत नाही जोपर्यंत त्या समाजातील स्त्रीया साक्षर होत नाहीत." एक साक्षर महिला कुटूंबात जे सुसंस्कार टाकू शकते ते काम हजार शिक्षक व गुरु करु शकत नाहीत.

केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारने अनेक चांगले निर्णय महिलांच्या शिक्षणासाठी घेतले हे स्वागतार्ह आहे, पण शहरी मुलींपेक्षा ग्रामीण भागातील मुलींचे गैरहजेरीचे प्रमाण सर्वात जास्त आहे असे दिसुन आले. त्यास अनेक कौटुंबिक व सामाजिक कारणे असु शकतात. शिक्षणातील मुलींच्या गळतीच्या कारणांचा शोध घेऊन उपाययोजना राबविल्या पाहिजेत. त्यासाठी सामाजिक, राजकीय धुरीणांचे आणि स्वयंसेवी संस्था व संघटनांनी कार्यरत असले पाहिजे.

- **महिलांचा राजकारणातील सहभाग:**

ग्रामीण महिलांच्या सबलीकरणासाठी पंचायतराज व्यवस्था ही अत्यंत महत्वाची व्यवस्था आहे. चुल आणि मुल या संकल्पनेपलीकडे पुर्वी महिला जात नव्हत्या. परंतू 73 व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायतराज संस्थांमधील सत्तेची दारे महिलांसाठी खुली झाली आणि मोठ्या प्रमाणात महिला राजकारणात पुढे आल्या आणि मुक्तपणे विविध क्षेत्रात भरारी घेऊ लागल्या आहेत. नुकताच महाराष्ट्र शासनाने पंचायत राजव्यवस्थेत 33% वरुन 50% पर्यंत महिला आरक्षणाचा निर्णय घेतला आहे.

ही महिला सबलीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. पंचायत राज व्यवस्थेत महिलांना संधी मिळाल्याने त्यांनी ग्रामपंचात पासुन ते जिल्हापरिषद पर्यंत आजपर्यंतची कामगिरी कौतुकास्पद आहे. महिला खऱ्या अर्थाने सक्षम व्हावयाच्या असतील तर त्यांना केंद्र व राज्यसरकारमध्ये 33% जागांचे आरक्षण मिळाले पाहिजे.

- **बचतगटांच्या माध्यमाद्वारे सबलीकरण:**

बचत गटाच्या माध्यमातून असहाय्य व दारिद्रयामध्ये जीवन जगणाऱ्या लोकांच्या आयुष्यात क्रांतीकारक बदल घडून आला आहे. बचत गटाच्या स्थापनेमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांचाच अधिक पुढाकार आहे. हजारो वर्षांपासून पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये अडकलेली महिला अनेक वर्षांपासून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये स्त्रीयांनी नेत्रदिपक कामगिरी केली आहे, आणि आता ग्रामीण महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्टा सक्षम होण्याचा निर्धार केला आहे. दारिद्रय, व्यसनाधिनता, निरक्षरता, सामाजिक अन्याय, अत्याचार या विळख्यात खितपत पडलेल्या असहाय्य अबला यांच्या जीवनात बचत गटाने नविन पहाट उगवली आहे.

- **मूल्यमापन:**

स्त्रीविना पुरुषांचे अस्तित्व अशक्य आहे. जगाचे भवितव्य स्त्री जातीच्या हाती आहे. स्त्री ही दुर्बल नाही तर पुरुषांइतकीच थोर आहे. भारतीय महिला अबला नाहीत. तिच्या शुर कृत्याची इतिहास साक्ष देत आहे. थोडक्यात स्त्री पुरुषांत असणारी विषमता नष्ट केली पाहिजे. ज्या जातीत वा देशात स्त्री वर्गाला मान दिला जात नाही त्या जातीला किंवा त्या देशाला सुसंस्कृत म्हणता येत नाही. आज महिलांवरील अत्याचार वाढत आहेत.

शिक्षणासाठी संधी मिळत नाहीत, विधवांना अपमानास्पद वागणूक, मुलगा-मुलगी भेद, लैंगिक छळ, हुंडाबळी अशा अनेक गोष्टी आहेत त्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कायद्याचे काटेकोर पालन करुन देशाच्या विकासामध्ये महिलांचा सहभाग वाढवुन त्यांना सबला करुन त्यांचे सक्षमीकरण करणे महत्वाचे व उपयुक्त आहे.

ISBN: 978-93-90847-09-9

# प्रकरण-7

# अल्पबचतगट योजनेद्वारा महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण

## 7.1 प्रस्तावना:

भारत देशास 21 व्या शतकातील स्वयंसहाय्यता अल्पबचत गट ही महान देणे लाभलेली आहे. भारत हा देश खेड्यांचा आहे. कारण या देशातील जास्तीत जास्त जनता ही खेड्यामध्ये वास्तव्य करते. 1921 मध्ये 88.8 टक्के जनता, 1941 मध्ये 86.8 टक्के जनता आणि 1951 मध्ये 82.7 टक्के जनता ग्रामीण भागात राहत होती.

1971 च्या जनगणनेनुसार भारताची एकूण 54.82 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत होती. म्हणजेच 10.92 करोड किंवा 20 टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव करीत होती. म्हणजेच 1921-1971 पर्यंत संथ गतीने शहरीकरण होत होते. म्हणूनच आजही भारताला खेड्यांचा देश असे संबोधले जाते व सोबतच या देशात छोट्या छोट्या गावांची संख्या अधिक आहे. आणि त्यांचा विकास करणे गरजेचे आहे. जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागातील वाड्या, वस्त्या, पाडे, तांडे, खेडी मध्ये वसत आहे. आज भारताची एकूण लोकसंख्या 115 कोटी पेक्षा जास्त आहे. त्यातील 70 टक्के जनता ही ग्रामीण भागात राहते.

भारतातील एकूण लोकसंख्येपैकी 70 टक्के जनता ही शेती उद्योग व्यवसायाशी निगडीत आहे. म्हणूनच भारताला कृषीप्रधान देश म्हटले जाते. एकूण भारतीय लोकांच्या साक्षरतेचे प्रमाण 35 टक्क्या इतके आहे. त्यापैकी

ग्रामीण भागातील लोकांच्या साक्षरतेचे प्रमाण हे 20-25 टक्क्यांच्या आतच आहे. जेथे जेथे निरक्षरतेचे प्रमाण अधिक असते तेथे तेथे गरिबी आणि दारिद्रय देखील अधिक असते.

भारतात दरडोई उत्पन्न साधारणत: 20 रु. आहे. आता भारत हा देश जगातील महाशक्ती होऊ पाहत आहे हे सातत्याने ऐकतो आणि हे जरुर सत्य आहे की, भारत महाशक्ती बनण्याच्या उंबरठ्यावर आहे.

परंतु देशांतर्गत सत्यता पडताळून पाहावयाची असेल तर आपल्याला असे दिसेल की, भारतीय एकूण लोकसंख्येच्या 5 टक्के लोकांकडे भारतीय संपत्तीच्या 84% संपत्ती आहे. उर्वरित 83% लोकांकडे 12% संपत्ती आहे तर उर्वरित 02 ते 03 टक्के लोक निर्धन आहेत. इतकी भिषण तफावत आणि विषमता भारतात अंतर्गत नांदत आहे. हे सत्य नाकारता येऊ शकणार नाही. भारताने जगातील एकूण जमिनीपैकी 1/3 भूभाग व्यापलेला आहे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी साधारणत: 115 ते 118 करोड लोकसंख्येचा विशालकाय देश म्हणजे भारत आहे. भारतात साधारणपणे 6 लाख 38 हजार 365 खेडी आहेत. भारताच्या देशपातळीवरील साक्षरतेचे प्रमाण 35 टक्के एवढे आहे.

जेवढा विशालकाय देश तेवढ्याच प्रचंड अडचणी/समस्या या देशात आहेत. आपल्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने दारिद्रय देखील जास्त आहे म्हणून कोणीही सुखी आणि समाधानी नाही. तसेच स्वावलंबीही नाही. लोकसंख्या जास्त असल्याने सर्व क्षेत्रांमध्ये देखील समस्यांचे प्रमाण जास्त आहे. अशा परिस्थितीत भारतीय समाजाच्या विभीन्न समस्यांचे निराकरण करण्यासाठी, समाधान करण्यासाठी स्वयंसहाय्यता अल्पबचत गट मुलगामी ठरणार आहेत.

स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या माध्यमातुन महिला गाव विकासात सक्रीय सहभाग सुध्दा होऊ शकतात. महाराष्ट्रात पंचायतराज पध्दत असल्याने महिलांच्या 2 ग्रामसभा राज्य सरकारच्या नियमानुसार अतिआवश्यक मानल्या गेल्या आहेत. त्यामुळे जर बचत गटाच्या 11 ते 20 महिला जर ग्राम सभेत गेल्या तर ग्रामपंचायतीच्या येणाऱ्या योजना गाव विकासात योग्य योगदान देवू शकतात. एक स्त्री बचत गटाच्या माध्यमातुन संपूर्ण गावाला पुढे नेई हे तत्व लागु होते. तसेच शिक्षणाचा स्तर प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातुन महिला स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या सहाय्याने सुरु करु शकतात आणि त्यातुन महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होईल.

- **विषयाची ओळख:**

देशाची अर्थव्यवस्था अविकसीत, विकसनशीलआणि विकसीत यापैकी कोणत्याही स्वरुपाची असली तरी प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेचे उद्‌दिष्ट आर्थिक विकास करणे हे असते. विकास ही दिर्घकालीन सुरु असणारी प्रक्रिया आहे. समाज जीवनामध्ये घडणाऱ्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि अल्पबचतगट योजनेद्‌वारा महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण

- **प्रस्तावना (Preface):**

भारत देशास 21 व्या शतकातील स्वयंसहाय्यता अल्पबचत गट ही महान दे◌ेण लाभलेली आहे. भारत हा देश खेड्यांचा आहे. कारण या देशातील जास्तीत जास्त जनता ही खेड्यामध्ये वास्तव्य करते. 1921 मध्ये 88.8 टक्के जनता, 1941 मध्ये 86.8 टक्के जनता आणि 1951 मध्ये 82.7 टक्के जनता ग्रामीण भागात राहत होती. 1971 च्या जनगणनेनुसार भारताची एकूण 54.82 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत होती. म्हणजेच 10.92

करोड किंवा 20 टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव करीत होती. म्हणजेच 1921-1971 पर्यंत संथ गतीने शहरीकरण होत होते.

म्हणूनच आजही भारताला खेड्यांचा देश असे संबोधले जाते व सोबतच या देशात छोट्या छोट्या गावांची संख्या अधिक आहे. आणि त्यांचा विकास करणे गरजेचे आहे.

जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागातील वाड्या, वस्त्या, पाडे, तांडे, खेडी मध्ये वसत आहे. आज भारताची एकूण लोकसंख्या 115 कोटी पेक्षा जास्त आहे. त्यातील 70 टक्के जनता ही ग्रामीण भागात राहते.

भारतातील एकूण लोकसंख्येपैकी 70 टक्के जनता ही शेती उद्योग व्यवसायाशी निगडीत आहे. म्हणूनच भारताला कृषीप्रधान देश म्हटले जाते. एकूण भारतीय लोकांच्या साक्षरतेचे प्रमाण 35 टक्क्या इतके आहे. त्यापैकी ग्रामीण भागातील लोकांच्या साक्षरतेचे प्रमाण हे 20-25 टक्क्यांच्या आतच आहे. जेथे जेथे निरक्षरतेचे प्रमाण अधिक असते तेथे तेथे गरिबी आणि दारिद्रय देखील अधिक असते. भारतात दरडोई उत्पन्न साधारणत: 20 रु. आहे. आता भारत हा देश जगातील महाशक्ती होऊ पाहत आहे हे सातत्याने ऐकतो आणि हे जरुर सत्य आहे की, भारत महाशक्ती बनण्याच्या उंबरठ्यावर आहे.

परंतु देशांतर्गत सत्यता पडताळून पाहावयाची असेल तर आपल्याला असे दिसेल की, भारतीय एकूण लोकसंख्येच्या 5 टक्के लोकांकडे भारतीय संपत्तीच्या 84% संपत्ती आहे. उर्वरित 83% लोकांकडे 12% संपत्ती आहे तर उर्वरित 02 ते 03 टक्के लोक निर्धन आहेत. इतकी भिषण तफावत आणि विषमता भारतात अंतर्गत नांदत आहे. हे सत्य नाकारता येऊ शकणार नाही.

भारताने जगातील एकूण जमिनीपैकी 1/3 भूभाग व्यापलेला आहे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी साधारणत: 115 ते 118 करोड लोकसंख्येचा विशालकाय देश म्हणजे भारत आहे. भारतात साधारणपणे 6 लाख 38 हजार 365 खेडी आहेत. भारताच्या देशपातळीवरील साक्षरतेचे प्रमाण 35 टक्के एवढे आहे. जेवढा विशालकाय देश तेवढ्याच प्रचंड अडचणी/समस्या या देशात आहेत. आपल्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने दारिद्रय देखील जास्त आहे म्हणून कोणीही सुखी आणि समाधानी नाही. तसेच स्वावलंबीही नाही.

लोकसंख्या जास्त असल्याने सर्व क्षेत्रांमध्ये देखील समस्यांचे प्रमाण जास्त आहे. अशा परिस्थितीत भारतीय समाजाच्या विभीन्न समस्यांचे निराकरण करण्यासाठी, समाधान करण्यासाठी स्वयंसहाय्यता अल्पबचत गट मुलगामी ठरणार आहेत.

स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या माध्यमातुन महिला गाव विकासात सक्रीय सहभाग सुध्दा होऊ शकतात. महाराष्ट्रात पंचायतराज पध्दत असल्याने महिलांच्या 2 ग्रामसभा राज्य सरकारच्या नियमानुसार अतिआवश्यक मानल्या गेल्या आहेत.

त्यामुळे जर बचत गटाच्या 11 ते 20 महिला जर ग्राम सभेत गेल्या तर ग्रामपंचायतीच्या येणाऱ्या योजना गाव विकासात योग्य योगदान देवू शकतात. एक स्त्री बचत गटाच्या माध्यमातुन संपूर्ण गावाला पुढे नेई हे तत्व लागु होते. तसेच शिक्षणाचा स्तर प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातुन महिला स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या सहाय्याने सुरु करु शकतात आणि त्यातुन महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होईल.

- **विषयाची ओळख:**

देशाची अर्थव्यवस्था अविकसीत, विकसनशीलआणि विकसीत यापैकी कोणत्याही स्वरुपाची असली तरी प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट आर्थिक विकास करणे हे असते. विकास ही दिर्घकालीन सुरु असणारी प्रक्रिया आहे. समाज जीवनामध्ये घडणाऱ्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक घडामोडीवर विकास अवलंबून असतो. विकास म्हणजे संरचनात्मक बदलासहित आर्थिक वृध्दी होय. हा बदल जेवढ्याच प्रमाणात आर्थिक स्वरुपाचा असतो तितक्याच प्रमाणात सामाजिक आणि सांस्कृतिक देखील असतो. विकास हा गुणात्मक व संख्यात्मक असतो आणि विकास म्हणजे सर्वसामान्य लोकांच्या राहणीमानात होणारा सकारात्मक बदल होय.

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने ग्रामीण विकासाशिवाय राष्ट्राचा विकास होऊच शकत नाही. यामुळे ग्रामीण विकास ही आर्थिक विकासाची पूर्वअट होय. भारताच्या एकूण परिस्थितीचा विचार केला तर असे आढळून येते की, भारताची ग्रामीण परिस्थिती आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक पूर्णत: भिन्न स्वरुपाची आहे. याद्दष्टीने ग्रामीण विकासासाठी पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातुन अनेक योजना राबविल्या जात आहेत आणि त्यात स्थानिक स्वराज्य संस्थेचा वाटा फार महत्वाचा आहे. तसेच ग्रामीण विकासातील स्वर्णजयंती ग्राम स्वयंम रोजगार योजनेअंतर्गत बचतगटाच्या माध्यमातुन महिलांचा विकास होतो.

- **विषयाचे महत्व:**

स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या माध्यमातून समाजातील दुर्बल, असहाय्य, दारिद्र्यामध्ये जीवन व्यतीत करणाऱ्या लोकांमध्ये क्रांतीकारक

स्वरुपाचा बदल घडून येत आहे. अल्पबचत गटाच्या स्थापनेत पुरुषांपेक्षा महिलांचे प्रमाण जास्त दिसून येते. हजारो वर्षांपासुन पुरुषांच्या मानसिक संस्कृतीमध्ये अडकलेली स्त्री आता हळूहळू स्वयंपुर्णरित्या आर्थिक विकासावर स्वावलंबनाने चाललेली आहेत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांचा सहभाग वाढताना दिसून येत आहे. आज ग्रामीण महिला अल्पबचत गटांच्या माध्यमातुन आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टीकोनातुन सक्षम होण्याचा निर्धार करीत आहेत.

समाजात असलेले दारिद्रय, व्यवसायामधील रुढी, प्रथा, परंपरेच्या मानसिकतेतून बाहेर येऊन महिला आपल्या अल्पबचत गटांच्या माध्यमातून आपल्या जीवनाला स्थौर्य प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेच अल्पबचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासात आपला हातभार लावीत असल्याचे चित्र महाराष्ट्रात सर्व ठिकाणी दिसत आहे. ग्रामीण भागात अल्पबचत गटांच्या माध्यमातून जी क्रांती घडून आलेली आहे ती उल्लेखनिय आहे.

अल्पबचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रात वाढलेली आर्थिक उलाढाल, लघुउद्योगांना मिळणारी चालना, त्यातुन ग्रामीण महिलांच्या हाती आलेले आर्थिक नियंत्रण त्या आधारावर त्यांच्यात झालेले सामाजिक, आर्थिक सबलीकरण व जनजागरण ग्रामीण विकासात गती देण्याचे कारण ठरले.

- **संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. स्त्रोतांमध्ये प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, इ. चा वापर करण्यात आला आहे.

संकलित माहितीच्या आधारे शोधनिंबधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

- **अध्ययन उद्देश:**

प्रस्तुत संशोधन लेखाच्या अभ्यासाकरिता पुढील उद्देशांचा अभ्यास केला आहे.

1) महिलांना संघटीत करणे - महिलांचे अल्पबचत गट तयार करुन शहरी व ग्रामीण महिलांना संघटीत करणे व त्यांच्यात शिस्त, एकता, धौर्य निर्माण करुन आपल्यासाठी कोणतेही काम कठीण नसल्याची भावना निर्माण करणे.
2) ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्टा सक्षम करणे आणि त्यांच्या श्रमाला आर्थिक प्रतिष्ठा मिळवून देणे.
3) महिला अल्पबचत गटांची चळवळ ही फक्त महिलांच्या आर्थिक उन्नतीची चळवळ न राहता तिला सामाजिक प्रतिष्ठेची चळवळ बनविणे.
4) महिला बचत गटांना संघटीत करुन त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांच्या वस्तुंसाठी बाजारपेठ मिळवुन देण्याचा प्रयत्न करणे.
5) बहुतेक महिलाअल्पबचत गट हे कुरडया, पापड बनविणे, लोणचे बनविणे यासारख्या पारंपारीक उद्योगांमध्ये असलेले दिसुन येतात.
या पारंपारीक उद्योगधंद्यांपासुन बाहेरपडुन नविन उद्योगधंदे सुरु करण्याची प्रेरणा महिलांमध्ये निर्माण करणे.
6) कोणत्याही उद्योगधंद्यांमध्ये व्यवस्थापन हे महत्वाची भूमिका बजावते. यासाठी महिला अल्पबचत गटांना आधुनिक व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे.
7) कष्ट आणि मेहनतीतुन आकाराला आलेल्या महिला अपबचत गट चळवळीला अभ्यासपुर्ण दिशा मिळावी, तिच्यातल्या व्यवस्थापन

कौशल्याबरोबरच शासन दरबारी तिच्यासाठी असलेल्या विविध योजनांची माहिती तिला मिळावी यासाठी विशेष मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन करणे.

8) परसबाग व फळबागचे महत्व अभ्यासणे:- स्वत:च्या खाली असणाऱ्या जागेत छोटीसी परसबाग व फळबाग तयार करुन बाजारातून भाजीपाला विकत आणण्यापेक्षा स्वत:च उत्पादन तयार करुन कुटूंबाच्या उपयोगासाठी परसबागेचे महत्व समजावून सांगणे.

9) स्वच्छता व आरोग्यविषयक कार्यक्रमाचे महत्व सांगणे:- आपल्या परिसरात स्वच्छता राखण्यासाठी घर तेथे शैचालय निर्माण करुन आपले व परिसरातील आरोग्य सांभाळण्यासाठी माहिती देवून महिलांना स्वत:चे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी प्रोटीनयुक्त आहार व पल्स पोलीओ लसीकरण आणि कुटूंब कल्याण विषयक कार्यक्रम समजावून सांगणे.

10) शैक्षणिक उपक्रम हाती घेणे व त्याचे महत्व सांगणे - "हम दो हमारे दो" ची भावना मनात ठेवून मुलगा असो की मुलगी असा कोणताही भेदभाव मनात न ठेवता सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे म्हणून प्रयत्न करणे.

11) रोजगाराभिमुख कार्यक्रम राबविणे:-महिला अल्पबचत गटाच्या माध्यमातून महिलांना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणे. त्यांचा आर्थिक व कौटुंबिक विकास कसा करता येई याकडे लक्ष देणे.

- **संशोधनाची गृहितके:**

1) अल्पबचत योजनेमुळे महिला स्वावलंबी बनतात.

2) आर्थिक सबलीकरणामुळे स्त्रीयांचे परावलंबन कमी होते.

3) आर्थिक सक्षमतेमुळे महिला सबलीकरण घडून येते.

4) महिला सबलीकरणातून राजकीय सहभाग वाढतो.

5) बचतगटांमुळे महिलांचा जीवनस्तर उंचावण्यास मदत होते.

6) अल्पबचत गटांच्या चळवळीतून विधायक नेतृत्व जन्मास येते.
7) जनसहभाग वाढविणारे नेतृत्व लोकशाहीस पूरक ठरते.
8) अल्पबचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना आर्थिक विकासाच्या संधी प्राप्त होण्यास मदत होते.
9) महिला अल्पबचत गटांमुळे ग्रामीण भागातील खेडी सावकारमुक्त होण्यास मदत होईल.

आजच्या बचतगटांची पाश्र्वभूमी महाराष्ट्रात 1970 पासुनच झाली होती. कारण 1970 च्या दरम्यान इलबेन भटांनी महिला व सुक्ष्मवित्तपुरवठा या विषयाची मांडणी केली होती. 1988 नंतर बचतगटांनी चळवळीचे रुप धारण केल्याचे दिसुन येते. महाराष्ट्रात सन 1970 च्या दशकापासुन स्वयंसहाय्यता समुह चळवळ सुरु असली तरी 1993 मध्ये ग्रामीण पतपुरवठा योजनेअंतर्गत चालना देण्यात आली.

सन 1999 मध्ये सुवर्णजयंती ग्रामरोजगारातंर्गत दारिद्रय निर्मुलन करण्यासाठी ग्रामीण भागात बचत गट योजना जोमाने सुरु झालेली आहे. महाराष्ट्रात 2002-03 मध्ये 8446 स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करण्यात आले होते. त्यांना 274.00 कोटी कर्ज पुरवठा करण्यात आला. 2006-07 मध्ये 94386 स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन झालेले असुन त्यांना 2133.64 कोटी वित्त सहाय्य प्राप्त झालेले आहे.

महिला बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना सबीकरणासाठी मोठी गती मिळालेली आहे. बचत गटामुळे ग्रामीण भागामध्ये शेतकरी वर्गात नवा उत्साह संचारला आहे. बचतगटाच्या माध्यमातुन कर्ज घेण्यात येऊ लागले आहेत. व 1282 कोटी रुपये देण्यात आले आहेत. बचतगटातील योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांमध्ये आर्थिक

विकासासाठी स्वंयस्थौर्य प्रस्तापीत करण्याचा प्रयत्न झालेला दिसुन येतो. बचत गटाच्या माध्यमाद्वारे समाजातील दुर्बल, आदिवासी, दरिद्री लोकांमध्ये क्रांतीकारक बदल घडून आला आहे. बचतीच्या माध्यमातून एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीबरोबर संबंध जोडण्याचे काम होत असते आणि सतत चुल आणि मुलांमध्ये राहणाऱ्या स्त्रीला एक विरंगुळा बचतगटाच्या माध्यमातुन मिळु शकतो. गटामध्ये प्रत्येक मिटींगला महिलांनी हळदी, कुंकू, खेळ, भाषण या गोष्टी सुरु ठेवल्यास त्यांना नेतृत्वगुण विकसीत होऊन महिला अत्यंत सक्रीयतेने आपले काम करु शकतात.

बचतगटाच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार महिलांना माहित होत असतात. त्यांना हिशोबाचे एक प्रकारे ज्ञान होते. घरात राहणाऱ्या महिला बँकेत जाऊ लागल्यास बँकेतील व्यवहार महिलांना माहित होतात. तसेच खरेदी-विक्री यात सुध्दा महिलांना फायदा होतो. तसेच नियमित बचत भरत राहणे म्हणजे स्वत:च्या पैशाचे नियोजनबध्द प्रमाण होय. बचत गटाच्या माध्यमातून महिला ग्रामीण विकासास हातभार लावु शकतात.

- **अल्पबचत गटाद्वारे महिला विकासातील परिवर्तन:**

ग्रामीण भागातील अल्पबचत गट निर्मितीमुळे महिलांना स्वत: च्या पायावर उभे रहाण्यसाठी आशेचा किरण दिसु लागला आहे. सामाजिक आणि आर्थिकष्ट्या कमजोर महिलांना स्वतंत्र, स्वयंपूर्ण बनविणे, त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी महिला बचत गटाने मोलाचे सहकार्य केले आहे.

राज्यात ग्रामीण व शहरी भागातील गरीब व गरजू महिलांना, अल्पबचत गटांना सवलतीच्या व्याज दराने कर्जपुरवठा उपलब्ध होऊ लागला आहे. महिलांना अल्पबचत गटांमुळे सामाजिक न्याय हा फक्त कागदोपत्रीच

मिळालेला नाही तर खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलेला आहे. महिलांनी या माध्यमातून मिळालेल्या संधिचे सोने केलेल आहे. अल्पबचत गटामध्ये सहभागी झालेल्या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यामुळे त्या राजकारणामध्येही सक्रिय होत आहेत. स्त्री-पुरुष हा भेदभाव कमी होण्यास मदत होत आहे. नाबार्ड, रिझर्व बँक ऑफ इंडिया, केंद्र आणि राज्य सरकारचे धोरण यामुळे महिलांना अल्पबचत गटांसाठी मदत होत आहे.

- **महिला अल्पबचत गटासमोरील अडचणी:**

1) स्वयंसहाय्यता अल्पबचत गटातील महिलांना उद्योग व्यवसायाबद्दलचे योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळत नाही.
2) अल्पबचत गटातील महिलांना उद्योग व्यवसायाविषयीचे ज्ञान नसते.
3) अल्पबचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना योग्य बाजारपेठ मिळत नाही.
4) स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाजवळ अत्याधुनिक यंत्र वापरण्यासाठी आवश्यक असलेले भांडवल नसल्याने वस्तुंचा पुरवठा करु शकत नाही.
5) अल्पबचत गटांना मार्गदर्शक तत्वानुसार कार्य करावे लागते, हिशोब ठेवावे लागतात, योजनांचा अभ्यास करुन त्यांची कार्यवाही करावी लागते. परंतू गटातील महिला सदस्या साक्षर नसल्याने त्यांना अनेक प्रश्न निर्माण होतात.

- **मुल्यमापन :**

अल्पबचत गटामुळे ग्रामीण व शहरी भागातील महिलांचे आर्थिक दारिद्रय दूर होतांना दिसत आहे. सावकारांच्या पाशातून त्यांची सुटका होत आहे. अल्पबचत गटामुळे संघटनेची ताकद वाढीस लागली आहे.

आत्मविश्वास, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण यामध्ये अल्पबचत गटामुळे वाढ झालेली आहे. ग्रामीण व शहरी भागात आर्थिक उन्नती होण्यासाठी अल्पबचत

गटांनी क्रांती घडवून आणली आहे. महिलांमध्ये आत्मविश्वास वाढून समाजात त्यांना प्रतिष्ठा मिळत आहे. महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासाबरोबर समाजाच्या व देशाच्या विकासात हातभार लागत आहे. शासनाच्या लिखीत व कायदेशीर, व्यापक धोरणांमुळे महिला अल्पबचत गटांची संख्या व त्यांना होणारा वित्तपुरवठा यात बरीच वाढ होत आहे. अल्पबचत गटामुळे भारताचे महासत्ताधारक होण्याचे स्वप्न पुर्ण होऊ शकेल. महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50% आरक्षण दिल्यामुळे ग्रामीण महिला नेतृत्व विकसीत होणार असून त्यामुळे महिला सक्षमीकरणाचे अनेक प्रयत्न महिलांकडून होण्यास मदत होईल.

ISBN: 978-93-90847-09-9

# प्रकरण 8

# महिला सक्षमीकरण आणि त्यांचे घटनात्मक व कायदेविषयक अधिकार

## 8.1 प्रस्तावना:

समाजात महिलांची संख्या निम्मे आहे. पुर्वीपासून महिलांच्या कल्याणाकडे व त्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार, छळ करण्यापर्यंत अनेक प्रकारची हिन स्वरुपाची वागणूक समाजव्यवस्थेत महिलांना मिळत होती. स्त्री-पुरुष असा भेदभाव दूर करुन महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी पोषक वातावरणाची निर्मिती करणे गरजेचे आहे. समाजात संतुलन राखणे यासाठी पुरुषांच्या मानसिकतेत बदल झाला पाहिजे. पुर्वी महिला चार भिंतीच्या बाहेर जावू शकत नव्हत्या. चुल आणि मुल हेच तिचे कार्यक्षेत्र मानले जात होते. सर्व अधिकारांपासून तिला वंचित ठेवले जात असे. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे तिला दुय्यम स्थान देण्यात आले होते. एकंदरीत भारतीय समाजात महिलांना अतिशय वाईट वागणूक दिली जात असे. आजच्या या आधुनिक काळातही महिलांवरील पुरुषांच्या वर्चस्वाची भावना नष्ट झालेली नाही. स्त्री-पुरुष समानता नाही. अजुनही मुलीचा जन्म चिंताजनक मानला जातो. महिला सक्षमीकरणासाठी राजा राममोहन रॉय, न्या. महादेव गोविंद रानडे, नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी फार मोठे योगदान दिले आहे. तर महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहु महाराज, सावित्रीबाई फुले कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मुलींसाठी शाळा काढल्यात. समाजातील महिला सक्षम झाल्या पाहिजेत. हा त्यांचा प्रागतीक स्वरुपाचा दृष्टीकोन होता. बालविवाह, जरठविवाह, पुर्नविवाहास प्रतिबंध, केशवपन

यासारख्या कुप्रथा महिलांवर अन्याय करणाऱ्या होत्या. त्या प्रथांवर प्रहार करण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात स्त्री-पुरुषांमध्ये समानता प्रस्थापित केली आहे. जात, भाषा, लिपी, संस्कृती, लिंग या आधारांवर समाजात भेदभाव करणे कायद्याने बंदी घालण्यात आली आहे.

मानवी हक्कांविषयी आंतरराष्ट्रीय करार मान्य करुनही महिला निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण जास्त दिसून येते. वैद्यकीय सोयी सुविधा, मालमत्तांची मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण तसेच रोजगारात पुरुषांपेक्षा महिलांना कमी प्रमाणात संधी देण्यात येते.

महिलांचा राजकारणातील सहभाग देखील अल्प आहे. महिलांनी मानसिकतेत बदल करणे हेही महत्वाचे आहे. आजही ग्रामीण भागातील महिला स्वत: निर्णय घेऊ शकत नाही. त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून आहेत.

यासाठी महिलांचे सक्षमीकरण करुन त्यांची निर्णयक्षमता वाढविणेही गरजेचे आहे. भारतीय संविधानाने महिलांना काही हक्क दिलेले आहेत. परंतु त्या हक्कांची जाणीव महिलांना करुन दिली पाहिजे. त्यासाठी जनजागृती करणे, प्रबोधन करणे आवश्यक आहे.

## 8.2 विषयाचे महत्व:

पुर्वीच्या काळात स्त्रीयांसाठी शिक्षणाची दालने उघडी नव्हती. त्यामुळे त्या अशिक्षित राहिल्या. पुरुषप्रधान संस्कृतीने त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार केलेत.

हजारो वर्षांपासून ती पुरुषांच्या विचारांमध्ये अडकून पडलेली होती. विवाहापुर्वी तिला आपल्या वडीलांवर आणि विवाहानंतर आपल्या पतीवर अवलंबून राहावे लागत असे. त्यामुळे तिलाच सर्व संकटांना तोंड द्यावे लागत होते.

स्त्री शक्तीच्या कल्याणासाठी अनेक समाजधुरीणांनी महान कार्य केले. त्यांच्यासाठी अनेक कायदे करण्यात आले. तरीही महिला शंभर टक्के सक्षम झालेली दिसून येत नाही. महिलांचे सक्षमीकरण आज महत्वाचे आहे. संविधानाने त्यांच्यासाठी कायदे तयार केलेत. त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

## 8.3 शोधनिबंधाचा उद्देश:

महिला सक्षमीकरण आणि त्यांचे घटनात्मक व कायदेविषयक अधिकार यांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाची उद्देश आहे.

## 8.4 संशोधन पध्दत:

या लघुशोध संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यात प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथ, पुस्तके, मासिके, इंटरनेट या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. संकलीत माहितीच्या आधारे लघुशोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**a.** संशोधनाची उद्दिष्टे**:**

1.पुर्वीच्या काळातील महिलांच्या परिस्थितीचा अभ्यास करणे.
2.महिलांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय दर्जाचा अभ्यास करणे.
3.महिलांसाठी घटनात्मक व कायदेविषयक अधिकारांचा अभ्यास करणे.

4.महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान संधी उपलब्ध करुन देणे याचा अभ्यास करणे

**b. गृहितके:**

1.महिलांचा राष्ट्रीय विकासात सहभाग वाढत आहे.
2.महिला शैक्षणिक, सामाजीक व राजकीय क्षेत्रात प्रगती करीत आहेत.
3.महिलांच्या राजकीय सहभागासाठी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50% राखीव जागा ठेवलेल्या आहेत.
4.समाजातील लिंगभेदाचे प्रमाण कमी झालेले आहे.

## 8.5 महिला सक्षमीकरण:

कायदे आणि कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार व दर्जा प्रदान करुन देणे, त्यांना विकासासाठी संधी उपलब्ध करुन देणे आणि समाज व्यवस्थेतील स्त्री-पुरुष यांच्यातील विषमतेची दरी नष्ट करणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात. महिलांमध्ये विकास करण्याविषयी जाणीव असणे हे महिला सक्षमीकरणाचे मुलतत्व समजले जाते. महिला अधिकाराचा पुरस्कार करणारी हि संकल्पना आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने विकास व प्रगतीसाठी समान संधी उपलब्ध करुन देणे हे खरे महिलांचे सबलीकरण होऊ शकते. समाजातील लिंगभेदावर आधारीत विषम समाजव्यवस्था नष्ट करुन समतेच्या तत्वावर आधारित व्यवस्था सक्षमीकरणात अपेक्षित आहे. पुरुषांच्या बरोबरीने महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय हक्क मिळवून देणे म्हणजे सक्षमीकरण होय. समाजात महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, महिलांची होणारी उपेक्षा समाजातील

त्यांचे असणारे निम्न स्थान यावर सखोल चिंतन होणे गरजेचे आहे. समाजामध्ये नेहमी धर्म, जात, लिंग या आधारावर भेदभाव केला जातो. लिंगावर आधारीत भेदभाव केल्यामुळे समाजातील महिलांचे स्थान खूपच रसातळाला गेले आहे. समाजात तिची पावलोपावली उपेक्षा होत आहे. महिलांकडे पुरुषांचा पाहण्याचा दृष्टीकोन निर्मळ नाही.

महिलांची होणारी कुचंबणा आजही समाजात थांबलेली नाही. तरीही राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, ताराराणी शिंदे, लक्ष्मीबाई, इंदिरा गांधी अशा इतर अनेक महिलांनी समाजातील विषमतावादी परिस्थितीवर मात करुन एक उज्वल दिशादर्शक इतिहास घडविण्याचे कार्य केले.

समाजामध्ये महिलांना उपेक्षित ठेवणाऱ्या, विकासाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवू पाहणाऱ्या शक्तींमध्ये मतपरिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया हि महिला सक्षमीकरण मानले जाते. महिलांच्या विचारांना नविन दिशा देणे, दृष्टी देणे हे त्यात अपेक्षित असते. महिला सक्षमीकरण म्हणजे राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत पुरुषांच्या बरोबरीने सहभागी करुन घेणे होय. मानसिक आणि शारीरिक हिंसाचारापासून महिलांची सुटका करणे हे त्यात अपेक्षित मानले जाते. समाजातील महिला सक्षम व्हायच्या असतील तर त्यांनी त्यांच्या मनातील न्युनगंडाची भावना काढून टाकणे तितकेच महत्वाचे आहे. महिला हि खूपच बुध्दीमान, ताकदवान, सशक्त, निसर्गानेच तिला खूप प्रबळ बनविले आहे. महिलांमध्ये पुरुषांपेक्षा गुणवत्ता नक्कीच जास्त आहे. परंतु संधीच्या अभावी ती उपेक्षित राहते.

तरीही समाजातील या विषमतावादी वातावरणात महिला आपले स्थान बळकत करित आहेत. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एखादी महिला खंबीरपणे उभी असते हे इतिहासानेच सिध्द केले आहे..

ती तिच्या आयुष्यात अनेक भूमिका साकार करित असते. कधी ती आई असते, कधी बहिण, बायको तर कधी मैत्रीण. पण या सर्व भुमिकांमध्ये ती पुरुषांच्या मागे एक प्रेरणा बनून उभी असते. महिला प्रगतीच्या प्रवाहात मागे राहिल्या तर त्याचे अनिष्ट परिणाम समाजव्यवस्थेवर दिसून येतील. महिलांना समजून घेण्यास पुरुष अपुरे पडत आहेत. महिलांच्या भावना, विचार निर्मळ मनाने समजून घेतले पाहिजे. समाजात महिलांना मान-सन्मानाचे स्थान दिले पाहिजे. तिच्याविषयी समाजातील सर्वच लोकांमध्ये आदराची भावना वृध्दींगत झाली पाहिजे. यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न केला पाहिजे तरच समतावादी, स्त्री प्रधान संस्कृतीची वाढ होईल.

## 8.6 महिला सक्षमीकरणासाठी साधने:

कायदे आणि कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार व दर्जा प्रदान करुन देणे, त्यांना विकासासाठी संधी उपलब्ध करुन देणे आणि समाज व्यवस्थेतील स्त्री-पुरुष यांच्यातील विषमतेची दरी नष्ट करणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात. महिलांमध्ये विकास करण्याविषयी जाणीव असणे हे महिला सक्षमीकरणाचे मुलतत्व समजले जाते. महिला अधिकाराचा पुरस्कार करणारी हि संकल्पना आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने विकास व प्रगतीसाठी समान संधी उपलब्ध करुन देणे हे खरे महिलांचे सबलीकरण होऊ शकते. समाजातील लिंगभेदावर आधारीत विषम समाजव्यवस्था नष्ट करुन समतेच्या तत्वावर आधारित व्यवस्था

सक्षमीकरणात अपेक्षित आहे. पुरुषांच्या बरोबरीने महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय हक्क मिळवून देणे म्हणजे सक्षमीकरण होय. समाजात महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, महिलांची होणारी उपेक्षा समाजातील त्यांचे असणारे निम्न स्थान यावर सखोल चिंतन होणे गरजेचे आहे. समाजामध्ये नेहमी धर्म, जात, लिंग या आधारावर भेदभाव केला जातो.

लिंगावर आधारीत भेदभाव केल्यामुळे समाजातील महिलांचे स्थान खूपच रसातळाला गेले आहे. समाजात तिची पावलोपावली उपेक्षा होत आहे. महिलांकडे पुरुषांचा पाहण्याचा दृष्टीकोन निर्मळ नाही. महिलांची होणारी कुचंबणा आजही समाजात थांबलेली नाही. तरीही राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, ताराराणी शिंदे, लक्ष्मीबाई, इंदिरा गांधी अशा इतर अनेक महिलांनी समाजातील विषमतावादी परिस्थितीवर मात करुन एक उज्वल दिशादर्शक इतिहास घडविण्याचे कार्य केले.

समाजामध्ये महिलांना उपेक्षित ठेवणाऱ्या, विकासाच्या प्रक्रियेपासून दूर ठेवू पाहणाऱ्या शक्तींमध्ये मतपरिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया हि महिला सक्षमीकरण मानले जाते. महिलांच्या विचारांना नविन दिशा देणे, दृष्टी देणे हे त्यात अपेक्षित असते. महिला सक्षमीकरण म्हणजे राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत पुरुषांच्या बरोबरीने सहभागी करुन घेणे होय. मानसिक आणि शारीरिक हिंसाचारापासून महिलांची सुटका करणे हे त्यात अपेक्षित मानले जाते. समाजातील महिला सक्षम व्हायच्या असतील तर त्यांनी त्यांच्या मनातील न्युनगंडाची भावना काढून टाकणे तितकेच महत्वाचे आहे. महिला हि खूपच बुध्दीमान, ताकदवान, सशक्त, निसर्गानेच तिला खूप प्रबळ बनविले आहे. महिलांमध्ये पुरुषांपेक्षा गुणवत्ता नक्कीच जास्त आहे. परंतु संधीच्या अभावी ती उपेक्षित राहते. तरीही समाजातील या विषमतावादी वातावरणात

महिला आपले स्थान बळकत करित आहेत. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एखादी महिला खंबीरपणे उभी असते हे इतिहासानेच सिध्द केले आहे. ती तिच्या आयुष्यात अनेक भूमिका साकार करित असते. कधी ती आई असते, कधी बहिण, बायको तर कधी मैत्रीण. पण या सर्व भुमिकांमध्ये ती पुरुषांच्या मागे एक प्रेरणा बनून उभी असते. महिला प्रगतीच्या प्रवाहात मागे राहिल्या तर त्याचे अनिष्ट परिणाम समाजव्यवस्थेवर दिसून येतील. महिलांना समजून घेण्यास पुरुष अपुरे पडत आहेत. महिलांच्या भावना, विचार निर्मळ मनाने समजून घेतले पाहिजे. समाजात महिलांना मान-सन्मानाचे स्थान दिले पाहिजे.

तिच्याविषयी समाजातील सर्वच लोकांमध्ये आदराची भावना वृध्दींगत झाली पाहिजे. यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न केला पाहिजे तरच समतावादी, स्त्री प्रधान संस्कृतीची वाढ होईल.

## 8.7 महिला सक्षमीकरणासाठी साधने:

### 8.7.1 साक्षरता:

समाजातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष द्यावे लागते. निरक्षर महिलांसाठी प्रौढ साक्षरतेचे वर्ग चालविले पाहिजेत. त्यांना शिक्षणाचे महत्व पटवुन दिले पाहिजे. महात्मा फुले यांनी आधी आपल्या धर्मपत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकविले नंतर सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी स्वत:ला झोकून दिले. त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा पुण्यात सुरु केली. समाज कटंकांनी त्यांना त्रास दिला.

तरी त्यांनी आपले कार्य थांबविले नाही. आजही ग्रामीण भागात व आदिवासी दुर्गम भागात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण अजूनही कमी आहे.

महाराष्ट्र शासनाने मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरु केलेल्या आहेत. कौशल्य विकासावर देखील भर दिला जात आहे. ज्या महिला घरकाम, शेतीकाम किंवा एखाद्या व्यवसायामुळे शाळा महाविद्यालयात उपस्थित राहु शकत नाहीत त्यांच्यासाठी महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना नाशिक येथे केली आहे. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वांमध्ये 19 वर्षाखालील मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण असावे परंतु गेल्या 65 वर्षात पुर्ण साक्षरतेचे प्रमाण पाहिजे त्या प्रमाणात वाढलेले दिसून येत नाही. मुलींचे विवाह लवकर होतात. आपण जबाबदारीतून मुक्त झालो हि पालकांची भूमिका त्यास कारणीभूत आहे. परंतू शिक्षणामुळे महिलांचा मानसिक बौध्दिक विकास होऊ शकेल. त्यामुळे तिच्यावरील अन्याय दूर होण्यास मतद होऊ शकेल. महिला हि स्वत:च्या पायावर उभी राहु शकेल यासाठी तिला शिक्षण देणे गरजेचे आहे.

### 8.7.2 आर्थिक स्वावलंबन:

महिलांमध्ये कौशल्य विकसीत निर्माण होवू शकेल अशा प्रकारचे व्यावसायिक शिक्षण दिले पाहिजे त्यामुळे त्यांना व्यवसाय करुन पैसे मिळतील आणि स्वत:च्या पायावर उभ्या राहु शकतील. महिलांचा स्वत:चा व्यवसाय असेल आणि नोकरीला असतील तर महिला स्वावलंबी होऊ शकतील. पुरुषांवर तिला अवलंबून राहावे लागणार नाही. तसेच तिची शोषण व अत्याचारांपासून सुटका होऊ शकेल.

आज शासनाने महिलांसाठी विविध योजना सुरु केल्या आहेत. प्रत्येक खेडेगावात महिलांनी अल्पबचत गट सुरु केले आहेत. बँकांमार्फत बचतगटांना आर्थिक मदत केली जात आहे. बचतगटाच्या माध्यमातून महिला एकत्र येऊन व्यवसाय करित आहेत.

स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून बचतगटांनी निर्माण केलेल्या वस्तुंना बाजारपेठ मिळत आहे. यातून महिलांची प्रगती होत आहे. तसेच बचतगटाच्या माध्यमातून महिलांमध्ये नेतृत्व गुण विकसीत होत आहेत.

लोकशाही मूल्यांचे संवर्धन करुन आर्थिक, सामाजिक व इतर सर्वांगिण विकासासाठी अल्पबचत गट नियोजनाचा स्विकार करणे आजच्या युगामध्ये गरजेचे आहे. भारतातील खेडे हा आपल्या अर्थव्यवस्थेचा पाया मानला जातो.

म्हणून बचतगटाचे महत्व देखील वाढत आहे. बचतगटांच्या माध्यमातून महिलांचा विकास होण्यासाठी व अंमलबजावणीसाठी शास्त्रीय दृष्टीकोनाद्वारे अभ्यासाची आवश्यकत आहे. दारिद्रयाचे निर्मुलन करणे हे बचत गटांचे काम आहे. दारिद्रय निर्मुलन झाल्यानंतर खऱ्या अर्थाने समाजाची प्रगती होऊ शकेल.

बचत गटामुळे महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबनाचे प्रमाण वाढलेले दिसून येते. अल्पबचत गटामुळे महिला आर्थिक सक्षम बनत आहेत यामुळे एक विकासाची क्रांती घडलेली दिसत आहे.

### 8.7.3 राजकीय प्रक्रियेतील सहभाग:

स्वातंत्र्याच्या सुरुवातीस महिलांचा राजकारणातील सहभाग अतिशय कमी होता पण आज राजकीय प्रक्रियेत असणारा महिलांचा सहभाग वाढत आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरण गतीने होण्यास मदत होत आहे.

भारतीय संविधानाने राजकीय क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने महिलांना समान संधी दिली आहे. 73 व्या घटना दुरुस्तीने पंचायतराज व्यवस्थेमध्ये महिलांना 33% जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत तर महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50% आरक्षण दिले जात आहे.

यामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग जास्त असून महिलांना सरपंच, सभापती, जि.प. अध्यक्ष हि पदे मिळू लागलेली आहेत. महिलांचा राज्य व राष्ट्रपातळीवरील राजकीय सहभाग वाढविण्यासाठी घटकराज्यांच्या विधानसभेत आणि देशाच्या कायदेमंडळात म्हणजेच राज्यसभा व लोकसभेमध्ये त्यांना 33% आरक्षण देणे गरजेच आहे. यासाठी देशातील सर्व राजकीय पक्षांनी प्रयत्न करावेत.

### 8.7.4 प्रसारमाध्यमे:

लोकशाहीत प्रसारमाध्यमांची भुमिका महत्वाची असते. अलीकडे महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत मुख्य साधन म्हणून प्रसार माध्यमांचा उल्लेख करता येईल. देशातील महिलांचे प्रश्न रेडिओ, दूरदर्शन, मासिके, वृत्तपत्रे, साप्ताहिके या माध्यमातून उपस्थित केले जातात. या माध्यमातून जनतेची मते अनुकूल आहेत की प्रतिकुल आहेत हे पाहिले जाते आणि त्याद्वारे जनमत जागृती करण्यात येते.

केंद्र व राज्यशासनाच्या विविध योजना व कार्यक्रम प्रसारीत केले जातात. प्रसारमाध्यमे हि लोकशिक्षण देण्याची उत्तम साधने मानली जातात.

## 8.7.5 दबावगट:

भारतात महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी महिलांचे दबावगट निर्माण झाले आहेत. हे दबावगट शासन दरबारी महिलांचे प्रश्न, अडीअडचणी सोडविण्यासाठी कार्यरत आहेत. महिलांच्या कल्याणासाठी योजना, पायाभुत सेवा, प्रशिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी सरकारवर दबाव टाकण्याचे काम हे दबावगट करित असतात.

अलिकडे विविध प्रादेशिक व राष्ट्रीय पक्षांनी आपल्या पक्षांमार्फत महिला आघाडीची स्थापना केलेली दिसून येते. आपल्या राजकीय पक्षामार्फत या महिला सक्रीयरित्या काम करित असतात. तसेच महिलांवर अन्याय-अत्याचार झाल्यानंतर ह्या महिला मोर्चा काढत असतात. आणि महिलांसंबंधीचे प्रश्न विधिमंडळात मांडण्यासाठी आमदार, खासदार व मंत्री यांना निवेदने देत असतात. दबावगट हा शासनावर प्रभाव टाकण्याचे महत्वपुर्ण माध्यम मानले जाते.

## 8.7.6 महिला कल्याणासाठीचे कायदे:

भारतात महिलांना गैण स्थान दिले जाते. तसेच महिलांच्या बाबतीत समाजात अजूनही अनिष्ठ रुढी, परंपरा दिसून येतात. महिलांचा आजही सन्मान केला जात नाही. समाज सुधारकांच्या प्रयत्नांमुळेच महिला शिक्षण घेऊ लागल्या. पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करु लागल्या. सर्वच क्षेत्रात त्या प्रगती करित आहेत. स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेतच स्वातंत्र्य, समता आणि स्त्री-पुरुष असा भेदभाव केला जाणार नाही. यासारखे घटनात्मक स्वातंत्र्य देण्यात आले. व्यक्तीच्या व्यकतीमत्वाचा विकास होण्यासाठी राज्यघटनेत मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वांची नोंद करण्यात आली

आहे. समता या तत्वामुळे सर्वच क्षेत्रामध्ये महिलांना संधी मिळाल्यामुळे त्यांचा विकास झालेला दिसून येतो. समाजात महिलांना मान, सन्मान आणि प्रतिष्ठेचे स्थान त्यामुळेच मिळालेले आहे. समाजातील आर्थिक विषमता कमी झाल्याचे दिसून येते. भारतीय राज्यघटनेत महिलांच्या संदर्भात विविध तत्वाची तरतूद करण्यात आली.

1.कलम 14 नुसार कायद्यासमोर सर्वांना समान मानले आहे.
2.कलम 15 नुसार स्त्री व पुरुष असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही.
3.कलम 16 नुसार प्रत्येक स्त्री-पुरुषांना विकासाची समान संधी देण्यात आली आहे. त्यांची प्रतिष्ठा देखील समान मानली आहे. त्यामुळे स्त्रियांचे गैण स्थान नष्ट झाले आहे.
4.कलम 39 नुसार समान कामासाठी समान वेतन देण्यात येईल. स्त्री आहे म्हणून कमी वेतन, पुरुष आहे म्हणून जास्त वेतन असे चालणार नाही.
भारतीय राज्यघटनेतील या कलमांच्या माध्यमातून महिलांना समान हक्क प्राप्त झले आहेत. तसेच केंद्र सरकरने महिलांच्या हितासाठी अनेक कायदे केलेले आहेत.

1) सतीबंदी कायदा, 2) वारसा हक्क कायदा, 3) बालविवाह प्रतिबंधक कायदा, 4) मजुरी दर अधिनियम कायदा, 5) हिंदू विवाह कायदा, 6) महिलांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंधक कायदा, 7) मातृत्वलाभ अधिनियम कायदा, 8) हुंडा प्रतिबंधक कायदा, 9) समान वेतन कायदा, 10) अनैतिक व्यापार कायदा, 11) पोटगी कायदा, 12) घटस्फोटाचा कायदा, 13) गर्भजल चिकित्सा विरोधी कायदा, 14) बलत्कार विरोधी कायदा, 15) राष्ट्रीय महिला आयोग कायदा, 16) कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा असे विविध कायदे महिलांच्या

हितासाठी करण्यात आलेले आहेत. या कायद्यांच्या माध्यमाद्वारे महिलांना विशेष हक्क प्राप्त झालेले आहेत.

## a. मूल्यमापन:

महिलांच्या प्रश्नांविषयी महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे यांचे कार्य फार मोठे आहे. महिलांना राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता, दर्जा, संधी दिली आहे. या सर्व प्रयत्नांनंतरही महिलांच्या परिस्थितीत पाहिजे तशी व्यापक सुधारणा होऊ शकलेली नाही. अन्याय, अत्याचार, लिंगभेद, शारीरक, मानसिक हिंसा यासारखे भयावह प्रश्न अजुनही समाजामध्ये पहावयास मिळतात. समाज शिकला, नोकरीला लागला तरी अजुनही महिलांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यात गर्भजल चिकित्सा, स्त्री अर्भक हत्या, एकतर्फी प्रेमामुळे मुलींवरील अत्याचार, नोकरीच्या ठिकाणी लैंगिक छळ अशा समस्या आढळून येतात. स्वातंत्र्यानंतर घटना व कायदे महिलांच्या बाजूने बनविण्यात आलेले असले तरी महिला हिंसाचारास बळी पडलेल्या आढळून येतात. बलात्कार, खून, जिवंत जाळणे, महिलांची छेड काढणे अशी उदाहरणे आजही पहावयास मिळतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात "स्त्रीयांची प्रगती ज्या समाजात झाली असेल त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मी मोजतो" संविधानात तरतुदी आहेत व तरतूदी अंमलात आणण्यासाठी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ आहे.

तरीही 65 वर्षानंतर स्थिती अशी आहे. पुन्हा घटनाकारांचा संदेश आपणास विचार करायला भाग पडतो की, "संविधान कितीही चांगले असले तरी ते चालविणारी माणसे चांगली नसतील तर संविधान अपयशी ठरेल. तसेच

संविधान कितीही वाईट असले तरी ते चालविणारी माणसे चांगली असली तर संविधान यशस्वी ठरेल." महिलांच्या, बालकांच्या व वंचीत घटकांच्या दयनीय स्थितीला संविधान व संविधानाने निर्माण केलेली व्यवस्था कारणीभूत नसून व्यवस्थेत बसलेले लोक त्यास कारणीभूत आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी लोकप्रतिनिधी, राज्यकर्ते, मंत्री यांनी कठोर कायदे करणे गरजेचे आहे.

तसेच पुरुषांच्या मानसिकतेत बदल होणे देखील तितकेच महत्वाचे आहे. महिलांच्या संदर्भात शासनान जे काही कायदे केलेले आहेत त्याच्या यशस्वीतेसाठी समाजातील लोकांच्या पाठींब्याची गरज आहे. शासनाचे यश-अपयश हे शेवटी लोकांवरच अवलंबून असते.

ISBN: 978-93-90847-09-9

# प्रकरण 9

# स्वयंसहाय्यता बचतगट आणि महिला सक्षमीकरण

## 9.1 प्रस्तावना:

लोकशाही मूल्यांचे संवर्धन करुन आर्थिक, सामाजिक व इतर सर्वांगिण विकास करण्यासाठी अल्पबचत नियोजनाचा स्विकार करणे आवश्यक आहे आणि त्यादृष्टीने प्रयत्न करणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. भारतातील खेडे हा आपल्या अर्थव्यवस्थेचा पायाच मानला जातो. या दृष्टीने बचत गटांचे महत्व वाढत आहे.

पुर्वी महिलांना कोणत्याच प्रकारचे हक्क नव्हते. विकासाची कोणतीच साधने त्यांच्यासाठी उपलब्ध नव्हती. चार भिंतीच्या बाहेर पडण्यास त्यांना मनाई होती. 'चुल आणि मूल' हेच तिचे कार्यक्षेत्र मानले गेले. त्यामुळे तेव्हा महिलांचा विकास झाला नाही. शिक्षणाची दालने तर महिलांसाठी अजीबात खुली नव्हती.

सर्वच हक्क तिला डावलण्यात आले होते. महिलांचे सक्षमीकरण होण्यासाठी राजा राममोहन रॉय, न्या. रानडे, आगरकर यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. तर राजर्षी शाहु महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरु केल्यात.

महिला सक्षम करण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याचे दिसून येते. बचत गटांच्या माध्यमातून महिलांचा विकास होण्यासाठी व अंमलबजावणीसाठी शास्त्रीय दृष्टीकोनाद्वारे अभ्यासाची आवश्यकता आहे. दारिद्रयाचे निर्मुलन करणे हे

बचत गटांचे काम आहे. दारिद्र्य निर्मुलन झाल्यावर समाजाची प्रगती होऊ शकेल.

## 9.2 विषयाची ओळख:

देशाच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट आर्थिक स्वरुपात सर्वांगिण विकास करणे. विकासाची प्रक्रिया ही दिर्घकालीन स्वरुपात चालणारी प्रक्रिया आहे. समाज जीवनात घडणाऱ्या सामाजिक आर्थिक राजकीय घडामोडींवर विकास हा अवलंबून आहे.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे खेडयांचा विकास झाल्याशिवाय राष्ट्राचा विकास होणे अशक्य आहे. ग्रामीण भागाचा विकास ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्या मार्फत होतांना दिसून येत आहे आणि या स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका फारच महत्वाची आहे. ह्या संस्था लोकशाहीच्या आधारस्तंभ आहेत. विकास करण्याची जबाबदारी शासनाने त्यांच्यावर टाकलेली आहे. या संस्थांना निधीच्या माध्यमाद्वारे आर्थिक पाठबळ मिळत असून या संस्थांनी विविध विकासाची कामे हाती घेतलेली आहेत. ग्रामीण भागात महिलांचे संघटन बचतगटांच्या स्थापनेमुळे वाढत आहे. महिलांच्या ज्ञानात भर पडत आहे. अनेक महिला एकत्र येवून एखाद्या विषयावर मंथन करीत आहेत. विचारांची देवाण घेवाण होत आहे हे महिला बचतगटामुळे आढळून येत आहे.

## 9.3 विषयाचे महत्व:

ग्रामीण भागात महिला बचत गटांची संख्या मोठ्या प्रमाणात आढळत आहे. दारिद्र्यात खितपत पडलेल्या महिलांच्या जीवनात विकासात्मक बदल होत आहे. बचत गटामुळे महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबनाचे प्रमाण वाढलेले दिसून येते. बचत गटामुळे महिला आर्थिक सक्षम बनत आहेत. महिला बचत गटाद्वारे अनेक व्यवसाय सुरु आहेत. यामुळे एक विकासाची क्रांती घडलेली दिसत आहे.

उद्योगशील महिलांची संख्या आजही खेडे गावात मोठ्या प्रमाणात असल्याने आर्थिक नियंत्रण देखील त्यांच्या हातात आलेले दिसत आहे.

## 9.4 अध्ययन उद्देश:

"स्वयंसहाय्यता बचत गट आणि महिला सक्षमीकरण" यांचा अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

## 9.5 उद्दिष्टे:

1.स्वयंसहाय्यता बचत गट हे महिला सबलीकरणासाठी कसे उपयुक्त आहेत याचा अभ्यास करणे.

2.महिलांचे बचत गट तयार करुन त्यांना संघटीत करणे.

3.स्वयंसहाय्यता बचत गटांमुळे महिलांच्या राहणीमानात कशा प्रकारे परिवर्तन होते याचा अभ्यास करणे.

4.महिलांच्या बचत गटांना संघटीत करुन त्यांना योग्य प्रशिक्षण देणे आणि त्यांच्या वस्तुसाठी बाजारपेठ मिळवून देणे.

5.बचतगटातील सहभागामुळे महिलांच्या आर्थिक, सामाजीक दर्जात झालेल्या बदलांचा सर्वसमावेशक अभ्यास करणे.

6.नवनवीन उद्योगांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी महिलांना प्रेरणा देणे.

## 9.6 संशोधनाची गृहितके:

1.बचत गटातील सहभागामुळे महिलांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावला आहे.

2.बचत गटात सहभागी झालेल्या महिलांना बचतीची व काटकसरीची सवय लागते.

3.बचत गटामुळे महिलांचे सबलीकरण घडून येते.

4.बचत गट योजनेमुळे महिला स्वावलंबी बनतात.

5.महिलांचे सबलीकरण झाल्यानंतर त्यांचा राजकीय सहभाग वाढतो.

6.बचत गटात सहभागी झालेल्या महिलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

7.स्वयंसहाय्यता बचत गटामुळे ग्रामीण भाग सावकारमुक्त होण्यास मदत होईल.

8.स्वयंसहाय्यता बचत गट चळवळीतून विधायक नेतृत्वाचा उदय होतो.

## 9.7 महिला सबलीकरणाचा अर्थ:

महिलांमध्ये विकासाविषयी जाणीव जागृती असणे हे तिच्या सबलीकरणाचे मुलतत्व समजले जाते. महिला अधिकाराचा पुरस्कार करणारी हि एक संकल्पना मानली जाते. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने विकास व प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करुन देणे हे खरे महिलांचे सबलीकरण होऊ शकते. समाजातील विषमता नष्ट करुन समताधिष्ठीत तत्वावर आधारित व्यवस्था सबलीकरणात अपेक्षीत आहे.समाजातील पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक,

आर्थिक व राजकीय हक्क मिळवून देणे म्हणजे सबलीकरण होय. जगात अर्धी शक्ती महिलांची आहे. स्त्री शक्ती हि अबला न राहता सबला असली पाहिजे हा विचार मान्य करावा लागला. स्त्रीशक्ती हि देशाच्या सर्वांगिण विकासात मोलाची असल्याने स्त्रीयांकडे दुर्लक्ष करुन भागणार नाही. सक्षमीकरणासाठी स्त्रीयांसाठी योग्य निर्णय घेणे उचित हे. समाजव्यवस्थेत स्त्रीयांना उपेक्षीत ठेवणाऱ्या विकास प्रक्रियेपासून दुर ठेवू पाहणाऱ्या शक्तीमध्ये मत परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया हि महिला सबलीकरण मानले जाते. महिलांच्या विचारांना नवीन दिशा देणे हे यात अपेक्षित आहे. महिला सबलीकरण म्हणजे त्यांना राष्ट्राचा विकास प्रक्रियेत पुरुषांच्या बरोबरीने सहभागी करुन घेणे होय. महिला सबलीकरण म्हणजे स्त्रियांना शक्ती क्षमता व कौशल्य यात वाढ करण्यासाठी स्वत:च्या जीवनमानाचा दर्जा उंचावून स्वयंनिर्धारित होण्यासाठी आवश्यक ती परिस्थिती निर्माण करणे म्हणजे महिला सबलीकरण होय.

भारत स्वातंत्र्यपूर्व काळात महिला सबलीकरण प्रक्रिया निर्माण करण्याचे कार्य सर्वप्रथम भारतातील समाजसुधारकांनी केलेले आढळून येते. महात्मा जोतीराव फुले, महर्षी कर्वे, राजा राममोहन रॉय, लोकमान्य टिळक, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी विचारवंतांनी आपल्या वैचारिक प्रबोधनातून प्रत्यक्ष कृतीतून महिला सबलीकरणास सुरुवात केली. महात्मा फुले यांनी आधी सावित्रीबाई फुलेंना शिकविले नंतर समाजातील स्त्रियांना साक्षर करण्याचे एक महान कार्य त्यांनी केले.

आज समाजात सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्य करित आहेत. सर्वच क्षेत्रात महिला आज पुढे आहेत, कामाची चुणुक दाखवित आहेत.

## 9.8 महिला सबलीकरणाची उद्दिष्टे:

1) साक्षरता प्रमाण वाढविणे: अजूनही ग्रामीण व आदिवासी महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण खूप कमी आढळते. 14 वर्षाखालील मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण असावे असे राज्यघटनेत सांगितले आहे. परंतू 70 वर्षात पुर्ण साक्षरतेच्या प्रमाणात पाहिजे तशी गती वाढलेली दिसून येत नाही.

शिक्षणाने संस्कार होतात व त्या संस्कारातून चांगल्या संस्कृतीचा विकास होणे गरजेचे आहे. शिक्षणाने गरिबांचा मानसिक, बौध्दीक विकास होऊ शकेल. स्त्रीयांमधील साक्षरतेचे प्रमाण वाढावे हे सबलीकरणाचे उद्‌दिष्ट आहे.

2) स्वावलंबी: समाजातील संपुर्ण स्त्री जातीस स्वावलंबी बनविणे हे सबलीकरणाचे महत्वाचे उद्‌दिष्ट आहे. स्त्रीयांसाठी शासनाने रोजगार उपलब्ध करुन दिला पाहिजे असेच महिलांनी स्वत: एखादा व्यवसाय सुरु केल्यास तिला आर्थिक लाभ मिळू शकेल. तसेच देशाच्या आर्थिक विकासास हातभार लावण्यास मोलाची मदत होईल. महिलांचा स्वत:चा विकास होईल. तसेच शासनाने समाजातील अतीदुर्बल महिलांसाठी योग्य कार्यक्रम राबविणे देखील गरजेचे आहे.

3) समानता: स्त्री पुरुष समानता समाजात प्रस्थापित करणे हे महत्वाचे आहे. समतेशिवाय विकास करणे अशक्य आहे. धर्म, वंश, जात, भाषा, लिपी, संस्कृती यावर आधारलेली पुरुषप्रधान संस्कृती आता नष्ट केली पाहिजे. स्त्रीयांचे होणारे शोषण थांबविले पाहिजे. राष्ट्र विकासात देखील स्त्रीयांना सामावुन घेतले पाहिजे. स्त्रीयांना समान संधी समान दर्जा दिला गेला पाहिजे.

4) आर्थिक व सामाजिक न्याय: पुर्वीपासून स्त्रियांवर अन्याय होत आलेले आहेत. त्यांना त्यांच्या हक्कांपासून वंचीत ठेवण्यात आले होते. यामुळे स्त्रीयांच्या विकासावर मर्यादा आल्या. स्त्रीयांना सर्वांगिण विकासासाठी त्यांना

त्यांचे हक्क प्राप्त करुन देणे म्हणजे महिलांचे सबलीकरण होय की ज्यामुळे महिलांना योग्यरित्या न्याय मिळू शकेल.

5) राजकीय सहभाग: समाजात महिलांची संख्या पन्नास टक्के असून त्यांना राजकीय व्यवस्थेत सहभागी करुन घेतले पाहिजे. भारतातील काही घटक राज्यांमध्ये महिलांना 50% आरक्षण आहे. परंतू लोकसभा व विधान सभांमध्ये अजूनही महिलांचा राजकीय सहभाग पाहिजे तसा नाही. त्यात पुरुषांची मक्तेदारी आपणास दिसून येते. महिलांच्या कल्याणासाठी महिलांचा राजकीय सहभाग वाढणे अत्यावश्यक आहे. राष्ट्र विकास हि केवळ पुरुषांची जबाबदारी नसून महिलांचीही तेवढीच जबाबदारी आहे याची जाणिव निर्माण करणे हे महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट आहे.

त्यात महिला सुध्दा महत्वपूर्ण भूमिका पार पाडू शकतात असा विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. शासनाच्या प्रयत्नांबरोबर इतर काही स्वयंसेवी संस्था महत्वाचे कार्य करतांना दिसून येतात. महिलांचे सशक्तीकरण करणे हि काळाची गरज आहे. त्यांना शैक्षणिक व राजकीय प्रवाहात आणले पाहिजे. त्यांना सक्षम बनविले पाहिजे अजूनही महिलांना फार मोठ्या अन्याय अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. भारतात महिलांच्या सशक्तीकरणाची आजही गरज भासत आहे. त्याची कारणेही पुढीलप्रमाणे आहेत -

1. आजही समाजात स्त्री-भ्रूण हत्या होतांना दिसून येत आहे.
2. हुंडा प्रथा आजही अस्तित्वात आहे. पैसा, सोने इतर वस्तु वधुपित्याला द्यावी लागतात.
3. बलात्काराची प्रकरणे दिवसेंदिवस वाढत आहेत.
4. खावटी प्रकरणांची संख्या न्यायालयात जास्त आहे.
5. स्त्रीयांना आजही दुय्यम स्थान देण्यात येते.

6. स्त्रीया भीतीमय वातावरणात जीवन जगतांना दिसत आहेत.
7. भारतात लोकशाही असून स्त्रीयांचे राजकारणातील सहभागाचे प्रमाण फारच अल्प आहे.
8. ग्रामीण व आदिवीस भागामध्ये मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण असमाधानकारक आहे.
9. कुटूंबात आजही हिंसक घटना घडतच आहेत.
10. स्त्रीयांना पिता व पत्नी यांच्या मालमत्तेत वाटा नाकारला जातो.
11. अनैतीक व्यापार वाढत आहेत.
12. स्त्रीयांचे लैंगिक शोषण होत आहे.

2001 हे वर्ष भारत सरकारने महिला सक्षमीकरण धोरण जाहिर केलेले आहे. बचत गटांच्या माध्यमातून सक्षमीकरण धोरण जाहिर केलेले आहे.

बचत गटांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनविणे अल्प बचत गट चळवळीचे प्रणेते डॉ. युनुस मुहम्मद यांची चळवळ ग्रामीण भागात यशस्वीपणे कार्य करित आहे.

## 9.9 महिला बचत गटाचे फायदे:

1. महिलांना नियमित बचत करण्याची चांगली सवय लागते.
2. महिलांना आर्थिक व्यवहाराचे ज्ञान प्राप्त होण्यास मदत होते.
3. आर्थिकदृष्टा महिला सक्षम बनतात.
4. गरज असेल तेव्हा आर्थिक मदत मिळते.
5. महिलांमध्ये नेतृत्व गुण विकसित होण्यास मदत होते.
6. गावासाठी विधायक कार्य करण्याची क्षमता महिलांमध्ये निर्माण होते.

7. बचत गटामुळे महिला स्वावलंबी बनतात.
8. महिला सभासदांमध्ये परस्पर सहकार्य व विश्वास निर्माण होतो.

## 9.10 अल्पबचत गटांपुढील अडचणी:

1. ग्रामीण भागात अल्पबचत गट निर्माण करण्यात येतात पण उद्योगाविषयीचे आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली जात नाही याबाबतीत महिलांना ज्ञान नसते.
2. अल्पबचत गटातील महिलांना व्यवसायासाठी पाहिजे तेवढे कर्ज बँकाकडून मिळत नाही.
3. अल्पबचत गटांना नियमानुसार कार्य करावे लागते. पैशांचा हिशोब ठेवावा लागतो. पण गटातील बहुतेक महिला सदस्या ह्या निरक्षर असल्याने त्यांचे अनेक प्रश्न निर्माण होतात.
4. अल्पबचत गटांकडे आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी आवश्यक असलेले भांडवल नसल्यामुळे वस्तुंचा पुरवठा ते करु शकत नाहीत.

## 9.11 महिला सक्षमीकरणासाठी शासनाचे प्रयत्न:

1. घटना दुरुस्ती: स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 1/3 जागा राखीवसाठी 73 वी घटनादुरुस्ती करण्यात आली. निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविण्यात आला. हे महिलांच्या विकासासासाठी महत्वाचे पाऊल म्हणावे लागेल. आरक्षणामुळे महिलांना सहभागी व्हावेच लागते. आणि महिला सक्षमीकरणास मदत होते.
2. दंडसंहिता: भारतीय दंड संहितेत हुंडाबळी, बलात्कार, गर्भजल परिक्षण, हुंडा मागणे, महिलांची क्रयविक्री करणे, पत्नीस मारहाण यासाठी कडक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

3. घटनात्मक तरतूदी: धर्म, लिंग, वंश या आधारे कोणत्याही प्रकारे भेदभाव केला जाणार नाही. समान कामासाठी समान वेतन देण्याचे कायदे करण्यात आलेले आहेत.

## 9.12 महिलांच्या विकासासाठी भारत सरकारने ठरविलेले धोरण:

1. महिलांविषयी होणारे सर्व प्रकारचे भेदभाव बंद करणे.
2. दर्जेदार शिक्षण, रोजगार, व्यावसायीक मार्गदर्शन, समान वेतन, सामाजिक सुरक्षितता हा हक्क पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही असावा.
3. सर्व मुलभूत अधिकारांचे व स्वातंत्र्याचे पुरुषांच्या बरोबरीने सामाजीक, राजकीय, आर्थिक इ. क्षेत्रात सहभाग घेण्याचा हक्क स्त्रीयांना असावा.
4. महिलांविषयी भेदभाव करणारे सर्व प्रकारचे अन्याय निर्मुलन करण्यासाठी कायदा मजबुत करणे.
5. जाती-जमातीच्या दृष्टीकोनात परिवर्तन घडवून आणणे.
6. स्त्रीयांचा परिपुर्ण विकास करणे ज्यामुळे त्यांच्यातील सुप्त गुण लक्षात येतील.
7. महिला संघटनेत सामंजस्याची भावना मजबुत करणे.

## 9.13 मुल्यमापन:

खेडेगावात महिलांनी अल्पबचत गटांची निर्मिती करणे हे फार मोठे परिवर्तन आहे यामुळे त्यांचे दारिद्र्य कमी झाले. आर्थिक सुबत्तेमुळे महिलांनी नेत्रदिपक कामगिरी केली आहे.

अन्याय, अत्याचार, दारिद्रयात पडलेल्या महिलांच्या जीवनात अल्पबचत गट एक नवीन पहाट आहे. महिला आज विविध व्यवसाय करित आहेत.

त्यांच्यात आत्मविश्वास वाढत आहे. त्यामुळे त्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. बचत गटामुळे महिलांचे सक्षमीकरण वेगाने होऊ शकते. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी बचत गटांचा मोठा फायदा महिलांना झालेला दिसतो.

*ISBN: 978-93-90847-09-9*

# प्रकरण 10

# पंचायत राज आणि ग्रामीण विकास

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपला देश प्रजासत्ताक राज्य म्हणून अस्तित्वात आला. भारतीय राज्यघटनेने लोककल्याणकारी तत्वाला महत्व दिलेले आहे. लोकशाहीत लोकमताला जास्त महत्व असल्याने जास्तीत जास्त योजना जिल्हा, तालुका आणि गावाच्या पातळीपर्यंत पोहचविणे अभिप्रेत आहे. महाराष्ट्राने बलवंतराय मेहता समितीच्या अहवालाचा अभ्यास करण्यासाठी वसंतराव नाईक समिती नेमण्यात आली.

नाईक समितीच्या अहवालाच्या आधारे महाराष्ट्रात 1962 साली पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली त्यानुसार जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालुका स्तरावर पंचायत समिती व ग्रामीण स्तरावर ग्रामपंचायत असे त्रिस्तरीय रचनेचे स्वरुप आहे. पंचायतराज हि लोकशाहीतील महत्वाची संस्था असून सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे महत्वाचे माध्यम आहे.

भारतातील विविध घटकराज्यात कमी जास्त स्वरुपात गेली 55 वर्ष पंचायत राज्याचा प्रयोग राबविण्यात आल्याचे दिसुन येते. पंचायत राजच्या प्रयोगाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांमध्ये राजकीय जागृती मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. त्यातुनच लोकांचा राजकारणातील सहभाग वाढला आणि त्यातून नव ग्रामीण नेतृत्वाचा उदय झाला. समाजात लोकशाही भक्कमपणे रुजविण्यासाठी अशा गोष्टीस महत्वाचे स्थान देणे आवश्यक आहे.

स्वर्गीय राजीव गांधी यांनी 1987-88 मध्ये देशातील पंचायत राज्याला नवे वळन देण्याचा प्रयत्न केला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांना संवैधानिक दर्जा देणे त्यात स्त्रियांना 30% आरक्षण देणे अशा महत्वाच्या तरतूदी होत्या. त्याविषयी घटनादुरुस्ती विधेयक सरकारने तयार केले परंतु ते विधेयक मंजूर होऊ शकले नाही. परंतु ते विधेयक पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांच्या काळात संमत होवून त्याचे कायद्यात रुपांतर झाले.

## 10.1 73 वी घटना दुरुस्तीचे प्रमुख उद्देश पुढील प्रमाणे -

1. देशातील पंचायतराज संस्थेतील विविधता काही प्रमाणात कमी करुन त्यांच्यात एकसुत्रता निर्माण करणे.
1. नियोजनाचा लाभ देशातील सर्वसामान्य ग्रामीण जनतेपर्यंत पोहचविणे.
2. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय स्त्री-पुरुषांना पंचायतराज व्यवस्थेत योग्य प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळवून देणे.
3. विकास निधी हा मुख्य लाभार्थीपर्यंत पोहचविणे.
4. पंचायतराज संस्थांचे राजकीय प्रमुख, प्रशासकिय अधिकारी यांच्यात सामंजस्य व सहकार्याचा दृष्टीकोन निर्माण करणे.
5. अनुसुचीत जाती जमातीतील महिलांना आरक्षण देवून त्यांना घटनात्मक संरक्षण देणे.

ग्रामीण भागांचा सर्वागिण विकास होण्याच्या दृष्टीने पंचायतराज संस्थांची स्थापना करण्यात आली. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे सुत्र सर्वांनीच स्विकारलेले आढळून येते.

पंचायतराज विकेंद्रीकरणाच्या व्यवस्थेमुळे प्रत्येक सदस्याला म्हणजेच ग्रामपंचायतीच्या सदस्यांपासून ते संसद सदस्यांपर्यंत क्रियाशील बनविले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये जागृती निर्माण झाली.

### 10.2 पंचायतराज व्यवस्थेला अधिक सक्रिय बनविण्यासाठी पुढील गोष्टी महत्वाच्या आहेत -

1. राजकीय पक्षांचा हस्तक्षेप मर्यादितच असावा.
2. ग्रामसभेस वैधानिक स्वरुपाची मान्यता देणे.
3. पंचायतराज संस्थांना जास्त अधिकार देणे.
4. पंचायतराज व्यवस्थेतील तिन्ही स्तरांमध्ये योग्य समन्वय निर्माण करणे.
5. पंचायतराज व्यवस्थेस कर लावण्याचे अधिकार देणे.
6. पंचायतराज व्यवस्थेविषयी माहिती ग्रामीण भागातील युवकांना द्यावी.
7. ग्रामीण भागातील महिलांच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष देणे.
8. पंचायतराज व्यवस्थेत निवडून आलेल्या सदस्यांना पंचायत राज व्यवस्थेविषयी योग्य प्रशिक्षण देणे.
9. आर्थिक दुर्बल व अनुसूचित जाती जमातीच्या कुटुंबाला योग्य प्रतिनिधीत्वाची व्यवस्था करणे.

### 10.3 पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आल्यानंतर झालेला बदल -

1. ग्रामीण भागातील महिलांना राजकीय आरक्षण मिळाल्यामुळे त्यांच्यात राजकीय जागृती निर्माण होतांना दिसत आहे.
2. पंचायतराज व्यवस्थेमुळे ग्रामीण भागात राजकीय जागृती निर्माण झाल्याने नवे नेतृत्व विकसीत होत आहे.
3. पंचायतराजमुळे ग्रामसभेला प्राप्त झालेल्या अधिकारामुळे प्राथमिक शिक्षण, बालविवाह, कुपोषण या सारख्या ग्रामीण प्रश्नांची सोडवणूक होण्यास मदत होत आहे.
4. पारंपारीक जीवनामध्ये बदल होत असुन जात, वय, लिंग यावरील नेतृत्व कमी होत आहे.

5. पंचायत राज व्यवस्थेमुळे अनेक खंबीर नेतृत्व तयार झालेली आहेत.
6. ग्रामीण भागात बचत गटांची निर्मिती झाली आणि बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना आर्थिक विकासाच्या संधी प्राप्त झाल्यात.

## 10.4 निष्कर्ष:

1.समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी पंचायतराज व्यवस्था एकमेव स्थान आहे.

2.पंचायतराज व्यवस्थेमुळे लोकशाही मजबुत होण्यास हातभार लागला.

3.ग्रामीण नेतृत्वाचा विकास झाला.

4.ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना न्याय मिळाला.

ISBN: 978-93-90847-09-9

# प्रकरण 11

# मुलभूत हक्क आणि भारतीय संविधान

## 11.1 प्रास्ताविक:

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. प्रत्येक मनुष्यास व्यक्ती म्हणून स्वतंत्र अस्तित्व असते. स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. समाजात अनेक व्यक्ती राहतात आणि त्यांच्याशी आपले संबंध असतात. व्यक्ती आपल्या ईच्छा, आकांक्षा, गरजा पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत असते. हे करित असतांना परस्पर संबंधांचे संगोपनही करायचे असते. यातुन व्यक्तीच्या व्यक्तीगत गुणांचा सर्वांगिण विकास होतो.

परस्पर गरजांचा विचार, परस्परांना सहाय्य आणि एकमेकांविषयी असणारी सहानुभूती हा सामाजीक जीवनाचा आधार आहे यातुन खऱ्या अर्थाने हक्कांची निर्मिती होते. हक्क हे मानवी जीवनातील समाजशीलतेतून निर्माण होतात. व्यक्ती जेव्हा दुसऱ्या व्यक्तींच्या संपर्कात येत असते तेव्हा त्याच्या स्वातंत्र्यावर एकमेकांच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा पडतात. यातूनच आपले हक्क आणि त्यांच्यावरील मर्यादांची आपणास जाणिव होते.

लोकशाही व्यवस्थेत नागरीकांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी हक्कांची गरज असते. काही हक्क आपणास व्यक्ती म्हणून असलेल्या अस्तित्वासाठी असतात. आणि काही हक्क आपल्या गुणांच्या विकासासाठी योग्य असे वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक

असतात. तर काही हक्क आपणास राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी असतात. मानवास आत्मविकास साधण्यासाठी काही हक्कांची आवश्यकता असते. अधिसत्तावादी समाजामध्ये व्यक्तीच्या हक्काची मान्यता नव्हती परंतू लोकशाहीत व्यक्तीसाठी हक्कांचा अंगीकार केला जातो. इंग्लंडमध्ये म्नाचार्टात मुलभूत हक्कांचा उच्चार झाला होता. अमेरिकेत 1789 मध्ये मुलभूत हक्कांसाठी घटनादुरुस्ती करण्यात आली होती.

फ्रेंच राज्यक्रांतीत क्रांतीकारकांनी "मानव हक्क जन्मत:च स्वतंत्र व समान असतात आणि राहतात" या तत्वाची घोषणा केली होती.

1948 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांचा समावेश केला. जगातील विविध देशांच्या राज्यघटनेमध्ये व्यक्तींचे मुलभूत हक्क नमुद करण्यात आलेले आहेत. म्हणूनच मानवाच्या विकासासाठी हक्कांची आवश्यकता असल्याचे दिसून येते.

### 11.2 शोधनिबंधाचा उद्देश:

"मुलभूत हक्क आणि भारतीय संविधान" यांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

### 11.3 संशोधन पध्दत:

प्रस्तुत लघुशोध संशोधनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. त्यात प्रकाशीत, अप्रकाशीत ग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्र, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. संकलीत माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

### 11.4 शोधनिबंधाची उद्दिष्टे:

प्रस्तुत संशोधन लेखाच्या अभ्यासाकरिता पुढील उद्दिष्टांचा अभ्यास केला आहे.

1. मुलभूत हक्कांची ओळख करुन घेणे.
2. मुलभूत हक्कांची माहिती जाणून घेणे.
3. भारतीय संविधानातील मुलभूत हक्कांचे महत्व सांगणे.
4. मुलभूत हक्कांचे वर्णन करणे.

## 11.5 गृहितके:

1. व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी मुलभूत हक्क महत्वाचे आहेत.
1. मुलभूत हक्कांचा समावेश जगातील अनेक राष्ट्रांनी आपल्या संविधानात समाविष्ट केली आहेत.
2. मुलभूत हक्कांमुळे व्यक्तींचा विकास होतो.
3. भारतीय संविधानात मुलभूत हक्कांची तरतूद आहे.
4. भारतीय नागरीक आपल्या हक्कांविषयी जागृत आहेत.
5. भारतीय नागरिक आपल्या मुलभूत हक्कांचा वापर करीत आहेत.

## 11.6 विषयाचे महत्व:

भारतीय संविधानात व्यक्तीच्या विकासासाठी मुलभूत हक्कांचा समावेश केलेला आहे पण व्यक्तीविकास हाच मुलभूत तत्वाचा समावेश नसून नागरीकांना दिलेल्या तत्वावरुन राज्यांचे स्वरुप स्पष्ट होते.

या तत्वाला अनुसरुन जर नागरिकांच्या जीवनात काही सोयी व व्यक्ती विकासाची निश्चित योजना नसेल तर लोकशाही अस्तित्वात येणार नाही.

लोकशाहीचे स्वरुप स्पष्ट व्हावे म्हणून मुलभूत हक्कांची तरतुद संविधानात करण्यात आली आहे. नागरीकांना आपल्या सुखमय जीवनासाठी हे हक्क महत्वाचे असतात. भारतीयांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकास आणि बंधुभाव वाढविण्यासाठी मुलभूत हक्कांची तरतूद भारतीय संविधानाच्या कलम 12 ते 35 मध्ये करण्यात आलेली आहे.

## 11.7 भारतीय मुलभूत हक्कांचा इतिहास:

भारताच्या राज्यघटनेत मुलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला असला तरी मुलभूत हक्कांची मागणी ब्रिटीशांच्या काळापासून झाल्याची आढळून येते.

कारण स्वातंत्र्यलढ्याच्या आंदोलनातील प्रत्येकाने मुलभूत हक्कांना एक "निकडीची गरज" म्हटले होते. 1928 मध्ये सर्वप्रथम सर्वपक्षीय संमेलनामध्ये मुलभूत हक्कांची मागणी करण्यात आली होती. काँग्रेसने 1931 मध्ये एका ठरावाद्वोर "काँग्रेस मुलभूत हक्कांचा समावेश असणारी घटना स्विकारील" असे मान्य केले होते. भारतीय नागरीकांना मुलभूत हक्क द्यावेत या मताचे ब्रिटीश नसल्याने 1935 च्या कायद्यात या हक्कांचा समावेश करण्यात आला नव्हता म्हणून 1935 नंतर ही मागणी मागे पडल्याचे दिसून येते. 1945 च्या सप्रु समितीच्या अहवालात विधीमंडळात कार्यकारीणी आणि न्यायालयीन आचार संहिता निश्चित करण्यासाठी मुलभूत हक्कांची निर्मिती आवश्यक आहे. 1946 मध्ये मात्र ब्रिटीशांनी स्पष्टपणे आगामी घटनेत मुलभूत हक्कांना समाविष्ट करण्याचे मान्य केले होते.

## 11.8 मुलभूत हक्कांचा अर्थ:

1. हेरॉल्ड लास्कीच्या मते "समाजाने अथवा राज्याने मान्यता दिलेल्या मागण्या म्हणजे हक्क होय."
2. व्यक्ती किंवा व्यक्तीसमुह यांना चांगले जीवन जगण्यासाठी जी सामाजीक परिस्थिती आवश्यक असल्याचे समाजाने मान्य केलेले असते ती परिस्थिती म्हणजे हक्क होय.

कोणत्याही राज्याचा दर्जा ते राज्य तेथील नागरिकांना किती अधिकार देत असते यावरुन ठरत असतो. निरंकुश शासन पध्दतीत नागरिकांना कोणत्याही प्रकारचे हक्क नसतात, परंतू लोकशाहीत व्यक्तीला विकासाची संधी हक्कादवारे उपलब्ध करुन देण्यात येते.

राज्यघटनेत मुलभूत हक्कांचा समावेश केला गेल्यामुळे त्यावर कोणीही अतिक्रमण करु शकत नाही. लोकशाहीत राज्यात व्यक्तीच्या हक्कांचा प्रश्न अत्यंत महत्वाचा असतो.

लोकशाहीचे यशापयश त्या राज्यातील लोकांना किती स्वातंत्र्य आहे यावर अवलंबून असते, हि लोकशाही राज्याची खरी निशाणी असते. म्हणून प्रत्येक लोकशाही राज्यात व्यक्तीला स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल असे वातावरण निर्माण करणे व राज्याची सुरक्षितता व स्थौर्य कायम राहील या दोन्ही गोष्टींमध्ये संतुलन राखणे महत्वाचे असते आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नागरीकांना हक्क द्यावे लागतात. मुलभूत हक्क हे अन्य हक्कांपेक्षा वेगळ्या स्वरुपाचे असतात. त्यांना संविधानासारख्या मुलभूत कायद्याचा आधार असतो.

त्यामुळे विधीमंडळाला कायदे करुन किंवा शासनाला आपल्या आज्ञा, नियम, कृती यातुन त्यांचा संकोच करता येत नाही.

कारण संविधानाने निर्माण केलेल्या सरकारला संविधानाच्या व्यापक चौकटीत राहुनच आपले व्यवहार करावे लागतात व मुलभूत हक्कांचे संविधानात विशिष्ट स्थान असल्यामुळे त्या हक्कांवर अतिक्रमण करणे किंवा त्यांचा संकोच करणे हे संविधानावरचे आक्रमण मानले जाते. त्यांच्या संरक्षणाची हमी देखील संविधानातील तरतुदीमध्येच दिलेली असते. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या विभागात 12 ते 35 कलमांमध्ये सुरुवातीस सात मुलभूत हक्कांचा समावेश होता. 44 व्या घटनादुरुस्तीने मालमत्तेचा अधिकार हक्कांच्या यादीतून वगळलेला आहे.

त्यामुळे संविधानात सध्या सहा मुलभूत हक्क आहेत. घटनाकारांनी फ्रान्स, कॅनडा, अमेरिकेच्या घटनांचा विचार करुन आपल्या देशाच्या संविधानात हक्कांचा समावेश केला आहे. भारतीय संविधानातील मुलभूत हक्क पुढीलप्रमाणे आहेत.

### 11.8.1 समतेचा हक्क:

लोकशाहीत समतेच्या हक्काला अनन्यसाधारण असे महत्व आहे. देशाच्या सामाजीक आणि राजकीय जीवनात समानता प्रस्थापित केल्याशिवाय लोकशाही खऱ्या अर्थाने यशस्वी होत नाही. भारतात मोठया प्रमाणात विषमता दिसून येते. त्यामुळे समानतेची आवश्यकता निर्माण होते. म्हणून भारतीय घटनाकारांनी समतेचा हक्क भारतीय संविधानात अग्रक्रमाने दिला आहे. समतेच्या हक्काला अनुसरुन भारतीय घटनाकारांनी सर्व नागरीकांमध्ये समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. जातीच्या उतरंडीवर आधारलेल्या भारतीय समाजात (74) हे कलम महत्वाचे ठरते.

पारंपारीक भारतीय समाजात जाती व जन्मानुसार व्यक्तीचे स्थान ठरत असे सर्व व्यक्ती समान मानल्या जात नसत. स्त्रियांना गैण स्थान देण्यात येत

होते. एखाद्या गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या जातींसाठी वेगवेगळी शिक्षा मनुस्मृतीत सांगितलेली आहे. मनुस्मृतीने नाकारलेली समता भारतीय संविधानाने या 14 कलमांद्वारे प्रदान केलेली दिसून येते. समता याचा अर्थ सर्व क्षेत्रात समानता नव्हे. तर समता याचा अर्थ कायद्यापुढे समता आणि सर्वांना समान संधी. एवढ्या मर्यादित अर्थानेच संविधानाने समतेचा हक्क दिला आहे. या समतेच्या हक्कात पुढील गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.

**a.** कायद्यापुढे समानता: भारतीय संविधानातील समतेच्या हक्काने प्रत्येक व्यक्तीचा मग ती व्यक्ती भारताची नागरीक असो वा नसो, कायद्यापुढे समान लेखण्याची हमी देण्यात आली आहे. व्यक्ती व्यक्तीत जातीच्या, धर्माच्या, वंशाच्या किंवा श्रीमंत गरीब या आधारे कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही.

कायद्यानुसार सर्वांना समान परिस्थितीत समान कायदा लागु केला जाईल. यासाठी कायद्याचे 'समान संरक्षण' असा शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे. यानुसार समान गुन्ह्यासाठी समान शिक्षा होईल. व्यक्तीची जात, धर्म, सामाजिक प्रतिष्ठा याचा विचार कायदा करणार नाही पण त्याचबरोबर राज्यांना स्त्रिया व मुलांसाठी स्वतंत्र कायदा करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. तसेच सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्र्या मागासलेल्या वर्गासाठी विशेष कायदा करण्याचा अधिकार राज्यांना दिलेला आहे. असा अधिकार सामाजिक आणि शैक्षणिक बाबतीत समता निर्माण करण्यासाठी देण्यात आला आहे. अनेकदा समाजाच्या हितासाठी अशा प्रकारचा भेदभाव करणे गरजेचे असते.

**b. भेदभावाचा अभाव:** कलम 15 मध्ये असे म्हटले आहे की, धर्म, वंश, जात, भाषा, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारावर नागरीकांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. या आधारावर सार्वजनिक उपहारगृहे, दुकाने, करमणुक गृहे, तळी, विहीरी, घाट, रस्ते, सभागृहे यात प्रवेश नाकारला जाणार नाही. पण यास काही अपवाद आहेत

1. विहीर, स्नानघाट, तळे इत्यादी जर वैयक्तिक मालमत्ता असेल तर भेदाभेद केला जाऊ शकेल.
2. क्षय, महारोगी इ. भयानक रोगांनी ग्रस्त व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणांचा वापर करण्यावर बंदी घालण्यात येते.
3. स्त्रीया व मुले यांच्यासाठी विशेष कायदे करता येतात.
4. शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासलेल्या वर्गासाठी खास तरतूदी करण्यास बाधा येणार नाही.

**b. समान संधी:** संविधानाच्या 16 व्या कलमात सार्वजनिक नेकज्यांमध्ये समान संधी दिली जाईल असे म्हटलेले आहे. धर्म, वंश, जात, वर्ग, जन्मस्थान या आधारे भेदभाव करता येणार नाही किंवा या कारणावरुन कोणालाही अपात्र ठरविले जाणार नाही. परंतू काही विशिष्ट जातीजमातीच्या विकासासाठी नोकऱ्या देतांना राखीव जागा सरकार उपलब्ध करुन देवू शकते किंवा आवश्यक त्या ठिकाणी शैक्षणिक अटीही शिथिल करु शकते.

तसेच एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायीक संस्थेशी संबंधित पद किंवा नोकऱ्या त्या विशिष्ट धर्माच्या किंवा संप्रदायाच्या अनुयांयासाठी मिळण्यासाठी कायदा करता येतो.

**c. अस्पृश्यता निवारण:** कलम 17 नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारच्या अस्पृश्यतापालनास बंदी असून तो फौजदारी गुन्हा समजला जाईल आणि तसे करणाऱ्यास कायद्याप्रमाणे शिक्षा देण्यात येईल.

समतेचा हक्क प्रदान करणाऱ्या कितीही तरतूदी केल्या तरी जोपर्यंत अस्पृश्यता कायम आहे तोपर्यंत खरी समता नांदू शकत नाही. याची घटनाकारांना कल्पना होती.

म्हणून समाजास गेल्या कित्येक दशकापासून लागलेला अस्पृश्यतेचा कलंक धुऊन टाकणारे हे सतरावे कलम घटना समितीने "महात्मा गांधी की जय"च्या जयघोषात एकमताने मंजूर केले. 1955 साली संसदेने एक कायदा करुन अस्पृश्यता पालनाचा गुन्हा करणाऱ्यास 500 रु. दंड आणि सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा ठरविलेली आहे.

**d. पदव्यांचे समाप्तीकरण:** भारतीय संविधानाच्या 18 व्या कलमानुसार पदव्यांचे समाप्तीकरण करण्यात आलेले आहे. पदव्यांमुळे समाजात विषमता निर्माण होऊ शकते. यामुळे भारतात किंवा परकीय देशाकडून भारत सरकारच्या परवानगीशिवाय पदवीचा स्विकार करता येणार नाही. पुर्वी ब्रिटीशांकडून रावसाहेब, रावबहादूर, खानसाहेब, दिवाणसाहेब अशा प्रकारच्या पदव्या सामाजीक व राजकीय कामगिरीकरिता व्यक्तींना मिळत होत्या.

पदव्या घेणाऱ्या व्यक्तींना विशेष अधिकार प्राप्त होत असत. त्यामुळे व्यक्तीव्यक्तींमध्ये कृत्रिम भेदभाव निर्माण होत असे. हा भेदभाव नष्ट करण्यासाठी आता ह्या पदव्या कायद्याने बंद केलेल्या आहेत.

1950 पासुन भारत सरकारकडुन व्यक्तीच्या विशेष सामाजिक कामगिरीसाठी पदव्या देत आहे. उदा. पद्मभुषण, पद्मविभुषण, कृषीपंडीत, भारतरत्न, इत्यादी.

### 11.8.2 स्वातंत्र्याचा हक्कः

व्यक्तीगत स्वातंत्र्य हा प्रजातंत्र शासनाचा आत्मा आहे. व्यक्तीला स्वातंत्र्य दिल्याशिवाय तिच्या अभिव्यक्ती विकसीत होऊ शकत नाही की सुप्त गुणांना संधी मिळू शकत नाही. त्याशिवाय व्यकती आपला उत्कर्ष करु शकत नाही. व्यक्तीच्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास होणार नाही अर्थात व्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ स्वौराचारी, अनिर्बंध स्वातंत्र्य असा मात्र होत नाही.

समाजहितास अडथळा येऊ नये म्हणून नागरीकांच्या स्वातंत्र्यावर उचित बंधने असणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाच्या 19 ते 22 कलमांमध्ये याविषयी सविस्तर विवेचन करण्यात आले आहे.

i) भाषण आणि विचार स्वातंत्र्य, ii) निशस्त्रपणे सभा भरविण्याचे स्वातंत्र्य, iii) संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, iv) भारतात कोठेही संचार करण्याचे स्वातंत्र्य v) भारतात कोठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य, vi) कोणताही धंदा अगर व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, vii) व्यक्ती स्वातंत्र्याची हमी

हि सर्व स्वातंत्र्ये व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक आहेत. शिवाय लोकशाही व्यवस्थेत राजकारणात सहभागी होण्यासाठीही आवश्यक आहेत. त्या अर्थाने तो लोकशाहीचा प्राण आहे. परंतू कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नैतिक कारणावरुन वा देशाच्या संरक्षणासाठी वा स्वातंत्र्याचा संकोच करण्याचा अधिकार राज्याला आहे. उदा. जातीय दंगली टाळण्यासाठी मिरवणुका किंवा

सभांवर बंदी घालणे रास्त मानावे लागेल. याबरोबरच दोन नागरी हक्क सर्व व्यक्तींना दिलेले आहेत.

त्यानुसार कोणत्याही कायद्याने ठरवून दिलेल्या पध्दतीखेरीज अटक करता येत नाही. स्वत:विरुध्द साक्ष देण्याची त्यावर सक्ती करता येत नाही किंवा पूर्वलक्षी प्रभावाने गुन्हे ठरविता येत नाहीत. या हक्कांमुळे सरकारच्या कारभारावर अंकुश लावला आहे. अर्थात अपवादात्मक परिस्थितीत प्रतिबंधक अटक करण्यासाठी सरकारला कायदा करता येतो पण त्यावर न्यायपालीकेची देखरेख असते.

### 11.8.3 शोषणाविरुध्दचा हक्कः

कलम 23 नुसार वेठबिगार, सक्तीने कामे करवुन घेणे आणि सक्तीने मजुरी कायद्याने बंद करण्यात आली आहे. देशातील गुलामगिरीचे संपुर्ण उच्चाटन व्हावे या उद्देशाने देशात कोणत्याही जाती, धर्माच्या माणसाच्या खरेदी विक्रीस अवैध ठरविण्यात आले आहे. यात स्त्री दास्यत्व आणि सक्तीने चालविलेल्या वेश्याव्यवसायाचाही अंतर्भाव होऊ शकतो. कलम 24 नुसार 14 वर्षाखालील मुलामुलींना खाणी, रेल्वे, कारखाने, अवजड यंत्रावर जोखमीच्या कामासाठी जुंपता येणार नाही. शोषणाविरुध्दचा हक्क नागरीकांना देण्यात आला असला तरी याबाबत काही सत्ता सरकारकडे राखून ठेवण्यात आली आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने नागरीकांकडून सरकार सक्तीने एखादे काम करुन घेऊ शकेल. परकीयांचे आक्रमण, पुर निवारण, इतकेच नव्हे तर राष्ट्र उभारणीचे कार्य करित असतांना सरकारला सोयीचे जावे म्हणून हि सत्ता देण्यात आली आहे. उदाहरण द्यावयाचे झाल्यास प्रत्येक पदवीधराने पदवी स्विकारण्यापुर्वी सामाजीक क्षेत्रात विशिष्ट सेवा कार्य केलेच पाहिजे अशी

सक्ती सरकार करु शकेल. मात्र हि सक्ती करतांना धर्म, जात, वंश, वर्ग इत्यादी आधारावर सरकार भेदभाव करु शकणार नाही.

### 11.8.4 धर्म स्वातंत्र्याचा हक्क:

भारतीय संविधानातील कलम 25 ते 28 मध्ये धर्मस्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला आहे. भारतीय परंपरेला अनुसरुन प्रत्येक व्यक्तीला तिच्या मताप्रमाणे धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. धर्म हि वैयक्तिक बाब मानण्यात आली आहे. प्रत्येक भारतीय नागरीकास आपल्या मर्जीप्रमाणे कोणताही धर्म स्विकारण्याचा, आचरण्याचा, त्याचा प्रसार व प्रचार करण्याचा अधिकार दिला आहे.

परंतू सार्वजनिक व्यवस्था, सामाजीक नीती आणि आरोग्य यांना बाधा येणार नाही अशा प्रकारच्या अधिकाराचा वापर करण्यात यावा. कृपाणाचा वापर करणे हे शीख धर्माच्या आचरणाचे आवश्यक अंग असल्यामुळे शिखांना कृपाण वापरण्यास परवानगी दिली आहे. जर एखाद्या धार्मिक संस्थेमुळे अर्थव्यवस्था धोक्यात येत असेल तर सरकार अशा धार्मिक संस्थेवर नियंत्रण घालू शकते. या अधिकारास अनुसरुन हिंदूंची सर्व देवळे सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी खुली करण्यात आली आहेत. धर्मदाय संस्था स्थापन करुन त्या चालविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यांच्या संपत्तीची विल्हेवाट लावण्याचा अधिकारही त्या संस्थांना देण्यात आला आहे. मात्र कोणत्याही धर्माच्या प्रचारासाठी सक्तीने पैसा जमा करता येणार नाही.

सामाजीक सुधारणेसाठी धार्मिक बाबींवर सरकार नियंत्रण घालू शकते. सरकारी अनुदान मिळणाऱ्या शिक्षण संस्थांना धार्मिक शिक्षण देता येणार नाही. मात्र एखाद्या ट्रस्टच्या अधिकाराखाली स्थापन झालेल्या व राज्यांकडून चालविल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थेमधून जर धार्मिक शिक्षण देण्याची अट असेल तर हा नियम लागू पडणार नाही.

### 11.8.5 शिक्षण आणि संस्कृतीचा हक्क:

भारतात राहणाऱ्या सर्व नागरिकांना त्यांची भाषा, लिपी, संस्कृती यांची जोपासना करण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे. भारतातील अल्पसंख्यांक जाती-जमातींना त्यांची संस्कृती जोपासण्यासाठी हा अधिकार दिला आहे. या अधिकारात असे म्हटले आहे की, कोणत्याही व्यक्तीला सरकारी किंवा सरकारी मदतीवर चालविलेल्या शिक्षण संस्थेतून धर्म, वंश, जात, भाषा यापैकी कोणतेही कारण सांगून प्रवेश नाकारला जाणार नाही. कलम 30 नुसार अल्पसंख्याक जातींना आपल्या पसंतीची शैक्षणिक संस्था उभी करण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. तसेच भारतीय संविधान प्रत्येक भारतीय नागरीकास शिक्षण देण्याचा अधिकार देते. कोणत्याही व्यक्तीस ही संधी धर्म, भाषेच्या कारणावरुन नाकारता येत नाही. अर्थात काही अभ्यासक्रमांसाठी राज्य अर्हता निश्चित करु शकते. हि अर्हता गुणांवर आधारित असली पाहिजे. या व्यतिरिक्त आजपर्यंत शिक्षणापासून वंचीत राहिलेल्या समाजासाठी राज्य काही जागा राखीव ठेवू शकते.

### 11.8.6 घटनात्मक उपाययोजनेचा हक्क:

भारतीय संविधानाने विविध कलमांद्वारे मुलभुत अधिकारांना अर्थ प्राप्त करून देणारा अधिकार म्हणजे घटनात्मक उपायांचा अधिकार होय. या अधिकाराने मुलभूत हक्कांना कायद्याद्वारे शक्ती प्राप्त करुन दिलेली आहे. कलम 32 नुसार मुलभूत हक्कांवर अतिक्रमण झाल्यास न्यायालयात दाद मागता येते. नागरिकांच्या दृष्टीकोनातून एखादा कायदा अधिकारांचा संकोच करित असेल तर त्या कायद्याला मुलभूत अधिकाराच्या रक्षणासाठी न्यायालयात आव्हान देण्याचा अधिकार नागरीकास आहे. अशाप्रकारे आव्हान केलेला कायदा न्यायालयाच्या दृष्टीकोनातून खरोखरच मुलभूत अधिकाराचा संकोच करित असेल तर तसा कायदा घटनाबाह्य उपायांच्या अधिकाराला घटनेचा आत्मा म्हटले जाते. या अधिकारामुळेच इतर अधिकारांचा उपयोग घेता येतो. हा अधिकार नसेल तर इतर अधिकार अर्थहिन होतील. भारतीय नागरीकास हक्काच्या रक्षणासाठी 1) बंदीप्रत्यक्षीकरण, 2) परमादेश, 3) प्रतिबंध, 4) अधिकार स्पृच्छा, 4) उत्प्रेषण अशा प्रकारचे अर्ज न्यायालयात सादर करता येतात. मूल्यमापन: भारतीय संविधानाने भाग तीनमध्ये दिलेले मुलभूत हक्क म्हणजे "भारतीय लोकशाहीचा पाया" असे त्याचे वर्णन केले जाते. देशातील नागरीकांच्या विकासासाठी मुलभुत हक्क महत्वपुर्ण आहेत. व्यक्तीस्वातंत्र्यास न्यायालयाचे कवच आहे. हक्कावर अतिक्रमण झाल्यास न्यायालयात जाता येते. नागरीकांना आपले चांगले जीवन जगता यावे यासाठी त्यांना हक्क दिले आहेत. श्री. एम.व्ही. पायली यांनी मुलभूत हक्कांचे वर्णन करतांना म्हटले आहे की, "निरनिराळ्या घटना दुरुस्त्यांमुळे काही हक्कांची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे हि वस्तुस्थिती असली तरी सबंध प्रकरणाचा विचार करता मुलभूत हक्कांचे प्रकरण म्हणजे भारतीय लोकशाहीचा मजबूत व टिकाऊ असा आधार, सार्वजनीक वर्तणुकीचे नियम सांगणारी संहिता व वैयक्तिक स्वातंत्र्याचे रक्षण करणारा प्रचंड बुरुज होय." हक्कांचे रक्षण करण्यासाठी न्यायालयाप्रमाणे इतरही यंत्रणेची निर्मिती

करण्यात आलेली आहे. संसदेने 1993 मध्ये मानवी हक्क संरक्षण कायदा पास केला. नंतर 2000 मध्ये मुलभूत हक्क आणि इतर मानवी हक्कांचे संरक्षण करण्याच्या हेतुने राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. या आयोगाकडे मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत तक्रारही दाखल करता येते.

ISBN: 978-93-90847-09-9

# प्रकरण 12

# अनुसुचित जाती-जमातीसाठी कायदे एक विश्लेषणात्मक अभ्यास

अनुसूचित जाती हा शब्द प्रथम 1925 च्या कायद्यात वापरण्यात आला. 1936 मध्ये ब्रिटीश शासनाद्वारा प्रसारीत आदेशात काही जन-जातींचा उल्लेख अनुसुचित जातीत करण्यात आला. स्वातंत्र्यानंतर 1950 मध्ये सर्वप्रथम अनुसुचित जातीच्या दहा जाती राष्ट्रपतींद्वारा प्रसारीत करण्यात आल्यात. अनुच्छेद 341 नुसार सामाजिक दृष्ट्या बहिष्कृत आणि अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातींचा यात समावेश करण्यात आला. तसेच 1976 मध्ये काही जातींचा त्यात समावेश करण्यात आला. ज्यांचा इतिहास फारसा ज्ञात नाही असा आदिवासी या देशाचा प्रथम भूमीपुत्र मानला जातो. वनातील वास्तव्यात भाषा, संस्था, श्रध्दा, विश्वास, प्रथा इ. बाबतीत इतरांपेक्षा वेगळ्या असणाऱ्या आदिवासींची तांत्रिक व आर्थिक क्षेत्रातील प्रगती अतिशय मंद आहे.

सर्वप्रथम भारतात प्रशासन कायदा 1870 नुसार काही भागाला 'आदिवासी क्षेत्र' म्हणून घोषित करण्यात आले. त्यानुसार 1874 मध्ये स्वतंत्र आदिवासी जिल्ह्यांची घोषणा करण्यात आली. 1919 चा कायदा व 1935 च्या कायद्यानुसार असे विभाग आणि जिल्ह्यांची संख्या वाढविण्यात आली. स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान जवाहरलाल नेहरुंनी आदिवासींच्या विकासावर विशेष भर दिला. त्यासाठी त्यांनी पाच तत्वांचा पुरस्कार केला.

1. आदिवासींवर कोणतीही गोष्ट न लादता त्यांना त्यांच्या इच्छेनुसार जीवन जगू द्यावे.

2. त्यांच्या वास्तव्याचा परिसर आणि जंगल यावरील आदिवासींचा हक्क मान्य करण्यात यावा.
3. त्यांचा विकास घडविण्यासाठी त्यांच्यातीलच तरुणांना शिक्षण, प्रशिक्षण दिले जावे. वनक्षेत्रात बहिस्थ व्यक्तीचा शक्यतोवर प्रवेश नाकारावा.
4. आदिवासींच्या पूर्वापार सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांद्वारा विकास कामे करुन घ्यावीत.
5. त्यांच्यासाठी केलेल्या कार्याचे मुल्यांकन संख्याशास्त्राच्या तसेच पैशांच्या आधारे न करता मानवी भूमिकेतून करावे.

संविधानाच्या 341(1) नुसार राष्ट्रपती घटकराज्य आणि केंद्रशासीत प्रदेशातील कोणताही विभाग आदिवासी म्हणून घोषीत करु शकतात.

1959 मध्ये बहुउद्देशीय दृष्टीकोनातून आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीचे अध्यक्ष व्हेरिअर एडविन हे होते. तर 1961 मध्ये यु.एन.ढेबर यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी कमिशनची स्थापना करण्यात आली. तर 1966 साली हरिसिंह यांच्या अध्यक्षतेखाली 'वनविभागातील आदिवासींची अर्थव्यवस्था' यांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली. अनुसुचित जाती-जमातीच्या आयोगाद्वारे तसेच आदिवासी आयुक्तांद्वारे विकास कार्याचा अहवाल दरवर्षी संसदेला सादर केला जातो. या विकास कार्याचा आढावा घेण्याचे कार्य संसदीय समितीद्वारे पार पाडले जाते.

मागासवर्गीय आणि आदिवासींच्या संदर्भातील समस्यांचे प्रामुख्याने दोन कारणे दिसून येतात. मागासवर्गीय अस्पृश्य मानले जातात तर आदिवासी सामाजिक आणि आर्थिक दुर्बलतेमुळे राष्ट्रीय प्रवाहापासून दूर राहिले आहेत.

याशिवाय भटक्या विमुक्त जाती भटकंतीमुळे विकास साधु शकले नाहीत. म्हणून

1.8 मे 1955 मध्ये नागरी अधिकार संरक्षण कायदा लागू करण्यात आला.

2.1959 अंदमान निकोबार, 1962 दादरा नगर हवेली, 1967 उत्तर प्रदेश, 1975 - हिमाचल प्रदेशात अनुसचित जातीचे व काही जनजातींचा समावेश करण्यात आला.

3.11 सप्टेंबर 1989 च्या कायद्याने अनुसुचित जाती-जनजातींच्या अत्याचार निवारण्यासंदर्भाचा कायदा करण्यात आला.

4.16 नोव्हेंबर 1992 च्या सुप्रीम कोर्टाच्या 9 न्यायाधिशांच्या खंडपीठाने सामाजिक व शैक्षणिक मागासलेल्या वर्गांना आरक्षणासंबंधी निर्णय दिला. व 8 सप्टेंबर 1993 मध्ये सिव्हील पदासाठी आरक्षण मान्य करण्यात आले. व तसा अध्यादेश काढण्यात आला.

5.1990 च्या 65 व्या घटना दुरुस्तीने विशेष अधिकारांच्या जागी मागास जाती व जनजातीसाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली.

## 12.1 अनुसुचित जाती आणि भारतीय संविधान:

भारतीय संविधानात अनुसुचीत जातीच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष तरतुदी केलेल्या आहेत. भारतीय लोकशाहीने स्वातंत्र्य, समता, न्याय, समानसंधी हि तत्वे स्विकारलेली आहेत. यास अनुसरुन घटनेत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

1. भारतीय संविधानातील 15 कलमानुसार धर्म, वंश, जात, वंश या आधारे भेदभाव करता येणार नाही.

2. कलम 16 नुसार नोकरी किंवा पदावर नियुक्तीबाबत सर्व नागरीकांना समान संधी देण्यात येईल. धर्म, जात, लिंग, जन्मस्थान, वंश या आधारावर अपात्र ठरविले जाणार नाही.
3. कलम 17 नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे. अस्पृश्यता मानणे हा दंडनीय गुन्हा ठरविण्यात आलेला आहे.
4. कलम 29 नुसार शासनाच्या निधीवर चालणाऱ्या मदत मिळणाऱ्या शिक्षण संस्थेत धर्म, जात, भाषा, वंश या आधारे प्रवेश नाकारला जाणार नाही.
5. कलम 46 नुसार अनुसुचीत जातीकरीता आर्थिक व शैक्षणिक हिताची जोपासना करण्याची जबाबदारी राज्यावर सोपविलेली आहे.
6. कलम 330 व 332 नुसार अनुसुचीत जातींना लोकसभा व विधानसभा यांत प्रतिनिधीत्वासाठी आरक्षण दिले आहे.
7. कलम 335 नुसार अनुसुचित जातीसाठी केंद्र व राज्य सरकार नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिलेले आहे.
8. कलमानुसार अनुसुचित जातीच्या कल्याणासाठी स्वतंत्र कल्याण मंत्रालय निर्माण करण्याची तरतूद आहे.

## 12.2 सरकारी सोई सवलती:

1. केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत अनुसुचित जातींसाठी 15% जागा राखीव आहेत.
2. शिक्षणासाठी सवलत व शिष्यवृत्ती तसेच वसतीगृह सुविधा देण्यात आलेल्या आहेत.

3. अनुसुचित जातीच्या विद्‍याथ्र्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वसतीगृह आहे. त्या वसतीगृहात राहणे, भोजन, पुस्तके हा खर्च शासनामार्फत केला जातो.
4. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राखीव जागा आहेत.
5. अनुसुचित जातीच्या लोकांना स्वत:चा व्यवसाय व उद्‍योगासाठी कर्ज मिळावे म्हणून महात्मा फुले विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे विकास मंडळ स्थापन करण्यात आलेली आहेत.
6. अनुसुचित जातीच्या शेतकज्यांना विहीरी बांधणे, मोटार लावणे, शेती अवजारे, बी-बियाणे, खते, गायी, म्हशी यासाठी वित्तीय सहाय्य करण्यात येते.
7. अनुसुचित जमातीच्या लोकांना इंदिरा आवास योजनेमार्फत मोफत घरे बांधून दिली जातात.

## 12.3 आदिवासींच्या संदर्भात संविधानातील तरतुदीः

आदिवासींसाठी संविधानात पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेत.

1. 15 वे कलम - या कलमानुसार धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यावरुन भेदभाव केला जाणार नाही.
2. कलम 16 नुसार नोकज्यांमध्ये भेदभाव केला जाणार नाही.
3. कलम 17 नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली.
4. कलम 29 नुसार आचार-विचार, उच्चार, संचार, व्यवसाय करणे, संघटना स्थापन करण्याचे हक्क मिळाले आहेत.
5. 23 व्या कलमाने सक्तीने काम करुन घेणे व अनैतिक व्यापारावर बंदी घालण्यात आली आहे.

6. कलम 25 व 29 नुसार धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक हक्क दिलेले आहेत.
7. कलम 330 व 332 नुसार विधानसभा व लोकसभा यात आदिवासींसाठी राखीव जागा आहेत.

   आदिवासींसाठी शासकीय सुविधा

आदिवासींच्या विकासासाठी राज्य व केंद्र शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. आदिवासी त्या योजनेसाठी उपलब्ध असलेला पैसा, योग्यरित्या खर्च होतो किंवा नाही ही जबाबदारी विभागीय आदिवासी आयुक्तांवर टाकण्यात आलेली आहे. आदिवासींसाठी पुढील योजना राबविल्या जातात.

a. **शैक्षणिक योजना:**

1. शासकीय वसतीगृहे व आश्रमशाळा
2. आदर्श आश्रमशाळा
3. शिष्यवृत्ती योजना
4. व्यावसायीक शिक्षणातील मुलांकरिता निर्वाह भत्ता
5. आदिवासी जमातीच्या विद्याथ्र्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपुर्तीकरण योजना

**b. आर्थिक सहाय्य योजना:**

1. व्यवसाय प्रशिक्षण योजना
2. आदिवासी शेतकज्यांना वीजपंप पुरविणे.
3. व्यवसाय प्रशिक्षण योजना
4. स्वयंरोजगारासाठी पतपुरवठा करणे

5. अनुसुचीत जमातीच्या लोकांच्या घरावरील छपरे बनविण्यासाठी कौल, पन्हाळी पत्रे पुरविणे.

**c. इतर योजना:**

1. आदिवासी विद्याथ्र्यांसाठी सेवा योजना नोंदणी करणे.
2. खावटी कर्ज योजना
3. आदिवासी क्षेत्रात काम करणाज्यांना आदिवासी सेवक पुरस्कार देणे.

## 12.4 आदिवासी उपयोजना:

1. आदिवासींचे जीवनमान उंचावणे
2. आदिवासींना समाजविकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे.
3. शेती व्यवसायाला पुरक उद्योगाची जोड देणे.
4. आदिवासींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे शिक्षण देणे.
5. सहकारी संस्थांचे जाळे पसरविणे
6. आदिवासी जमातींचा आर्थिक व सामाजीक विकास करणे.

## 12.5 अनुसुचित जाती जमातींसाठी संविधानातील तरतूद व कायदे:

लोकसभा आणि विधानसभेमध्ये अनुसुचित जाती-जमातींसाठी राखीव जागांची तरतुद, आदिवासींची स्थावर मालमत्ता विकत घेण्यास अथवा हस्तांतरीत करण्यास सवर्णांना केलेला प्रतिबंध, भेदभावापासून संरक्षण देणारी विविध कलमे, स्वतंत्र संघटना स्थापन करण्याचा तसेच मुक्त संचाराचा हक्क, उच्चशिक्षणासाठी आरक्षणाची व्यवस्था, शासकीय सेवेतील आरक्षण, वन्य जाती-जमातीच्या विकासासाठी स्वतंत्र मंत्रालयाची निर्मिती, दलीत आणि आदिवासींच्या कल्याणासाठी संचित निधीतून खर्च करण्याची

तरतूद अधिकृत मागास विभागातील प्रशासनावर मध्यवर्ती शासनाचे नियंत्रण, वन्य जाती-जमातीच्या कल्याणासाठी सल्लागार मंडळ स्थापन करण्याची घटनात्मक व्यवस्था अशा अनेक मार्गांनी दलित व आदिवासींचे मुलभूत मानवी अधिकार सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला होता.

सामाजिक न्यायाची वास्तवता: संविधानात्मक तरतूद राज्य व केंद्र शासनाद्वारा होणारा प्रयत्न, शासकीय आदेश, कायदेशीर तरतुदी, आरक्षणाची व्यवस्था व अनेक कल्याणकारी कार्यक्रम आणि अन्य मार्गांनी गेल्या 58 वर्षात प्रयत्न करुन देखील आजही त्यांच्याजवळ उपजिवीकेचे पुरेसे साधन नाही. परिणामी ते कुपोषणाचे बळी ठरत आहेत. साथीच्या रोगात बळी पडत आहे. कारण अतिदुर्गम भागात दवाखाना आहे तर डॉक्टर नाही अशी परिस्थिती आहे. त्याचबरोबर ठेकेदारांच्या व वनखात्यांच्या अधिकाऱ्यांचा सतत अन्याय सहन करावा लागतो. आजही अतिदुर्गम भागात रस्ते, पाणी, वीज पोहोचलेली नाही. त्यांची बोलीभाषा व मातृभाषा अलग आहे. त्यांच्या भाषेतून त्यांना शिक्षण मिळत नाही. त्यामुळे कोणत्या भाषेतून शिक्षण घ्यावे हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे ते अज्ञानी व अशिक्षित राहिले. मुस्लीम व किश्चन धर्मियांनी अतिदुर्गम भागात मोठ्या प्रमाणावर धर्मांतर घडवुन आणली. त्यामुळे त्यांच्यातील एकीची भावना कमी होवू लागली. परिणामी धर्मांतर ही एक समस्या बनू पहात आहे. त्यांना सामाजिक न्याय म्हणजे काय? अधिकार म्हणजे काय हे माहित नाही. त्यांना अधिकाराची जाणीव करुन दिली पाहिजे. झोपडीत रहाणाऱ्या शेवटच्या माणसापर्यंत विकासाची गंगोत्री गेली पाहिजे. तरच त्यांच्या जीवनात परीवर्तन येवू शकते. नाहीतर मानवी अधिकाराच्या कितीही वल्गना केल्या तरी त्या निष्क्रिय ठरणार आहेत.

गेल्या 58 वर्षात देशाचा औद्योगिक विकास, आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येत आहे. हे नाकारुन चालणार नाही. पण विकास

कोणाचा झाला? हा खरा प्रश्न आहे. अजुनही झोपडीतला माणूस झोपडीतच आहे. आजही विकासापासून तो वंचित आहे. आजही तो वेठबिगार आहे. आजही देशात बालमजुरीची समस्या गंभीर आहे. बालकांच्या आहार विषयक समस्या गंभीर आहेत. त्यामुळे ते कुपोषणाचे बळी ठरत आहेत. गरीबी व दारिद्रय यामुळे पुरेसे अन्न त्यांना मिळत नाही म्हणून केंद्र सरकारने 1993 पासून सकस आहार योजना लागू केली. त्यांना शाळेत येण्यासाठी दररोज एक रुपया भत्ता दिला जातो. एकवेळचे जेवण दिले जाते. परंतू योजना राबविणरे अधिकारी उदासिन आहेतच परंतू त्याहीपेक्षा पालक अधिक उदासिन आहेत.

जी परिस्थिती आदिवासींची तीच भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रियांची आहे. मारहाण करणे, जाळणे, अपहरण करणे, फुस लावून पळवून नेणे, बलात्कार करणे, लैंगिक छळ करणे यासारखे कृत्य रोज होतांना दिसत आहे. सामाजिक अत्याचारात स्त्रियांना संपूर्ण समुहाचे लक्ष केले जाते. उदा, आदिवासी व भटक्या जमातीत स्त्रीला व्यभिचार, चोरी वा जादू-टोणा, मंत्र व तंत्र, डाकीण इत्यादी प्रकारचे आक्षेप ठेवले जातात व जात पंचायत सामाजिक बहिष्कार किंवा त्या स्त्रीचे केस कापून गाढवावर धिंड काढली जाते. तसेच तिला मानवतेच्या हक्कापासून वंचित ठेवतात. बिहारमधील आदिवासी सस्थेने राजपूत व भूविहार या जातीची पाहणी केली असता या जातीत मुलगी जन्मली की 2 ते 4 दिवसात तिची हत्या करण्यात येते. दरवर्षी एकट्या बिहारमध्ये पंधरा लाख नवजात मुलींना मारण्यात येते असा अंदाज संस्थेने काढला आहे.

त्यासाठी समाजाचे प्रबोधन करण्यासाठी मानवी हक्क चळवळीची गरज निर्माण झाली आहे. निसर्गत:च सर्व मानवजात समान आहेत. श्रेष्ठ-कनिष्ठ, दलित-आदिवासी, स्त्री-पुरुष असा भेद न करता सर्व एकाच परमेश्वराची रुपे आहेत ही धार्मिक भावना सामाजिक न्यायाची द्योतक आहे. परंतू मानव समाज अधिकाधिक स्वावलंबी होत असतांना मानवी एकात्मतेपासून दूर

जातो आहे. त्यासाठी त्याला हक्काबरोबर कर्तव्याचीही जाणीव दिली पाहिजे. तरच सामाजिक न्यायाची अपेक्षा करता येईल. म्हणून त्याची सुरुवातच कुटुंबापासून झाली पाहिजे.

मानवी हक्काचे संवर्धन करीत असतांना दुसऱ्याच्या हक्काचे उल्लंघन केल्यास सामाजिक न्यायाची पुर्नस्थापना अशक्य आहे. उदा. विचारांच्या अभिव्यक्तीचा हक्क मान्य करुन सुध्दा दुसरा दुखावला जाणार नाही ना याची काळजी घेणे आवश्यक आहे.

विशिष्ट वर्गाचे हक्क संरक्षीत करीत असतांना मागासलेल्या लोकांच्या हक्कांची पायमल्ली होणार नाही याची दखल घेतली पाहिजे. कारण भावनिक समतेशिवाय सामाजिक व आर्थिक समानतेचे तत्व प्रत्यक्षात येणार नाही.

कायद्‌यापुढील समानता ही औपचारिक स्वरुपाची समानता प्रत्यक्षात साकार झाली पाहिजे. नाहीतर विषमतेने गांजलेले लोक ह्या घटनासमितीने परिश्रमातून उभे केलेले हे राजकीय लोकशाहीचे मंदीर उध्वस्त केल्याशिवाय रहाणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणून म्हणत आपल्या सर्वांगिण जीवनामध्ये खऱ्या अर्थाने समता व बंधुभाव निर्माण केल्याशिवाय सामाजिक न्याय प्रस्थापित होवू शकणार नाही. त्यासाठी सामाजिक न्याय व समता बरोबरीने चालली पाहिजे. त्यासाठी समाजातील बुध्दीवंतांनी, विचारवंतांनी जनचळवळीतून जनमताचे प्रबोधन केले पाहिजे. तरच मानवी अधिकाराची जाणिव तमाम शोषित, दलित, वन्य जनजातींना होवू शकेल.

*ISBN: 978-93-90847-09-9*

# प्रकरण 13
# भारतीय राज्यघटनेचा सरनामा एक विश्लेषणात्मक अभ्यास

## 13.1 प्रस्तावना:

देशाची राज्यघटना तयार करित असतांना त्या घटनेच्या उद्‌देशविषयी सुरुवातीस प्रस्तावना लिहीणे आवश्यक असते. त्यास अनुसरुन भारतीय राज्यघटनेच्या सुरुवातीस प्रस्तावना जोडलेली आहे. त्यास 'सरनामा' असे म्हटले जाते. या सरनाम्यामध्ये भारतीय राज्यघटनेच्या उद्‌देशाविषयी चर्चा करण्यात आलेली आहे. भारतीय घटनाकारांनी ज्या सामाजीक, राजकीय जीवन पध्दतीची स्वप्न रंगविली होती ती या उद्‌देश पत्रिकेच्या माध्यमातुन साकार झालेली आहेत.

भारतीय घटनाकारांनी सरनाम्यात अतिशय अचूक व परिणामकारक शब्दात घटनेच्या उद्‌दिष्टांची चर्चा केलेली आढळून येते.

भारतीय राज्यघटनेचा सार म्हणजे सरनामा आहे. भारतीय घटनाकारांना या आपल्या देशासाठी कोणत्या स्वरुपाची राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था अभिप्रत होती ते या सरनाम्यातून स्पष्ट होते. मनातील ईच्छा - आकाक्षांना शब्दरुप देण्याची संधी सरनाम्याच्या रुपाने घटनाकारांना लाभली.

आर्थिक व सामाजीक जीवन पध्दती कोणत्या तत्वावर अधिष्ठीत असावी याविषयी घटनाकारांच्या काही कल्पना होत्या. त्या त्यांनी सरनाम्यात उतरविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

## 13.2 शोधनिबंधाचा उद्‌देश:

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

संशोधन पध्दत :

प्रस्तुत लघुसंशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला असून त्यात प्रकाशीत, अप्रकाशीत ग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्र, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. संकलीत माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

## 13.3 शोधनिबंधांची उद्‌दिष्टे:

प्रस्तुत संशोधन लेखाच्या अभ्यासाकरिता पुढील उद्‌दिष्टांचा अभ्यास केला आहे.

1. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याची ओळख करुन घेणे.
2. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याची माहिती जाणून घेणे.
3. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याच्या उपयुक्ततेच्या बाबतीत महत्व सांगणे.
4. राज्यघटनेच्या सरनाम्याच्या उद्‌दिष्टांचे वर्णन करणे.

## 13.4 विषयाचे महत्व:

कायद्याने निर्माण केलेल्या अधिकाराची व्याप्ती वाढविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी सरनाम्याचा उपयोग करता येतो. देशातील न्यायालये कलमांचा अर्थ लावतांना सरनाम्याचा आधार घेत असतात. भारतीय न्यायपालीकेने आपल्या विविध न्यायालयीन विषयात सरनाम्याचे घटनात्मक महत्व मान्य केलेले आहे. घटना दुरुस्ती व न्यायदान करतांना सरनाम्याचा वापर केला जातो म्हणून सरनामा हि महत्वपुर्ण दस्ताऐवज मानला जातो.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात अनेक लहान मोठे प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. देशातील लोकांना विशिष्ट अशा मूल्यासाठी संघर्ष करावा लागला. हि मूल्य समाजाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी होती. त्याचा लाभ देशातील सर्व स्तरातील लोकांना होणार होता. यासाठी त्यांना आपण आदर्शरुप मानले. ती मूल्ये आपल्या कृतीत उतरवण्याचा संकल्प केला. या सर्वांचा अविष्कार म्हणजेच घटनेचा सरनामा होय. घटना समितीची स्थापना झाल्यानंतर तीने प्रथम हि घटना कशासाठी, तिची उद्दीष्टे कोणती असावीत याविषयीचा ठराव स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी दि. 22 जानेवारी 1947 रोजी मांडला. त्या ठरावातील अनेक भाग सरनाम्यात समाविष्ट झालेले आढळून येतात. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यासाठी घटनेची प्रास्ताविकता असा शब्दही वापरण्यात येतो. सरनामा पुढील प्रमाणे

- "आम्ही भारताचे लोक, भारताचे सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक गणराज्य निर्माण करण्याचे आणि भारतीय नागरिकांना,
- न्याय : सामाजिक, आर्थिक, राजकीय
- स्वातंत्र्य : विचार, उच्चार, श्रध्दा, धर्म उपासना
- समता : दर्जा, संधी याबाबतीत
- बंधुता : व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकात्मता राखणारी याची शाश्वती देण्याचे आमच्या या घटना समितीत आज नोव्हेंबर 1949 च्या 26 व्या दिवशी विचारपुर्वक ठरवित आहोत व ही राज्यघटना आमच्यासाठी तयार, मान्य, स्विकृत करीत आहोत.

"भारताची राज्यघटना भारताच्या लोकांनी स्वत:साठी केलेली आहे. भारताची राज्यघटना हि देशातील लोकांच्या ईच्छेनुसार व्हावी हि कल्पना महात्मा गांधींनी 1922 मध्ये प्रथम बोलुन दाखविली. राज्य प्रशासनाची चौकट

कशाप्रकारे असावी हे ठरविण्यासाठी ब्रिटीशांनी सायमन कमिशन नेमले होते. त्यासाठी इंग्लंडमध्ये संसदेने 1935 साली घटनात्मक कायदा केला होता. परंतु हे सर्व आपल्या चळवळीच्या मुलतत्वाला धरुन नव्हते. काँग्रेसने याचा पुनरुच्चार केला. अनेक प्रांतीक कायदेमंडळांनी व मध्यवर्ती कायदेमंडळाने त्यास दुजोरा दिला. या आग्रहास क्रिप्स योजनेस प्रथम इंग्रजांनी 1942 साली मान्यता दिली.

त्यासंबंधी तपशीलवार योजना कॅबीनेट मिशन अहवालात मांडण्यात आली. त्यानुसार 1946 मध्ये घटना समितीच्या सदस्यांची निवड प्रांतिक कायदे मंडळाकडून झाली. कोणतीही घटना स्विकारण्याची सक्ती आपण भारतावर करणार नाही. हे इंग्लंडच्या सरकारने 1946 साली स्पष्ट केले. त्यामुळे मुस्लीम लिगचे सदस्य नाराज झाले. त्यांनी घटना समितीच्या कामावर बहिष्कार टाकला. नंतर देशाची फाळणी करण्याचे ठरवले. तेव्हा घटना समितीचेही विभाजन झाले. भारताच्या वाट्याला आलेल्या भौगोलिक प्रदेशातून निवडून आलेल्या व त्यात सामिल झालेल्या संस्थानाच्या प्रतिनिधीची हि सभा झाली. अशा या घटना समितीने आपली घटना तयार केली.

संविधानाच्या सुरुवातीलाच प्रस्तावना म्हणून काही भाग आहे. त्यात भारताच्या राज्यघटनेत अंतर्भुत असलेली तत्वे आहेत. तो राज्यघटनेचा गाभा आहे. यालाच उद्‌देशपत्रीका असेही म्हणतात. त्यात "आम्ही भारतीय जनता" असा उल्लेख असलेला आढळून येतो. याचाच अर्थ लोकशाही हे मूल्य भारतीय संविधानात स्विकारले आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय यांचा उल्लेख संविधानाच्या प्रास्ताविकात आढळतो. व्यक्तीस्वातंत्र्याशिवाय व्यक्तीविकास नाही, दर्जा आणि संधीची समानता असल्याशिवाय व्यक्तीस्वातंत्र्य अर्थपुर्ण बनत नाही. समाजातील सामाजीक, आर्थिक व राजकीय विषमता नष्ट करणे

हे मुख्य उद्दिष्ट म्हणून प्रास्ताविकामध्ये नमूद करण्यात आले आहे. "सरनामा हा घटनेचा सार होय. घटनेचा आशयच उद्देशपत्रीकेत व्यक्त केलेला असतो. कायद्याच्या दृष्टीने सरनामा हा घटनेचा भाग नसतो. असे असले तरी देखील उद्देशपत्रिका घटनेचा आत्मा असतो. कारण त्यात जनतेच्या भावनांना मूर्त स्वरुप दिलेले असते. घटनाकारांच्या अंतकरणाचा ठराव उद्देश पत्रिकेत व्यक्त केलेला असतो.

## 13.5 सरनाम्याचे आधारभूत तत्वे:

**a. घटनेचे उगमस्थान भारतीय जनता:** "भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात असे म्हटले आहे की, आम्ही भारतीय जनता हि घटना मान्य करित आहोत व त्यासंबंधी कायदा करुन तिचा आम्ही स्विकार करित आहोत. हि घटना आम्ही भारतीय जनतेने केली आहे. असा त्यातून अर्थ अभिप्रेत होतो. याचाच अर्थ असा की, जरी घटना हि घटना समितीने तयार केली असली तरी त्या समितीस आमची मान्यता होती. शिवाय सुरुवातीलाच आम्ही भारतीय जनता असा उल्लेख करुन घटना समितीने घटना तयार करण्यासंबंधीचे अधिकार व सत्ता भारतीय जनतेकडून मिळाली आहे हे मान्य केले आहे.

उद्देशपत्रीकेत आम्ही भारतीय जनता हि घटना मान्य करित आहोत असा उल्लेख आहे. भारतीय जनतेने तयार करुन स्वेच्छेने स्विकारलेली आहे असा अर्थ निघतो. वास्तविक संविधान समिती प्रत्यक्ष भारतीय जनतेद्वारा निवडण्यात आलेली नव्हती. अप्रत्यक्ष मार्गाद्वारे सदस्यांची निवड करण्यात आली होती. संविधान समिती सदस्यांची निवडणूक घेतली असती तर मोठया प्रमाणात पैसा व वेळ लागला असता. भारतातील कोणत्याही राजकीय पक्षाने आणि जनतेने घटना रद्द करावी हि मागणी करण्यात आलेली नाही याचा अर्थ सर्व भारतीय जनतेस हि घटना मान्य आहे. 1952 च्या सार्वत्रिक लोकसभेच्या

निवडणूकीत भारतीय नागरीकांनी मतदानाचा हक्क बजावयाचा अर्थ त्यांना हि राज्यघटना मान्य आहे. कारण हा मतदानाचा हक्क त्यांना या संविधानाने प्राप्त करुन दिला आहे.

**b. सार्वभौम:** भारतीय उद्देशपत्रिकेच्या सुरुवातीस "आम्ही भारतीय जनता" असे म्हटले आहे. त्यात भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान सापडते. भारतीय लोकांनी भारतीय राज्यघटना मान्य करुन तिला कायद्याचे स्वरुप प्राप्त करुन दिले आहे. यातून तीन गोष्टी दिसून येतात. 1) भारतातील जनता सार्वभौम आहे. 2) घटना समितीचे सदस्य हे लोकप्रतिनिधी होते. 3) भारतीय राज्यघटनेस लोकांची मान्यता आहे. भारतीय लोक खऱ्या अर्थाने सार्वभौम आहेत. याचा अर्थ राज्याच्या सत्तेचे उगमस्थान भारतीय लोकांमध्ये सापडते. भारत हा देश अंतर्गत व बाह्यदृष्टीने सार्वभौम आहे. सर्वोच्च अंतिम सत्ता जेव्हा राज्यातच असते तेव्हा ते राष्ट्र सार्वभौम असते व दुसऱ्या कोणत्याही सत्तेस बांधलेले नसते. असे "घटनात्मक कायदा" या ग्रंथामध्ये कुरेसी पी.पी. यांनी म्हटले आहे.  देशाच्या अंतर्गत कारभारात आणि बाह्य व्यवहारामध्ये भारतीय गणराज्य हे इंग्लंड अमेरिका इतकेच स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र आहे. भारत ब्रिटीश राष्ट्रकुलातील सदस्य असला तरी त्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वाला बाधा येत नाही. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी असे म्हटलेहोते की, भारत ब्रिटीश सम्राटाला आता जबाबदार राहणार नाही. केवळ मित्रत्वाचे संबंध ठेवण्यासाठी भारताने राष्ट्रकुल परिषदेचे सदस्यत्व स्विकारले. यावरुन भारताचे सार्वभौमत्व अबाधित आहे हे स्पष्ट होते.

**c. प्रजासत्ताक:** शासन व्यवस्थेसंबंधी वापरण्यात आलेला 'प्रजासत्ताक' हा शब्द सुध्दा महत्वाचा आहे.

"ज्या शासनव्यवस्थेमध्ये किंवा राज्यव्यवस्थेमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सर्व वयस्क नागरीकांना कारभार चालविण्यात भाग घेता येतो अशा शासनव्यवस्थेला प्रजासत्ता शासन व्यवस्था म्हणता येईल. भारतामध्ये अप्रत्यक्ष पध्दतीने म्हणजे प्रतिनिधींच्या द्‌वारा प्रजा आपली सत्ता गाजवित असते. कारभार चालविणारे पदाधिकारी आणि कायदे करणारी सभागृहे प्रांतामार्फतच निवडली जातात. इतकेच नव्हे तर घटनेत दुरुस्ती करण्याचा हक्क सुध्दा प्रजेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनाच देण्यात आला आहे."5

प्रजासत्ताक म्हणजे शासन व्यवस्थेत जनतेचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग असतो. भारतातील राज्यकारभार हा जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींमार्फत चालत असतो. लोकप्रतिनिधी हे विशिष्ट काळासाठी लोकांमार्फत निवडले जातात. जनता आपली ईच्छा प्रतिनिधीमार्फत व्यक्त करित असतात. प्रौढमताधिकारानुसार प्रत्येक नागरीकास मतदानाचा हक्क देण्यात येतो.

**d. गणराज्य:** भारतीय घटनाकारांनी सरनाम्यातून प्रजासत्ताक गणराज्याची घोषणा केली आहे. गण म्हणजे राजा नसलेले राज्य होय. किंवा देशाचा सर्वोच्च प्रमुख जनतेने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मार्गाने विशिष्ट काळासाठी निवडून दिलेला असतो. त्या देशाला गणराज्य असे म्हणतात. 'गणराज्य' या शब्दापासून राष्ट्रप्रमुख हा लोकनियुक्त राहील असा अर्थ अभिप्रेत आहे. भारतात गणराज्य शासन पध्दतीचा वापर केला असून भारताचे राष्ट्रप्रमुख राष्ट्रपती अप्रत्यक्षपणे जनतेच्या प्रतिनिधीमार्फत निवडले जातात. भारताचा राष्ट्रप्रमुख राष्ट्रपती हा अनुवंशीक पध्दतीने आपले पद धारण करित नसतो म्हणून भारत हे गणराज्य आहे. इंग्लंडची शासन व्यवस्था लोकशाही स्वरुपाची आहे. परंतू तेथील राष्ट्रप्रमुख हा वंशपरंपरेने आपल्या पदावर येतो म्हणून इंग्लडमध्ये गणराज्य नाही.

**e. स्वातंत्र्य:** व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्यासाठी आवश्यक ती संधी मिळेल अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करणे म्हणजे स्वातंत्र्य हो. स्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्मा आहे. स्वातंत्र्य आणि समता परस्परांवर अवलंबून असतात. व्यक्तीच्या विकासासाठी स्वातंत्र्याची नितांत गरज असते. इतरांच्या स्वातंत्र्याला बाधा पोहचणार नाही अशा रितीने या स्वातंत्र्याचा उपयोग घेता येतो. प्रा. लॉस्की यांनी स्वातंत्र्याची व्याख्या करतांना म्हटले आहे. "स्वातंत्र्य याचा अर्थ मानवी समाजातील व्यक्तींना आपला संपुर्ण विकास होण्यासाठी संधी मिळण्यासाठी परिस्थिती निर्माण करणे होय."6 स्वातंत्र्य या शब्दाचे दोन अर्थ असू शकतात. व्यक्तीच्या वर्तणुकीवर गैरवाजवी बंधनाचा अभाव हा स्वातंत्र्याचा अभावसूचक अर्थ झाला. पण विधायक अर्थाने व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा पुर्ण विकास करण्यासाठी आवश्यक ती संधी मिळेल अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करणे म्हणजे स्वातंत्र्य असे म्हणता येईल. पण अयोग्य बंधनाचा अभाव आणि विकासाची योग्य व समान संधी या दोन्ही दृष्टींनीयुक्त असलेले स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य होय. उद्देश पत्रीकेत विचार, उच्चार, विश्वास, श्रध्दा आणि उपासना या क्षेत्रात अशा स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यात आला आहे. केवळ ईच्छा व्यक्त करुनच घटनाकार थांबले नाहीत तर त्यांनी घटनेत पुढीलप्रमाणे मुलभूत हक्कांची तरतूद केली आहे."

1. समतेचा हक्क (कलम 14 ते 18)

i) कायद्यासमोर समानता, ii) अस्पृश्यता निवारण iii) नोकरीच्या बाबतीत समान संधी, iv) अस्पृश्यता निवारण, v) पदव्यांची समाप्ती

2. स्वातंत्र्याचा हक्क: (कलम 19 ते 22)

i) भाषण व विचार स्वातंत्र्य, ii) शांततापुर्वक व नि:शस्त्र एकत्र येण्याचे स्वातंत्र्य, iii) संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, iv) भारताच्या क्षेत्रात मुक्त संचार स्वातंत्र्ये, iv) देशाच्या कोणत्याही भागात तात्पुरते वा कायम वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य

3. शोषणाविरुध्दचा हक्क (कलम 23 व 24)
4. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क कलम 25 ते 28
5. शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क कलम 29 व 30
6. घटनात्मक उपाययोजनेचा हक्क कलम 32

i) बंदीप्रत्यक्षीकरण, ii) परमादेश, iii) प्रतिषेध iv) उत्प्रेक्षण v) अधिकारपृच्छा इत्यादी प्रकारचे हक्क दिलेले आहेत या हक्कांचा संकोच झाला त्यावर आक्रमण झाल्यास न्यायालयात दाद मागता येते.

**f. समता:** मानवनिर्मित विषमता आणि भेदाभेद नष्ट करुन सर्वांना समान संधी मिळण्याची तरतूद करणे म्हणजे समता होय. धर्म, वंश, जात, भाषा, वर्ण, लिंग इत्यादी आधारावर कोणताही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान संधी व दर्जा उपलब्ध करुन देणे हा भारतीय घटनाकारांचा उद्‌देश होता. समता म्हणजे सर्वबाबतीत सारखेपणा असा अर्थ होत नाही. अशा सारखेपणामुळे मानवी जीवन साचेबंद होऊन विकासास अडथळा निर्माण होईल. विविधता नष्ट करणे असाही समतेचा अर्थ होत नाही. मानवी हक्काच्या सनदेत म्हटल्याप्रमाणे कायद्याच्या नजरेत सर्व समान असले पाहिजेत. उद्‌देशपत्रीकेने प्रत्येक व्यक्तीचा दर्जा समान राहील तसेच संधी देतांना सर्वांना समान वागणूक दिली जाईल असे आश्वासन दिले आहे. समान दर्जा प्रत्येकासाठी असणे हे समान तत्वात अभिप्रेत आहे. भारतीय घटनेने समता प्रस्थापित करण्यासाठी मानव निर्मित विषमता उदा. स्पृश्य-

अस्पृश्यता नष्ट केली आहे. भारतीय घटनेच्या 17 व्या कलमात असे स्पष्ट केले आहे. स्पृश्य-अस्पृश्यता घटनेने नष्ट केली. कोणत्याही स्वरुपात स्पृश्य-अस्पृश्यता घटनेने नष्ट केली. कोणत्याही स्वरुपात स्पृश्य अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे. त्याला कायद्यानुसार शिक्षा मिळेल. 1955 साली संसदेने त्यासंबंधी कायदा केला आणि अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा ठरविण्यात आला. अस्पृश्यता पाळणाऱ्या गुन्हेगारांसाठी कारावास आणि दंडाची तरतूद आहे. लोकशाहीशी विसंगत असणारी अस्पृश्यता नष्ट करुन एक मोठी अडचण दूर केली.

**g. न्याय:** न्याय हा भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे. न्याय याचा अर्थ व्यक्तीचा वर्तणुकीचा समाजहिताशी मेळ घालणे होय. घटनेच्या सरनाम्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेचा आत्मा असतो. समाजामध्ये न्याय प्रस्थापित केल्याशिवाय व्यक्तीचा सर्वांगिण विकास होणार नाही. भारतीय घटनेने सामाजिक न्याय प्रस्थापीत करण्यावर भर दिलेला आढळून येतो. न्यायाला आपण महत्वाचे मूल्य मानतो. यात सर्वच मानवी मूल्यांचा समावेश केलेला असतो. समाजाला उपयुक्त ठरेल अशादृष्टीने प्रत्येकाने आपले वर्तन केले पाहिजे. यासाठी घटनाकारांनी समाज हिताला प्राधान्य दिलेले आहे. या आधारावरच प्रत्येक व्यक्तीस सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात न्याय मिळावा या उद्देशाने उद्देशपत्रिकेत न्यायाचा समावेश करण्यात आला आहे.

अस्पृश्यता निवारण, मागास जाती-जमातींना सवलती इ. गोष्टी सामाजीक व आर्थिक न्यायासाठी आहेत. राजकीय न्यायासाठी सर्वांना प्रौढ मताधिकाराचा अधिकार दिलेला आहे.

**h. बंधुता:** उद्देशपत्रिकेत नमूद करण्यात आलेले नाव म्हणजे बंधुता होय. राष्टाचे ऐक्य व एकात्मता कायम राहुन व्यक्तीची प्रतिष्ठा जतन केली जाईल

अशा प्रकारची बंधुत्वाची भावना भारतीय नागरीकांमध्ये निर्माण करणे, ती वृध्दींगत करणे हे घटना तयार करतांना घटनाकारांचे उद्‌दिष्ट होते. भारतात पूर्वीपासून सामाजिक भेदाभेद, जातीयवाद, प्रांतवाद, धार्मिक वाद इ. समस्या आहेत. यामुळे राष्ट्राच्या एकता आणि अखंडतेस धोका पोहचतो. भेदभाव नष्ट करुन बंधुभाव निर्माण करणे आवश्यक आहे. म्हणून घटनाकारांनी स्त्री व पुरुषांना समान अधिकार देऊन समतेच्या आधारावर बंधुत्वाची उभारणी करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. न्याय, स्वातंत्र्य आणि समता यांच्या पायावर उभारलेल्या या नवीन राष्ट्राच्या सर्व नागरीकांना आपण एका आईची लेकरे आहोत असे वाटणे हाच बंधुत्वाचा अर्थ होय.

**i. समाजवाद:** भारत हे समाजवादावर विश्वास व्यक्त करणारे राष्ट्र आहे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात 'समाजवाद' हि संकल्पना अंतर्भूत करण्यात आली. भारतीय समाजाची आर्थिक प्रगती करण्यासाठी समाजवादी समाज रचना निर्माण करण्यासाठी या शब्दाची योजना करण्यात आली. समाजवादाला खाजगी मालमत्ता व भांडवलशाही व्यवस्था मान्य नाही. देशातील श्रमीकांचे शोषण थांबविण्यासाठी श्रीमंत व गरीब यांच्यातील दरी कमी करण्यासाठी भारताने समाजवादाचा स्विकार केला आहे  समाजवाद म्हणजे उत्पादन साधनांवर आणि वितरण व्यवस्थेवर समाज व राज्याची मालकी वा नियंत्रण होय. गेल्या 40 ते 45 वर्षांपासुन अनेक मार्गांनी अशा प्रकारची व्यवस्था प्रस्तापीत करण्याचे प्रयत्न झालेले आपणास दिसून येतात.

**j. धर्मनिरपेक्ष:** 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द टाकण्यात आला. कलम 25 ते 28 या कलमात भारतीय नागरीकांना धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला आहे. धर्मनिरपेक्ष म्हणजे राज्याचा अधिकृत असा कोणताही धर्म राहणार नाही.

कोणत्याही विशिष्ट धर्माला राज्य पाठींबा देणार नाही. सर्व धर्मांना समान मानले जाईल. धर्म हि एक वैयक्तिक बाब असून प्रत्येकाला आपल्या ईच्छेप्रमाणे कोणत्याही धर्माची पुजा अर्जा करता येईल. धर्म बदलता येईल, धर्माचा प्रचार-प्रसार करता येईल, याचा अर्थ कोणत्याही धर्माला भारताने राजाश्रय दिलेला नाही.

**k. राष्ट्रीय एकता आणि अखंडता:** 42 व्या घटना दुरुस्तीने या या शब्दाचा समावेश करण्यात आला आहे. देशामधील प्रांतवाद उफाळून येऊ नयेत व राष्ट्रीय एकात्मतेस तडा जाऊ नये म्हणून या तत्वाचा स्विकार करण्यात आला आहे.

लोकशाहीत प्रत्येकास प्रतिष्ठा दिली जाते. त्यामुळे व्यक्तीस स्वाभिमानाची भावना तयार होते. हि भावना राष्ट्रीय ऐक्यासाठी उपयुक्त मानली जाते. देशातील व्यक्तींचे आपल्या देशावर प्रेम असल्यास व्यक्ती कोणताही त्याग करण्यास तयार होत असते. देशाच्या संरक्षणासाठी सरनाम्यात राष्ट्रीय एकात्मतेचा समावेश करण्यात आला आहे. त्यासाठी कोणत्याही घटक राज्याला संघराज्यातून बाहेर पडता येत नाही. यासाठी केंद्र सरकारला जास्त अधिकार देण्यात आलेले आहेत. भारताची अखंडतेची जोपासना व्हावी व संघराज्य भक्कम व्हावे यासाठी हे करण्यात आले आहे.

## 13.6 मूल्यमापन:

संपूर्ण राज्यघटनेचा सार हा आपल्याला सरनाम्यात पाहवयास मिळतो. 150 वर्ष पारतंत्र्यात असलेल्या आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या सांस्कृतिक बाबतीत विविधता असलेल्या भारतात लोकशाहीचा प्रयोग यशस्वी झालेला आहे. स्वत:चे राजकीय भविष्य निश्चित करण्यासाठी राज्यघटना निर्माण केली. तसेच राज्याचे स्वरुप व उद्दिष्टे ठरविण्यासाठी अर्थपुर्ण

सरनामाही समाविष्ट करण्यात आला. सरनामा म्हणजे भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान व्यक्त करणारी एक 'राजकीय कुंडली' आहे असे श्री. के.एम. मुन्सी यांनी म्हटलेले आहे. राज्यघटना केव्हा स्विकृत व मान्य केली याचा उलगडा उद्देशपत्रीकेवरुन होतो म्हणून काही विचारवंतांनी उद्देश पत्रीकेस भारतीय राज्यघटनेचा आत्मा असे म्हटलेले आहे. काहींनी यास राज्यघटनेची गुरुकिल्ली असेही म्हटले आहे. काहींनी मौल्यवान रत्न असेही म्हटले आहे. यावरुन उद्देशपत्रीकेचे महत्व समजते.

राष्ट्राचे ऐक्य आणि एकात्मता टिकविण्यासाठी सर्वांमध्ये भ्रातृभाव निर्माण व्हावा हि आकांक्षा सरनाम्यातून व्यक्त होते. भारतातील विद्वान, श्रेष्ठ, मान्यवर आणि कायदेपंडीत यांनी तयार केलेला हा सरनामा संपुर्ण जगाच्या कौतुकाचा विषय झाला आहे. राज्यसंस्थेचे स्वरुप, राज्यसंस्थेने स्विकारलेली उद्दिष्टे, घटनेचे उगमस्थान इत्यादी गोष्टींचे ज्ञान हे घटनेच्या सरनाम्यातून व्यक्त होते. तसेच भारताने स्विकारलेली सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य पध्दती आणि न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता हि उद्दिष्टे यांचा समावेश सरनाम्यात केला आहे. त्यामुळे भारतीयांच्या जीवनाचा, देशाच्या विकासाचा ऐक्य आणि एकात्मतेचा आरसाच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. एकंदरीत भारतीय घटनेच्या उद्दिष्टांचा विचार करता उद्यदेशपत्रीकेला अतिशय महत्व प्राप्त झालेले आहे.

ISBN: 978-93-90847-09-9

# प्रकरण 14

# महिला सबलीकरण आणि कायदे

## 14.1 प्रस्तावना:

पुर्वीच्या काळात स्त्रीयांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते. त्यांना चार भितींच्या बाहेर जाऊ दिले जात नव्हते. तिच्यावर पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व होते. तसेच पुरुषांचे अर्धे अंग देखील म्हटले जाते. तिचा गैरवही केला जातो. पण परिस्थिती ही वेगळीच आहे. पुरुषांच्या वर्चस्वामुळे स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जात होते. स्त्री-पुरुष समानता नव्हती. स्त्रीयांची स्थिती भारतीय समाजात अतिशय हिन स्वरुपाची होती. तिला संपूर्ण बंधनात अडकून ठेवण्यात आले होते. अजूनही मुलीचा जन्म चिंताजनक मानला जातो. जन्म होण्याआधीच तिची हत्या केली जाते. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने सामाजीक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात दर्जा आणि संधीच्या दृष्टीने स्त्री पुरुषांमध्ये समानता प्रस्थापित केली आहे. धर्म, वंश, जात, भाषा, लिपी, संस्कृती, लिंग या आधारे भेदभाव करणे कायद्याने बंदी घालण्यात आली आहे. परंतू आजही स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदललेला दिसून येत नाही. आजही बलात्कार, यौन शोषण, बालविवाह, स्त्री-पुरुष यांच्या मजूरीमध्ये भेदभाव, वेश्यावृत्ती या समस्या समाजामध्ये अस्तित्वात आहेत. कुटूंबात स्त्रीयांना निर्णयप्रक्रियेत स्थान दिले जात नाही. पुरुषच निर्णय घेतात. महिलांचे सक्षमीकरण होण्यासाठी न्या. रानडे, राजाराममोहन रॉय, आगरकर यांनी फार मोठे मोलाचे योगदान केले आहे. तर राजर्षी शाहु महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरु केल्यात. महिला सक्षम व्हाव्यात हा त्यामागचा हेतु होता. महात्मा

फुले यांनी पुणे येथे 1948 मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. नंतरच्या काळात स्त्रीयांचा शिक्षणाचा प्रसार होत असलेला दिसतो. महात्मा ज्योतीराव फुले यांनी स्वत:च्या पत्नीला शिकविण्यासाठी शिक्षिका म्हणून नेमले. परंतू समाजातील समाजकंटकांनी त्यांना त्रास दिला. परंतू त्यांनी आपले कार्य सुरुच ठेवले.

नंतर त्यांनी 1851 मध्ये पुण्याच्या बुधवार पेठेत मुलींसाठी दुसरी शाळा सुरु केली. समाज परिवतनाचे कार्य करावयाचे असेल तर सर्वप्रथम स्त्रियांना शिक्षणाची दालने आधी खुली झाली पाहिजेत ते त्यांनी ओळखले होते.

बहुपत्नीत्व, बालविवाह, पुर्नविवाहास प्रतिबंध, केशवपन, जरठ विवाह यासारख्या स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरांवर त्यांनी कठोर शब्दात टिका केली होती. महिलांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी तिचे सबलीकरण होण्याची गरज आहे.

## 14.2 शोधनिबंधाचा उद्देश:

महिला सबलीकरण आणि कायदे याविषयी विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

## 14.3 संशोधन पध्दत:

प्रस्तुत लघुशोध संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यात प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथ, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादींचा उपयोग करण्यात आलेला आहे. संकलीत माहितीच्या आधारे लघुशोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

## 14.4 संशोधनाची उद्दिष्टे:

प्रस्तुत संशोधन लेखाच्या अभ्यासासाठी पुढील उद्‌दिष्टांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

1. पुर्वीच्या काळातील स्त्रीयांच्या स्थितीचा अभ्यास करणे.
1. स्त्रीयांच्या सामाजिक दर्जाचा अभ्यास करणे.
2. स्त्रीयांच्या शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
3. वर्तमान काळातील स्त्रियांचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय दर्जाचा अभ्यास करणे.

## 14.5 गृहितके:

1. आज महिला सर्वच क्षेत्रामध्ये प्रगतीपथावर आहेत.
1. शासनाने महिलांसाठी स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये 50% राखी जागा ठेवलेल्या आहेत.
2. स्त्रीया सामाजीक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती करित आहेत.
3. आज महिला सक्षमीकरण विविध क्षेत्रामध्ये दिसत आहे.

## 14.6 विषयाचे महत्व:

पुर्वी स्त्रीयांवर बंधने जास्त होती. कारण ती अशिक्षित होती. परंतू आज ती शिकल्यामुळे प्रगती करीत आहे. स्त्रीया ह्या स्वावलंबी होत आहेत. विविध क्षेत्रात त्या नैपुण्य मिळवित आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्टीकोनातून त्या सक्षम होण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे सर्व करित असतांना त्यांना कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. यासाठी स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोनात बदल पुरुषांनी केला पाहिजे. यासाठी आधी मानसिकतेत बदल होणे देखील गरजेचे आहे. महिलांचे सबलीकरण हे

भारताच्या दृष्टीने महत्वाची गोष्ट आहे. भारताची संस्कृती हि जगात सर्वश्रेष्ठ आपण म्हणतो यासाठी महिला सक्षम होणे हि एक गरजच म्हणावी लागेल.

## 14.7 महिला सबलीकरण म्हणजे काय?:

महिलांमधील मानसिक ताकद वाढविणे, त्यांना परिस्थितीवर मात करण्यासाठी सक्षम बनविणे हा महत्वाचा पैलु आहे. जिद्द, चिकाटी, धौर्य निर्माण करुन अन्यायास प्रभावीपणे विरोध करणे म्हणजे महिला सबलीकरण होय. महिलांना सर्वच क्षेत्रामध्ये स्वावलंबी बनविणे असा अर्थ सबलीकरणाचा घेतला जातो. समाजामध्ये महिलांवर मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार केला जातो. त्या अन्यायाची भरपाई करणे म्हणजे नैतिक अधिकार होय. नैसर्गिक अधिकार देणे हा सुध्दा सबलीकरणाचा एक भाग आहे. महिलांचे सबलीकरण समानतेच्या गोष्टींवर अवलंबून असते. स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित श्रमविभागणीत बदल झाला पाहिजे तरच महिलांमध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण होऊ शकेल. महिलांमध्ये विकासाविषयी जाणीव जागृती करणे हे तिच्या सबलीकरणाचे मुलतत्व समजले जाते. देशातील महिलांना पुरुषांच्या बरोबरीने विकास व प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करुन देणे यामुळे महिलांचे सबलीकरण होऊ शकते. महिलांना सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्क मिळवून देणे म्हणजे सबलीकरण होय. समाजातील वंचीत घटकांच्या विकासासाठी शासन कटीबध्द असते. देशाचा विकास आणि महिला सबलीकरण यांचा जवळचा संबंध आहे. म्हणून लोकशाहीमध्ये महिलांचे सबलीकरण होणे गरजेचे आहे. महिला सबलीकरणाची खरी सुरुवात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारातून रुजविण्याचा प्रयत्न झाला. त्यांच्या कार्यात अडथळे आणण्याचे

काम प्रस्थापितांनी केले. त्यांनी विधवा आणि अस्पृश्य महिला यांना शाळेत प्रवेश दिला होता. महिलांचे सबलीकरण झाले तर समाज खऱ्या अर्थाने सामथ्र्यशाली होऊ शकतो. त्यासाठी शिक्षण हा घटक महत्वाचा असतो. शिक्षणामुळे व्यक्तीवर चांगले संस्कार होतात व त्या संस्कारातून चांगल्या संस्कृतीचा उदय होतो आणि सुसंस्कारित नागरीक आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षासाठी योगदान देत असतात. आज देशात महिलांचे सबलीकरण होत आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या कामे करित आहेत. आज महिलांनी तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य, संरक्षण, प्रशासन यात गरुड झेप घेतलली आहे. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा मान इंदिरा गांधींना मिळाला तर प्रतिभाताई पाटील यांना देशाचे सर्वोच्च राष्ट्रपती पद मिळाले. कौशल्य वाढीसाठी किमान साक्षरता असावी लागते. महिलांची शैक्षणिक पात्रता, स्वच्छता, आरोग्य, मुलींचे शिक्षण, कुटूंबाचे कल्याण याचा परस्पर संबंध असतो हे आता सिध्द झाले आहे. 1988-1989 च्या जागतिक अहवालानुसार स्त्री शिक्षण हे आर्थिक विकासासाठी सहाय्यभुत ठरते. शिक्षणामुळेच महिलांमधील गुणांचा खऱ्या अर्थाने विकास होतो.

भारतीय सामाजीकशास्त्र परिषदेमार्फत (1969-79) शिक्षणाविषयी सांगण्यात आले होते की, शिक्षणाचे सर्वात महत्वपूर्ण उद्दिष्ट म्हणजे समाजाला आधुनिक बनविणे होय. थोर समाजसेविका दुर्गाबाई देशमुख यांच्या मते "एका मुलाचे शिक्षण म्हणजे एका व्यक्तीचे शिक्षण होय तर एका मुलीचे शिक्षण म्हणजे संपूर्ण कुटूंबाचे शिक्षण होय." महात्मा फुले यांचे स्पष्ट मत होते की, "कोणताही समाज जोपर्यंत खऱ्या अर्थाने साक्षर होत नाही तोपर्यंत त्या समाजातील महिला साक्षर होत नाहीत." कुटूंबात एक साक्षर महिला कुटूंबात जे संस्कार टाकू शकते ते काम हजार शिक्षक व गुरु करु शकत नाहीत.

महात्मा फुले म्हणतात, "विद्योविना मती गेली, मतीविना नीती गेली |

नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले |

वित्तविना शुद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले"

शिक्षणामुळे खरे परिवर्तन होत असते. शासनाने अनेक चांगले निर्णय महिलांच्या शिक्षणासाठी घेतले हे स्वागतार्ह आहे. तरीही ग्रामीण भागात मुलींचे गैरहजेरीचे प्रमाण सर्वात जास्त आहे असे दिसून येते. त्यास अनेक कौटुंबिक व सामाजिक कारणे असू शकतात. शिक्षणातील मुलींचे गळतीच्या प्रमाणाचा शोध घेणे आवश्यक आहे आणि त्यावर उपाययोजना तात्काळ राबविणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजातील लोकांचा, राजकीय धुरीणांचा, स्वयंसेवी संस्थांनी सहभाग घेतला पाहिजे. भारत हा नवदुर्गेची पुजा करणाऱ्या संस्कृतीतील महिला शक्तीचा देश आहे. प्रत्येक यशस्वी झालेल्या पुरुषामागे एका महिलेचा सहभाग व पाठबळ असते. समाजामध्ये अनेक महापुरुष हे महिलांच्या कतृत्वामुळे घडलेले आहेत. राजमाता जिजाबाई, अहिल्यादेवी होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, मदर तेरेसा, सरोजीनी नायडू, इंदिरा गांधी, पी.टी. उषा, कल्पना चावला, सुनिता विल्यम या महिलांनी भारताचा नावलौकीक वाढविला आहे. राजमाता जिजाऊ होत्या म्हणून छत्रपती शिवाजी महाराज घडले. 16 व्या वर्षी त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. निसर्गाकडून महिलांना काही देणग्या मिळाल्या आहेत. महिलांमध्ये सहनशिलता, बचत प्रवृत्ती, नाविन्यता, स्मरणशक्ती हे गुण जास्त आहेत. ती सृजनशील आहे कारण निसर्गाने निर्मितीचा अधिकार तिला दिलेला आहे. स्त्री मुळातच सबला आहे. भारतीय संविधानामध्ये स्त्री व पुरुष यांना समान हक्क दिले असले तरी भारताच्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे ती कुटूंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. पती, पिता, पुत्र यांच्या आदेशाने आणि बंधनाने ती आपले आयुष्य व्यतीत करीत आहे. नोकरदार व व्यवसाय

करणाऱ्या महिला देखील स्वत:ला सक्षम समजत नाहीत. त्यादृष्टीने महिला सबलीकरण फक्त कार्यक्रम आहे. तसे न करता वास्तवतेत महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करुन वैयक्तिक हक्क व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे होय. महिला ह्या देशाचे भवितव्य ठरविणारी महान शक्ती आहे. त्यामुळे हि शक्ती सुदृढ व सक्षम बनविणे हि समाजाची जबाबदारी आहे. आपल्या देशाची निम्मे लोकसंख्या हि महिलांची आहे. या लोकसंख्येसाठी शासनामार्फत महिला दिन, मातृत्व दिवस, बालीकादिन, जननी सुरक्षा अभियान यासारखे कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे समाजात स्त्री शक्तीचे महत्व व अधिकार जागृत करण्याचे काम केले जाते. पण यासोबत महिलांचे सबलीकरण करतांना सर्वप्रथम समाजात महिलांचे अधिकार व मूल्य यांच्यावर घात करणाऱ्या विघातक प्रवृत्ती म्हणजे स्त्री भ्रूणहत्या, लैंगिक अत्याचार, हुंडा प्रथा इत्यादींचा नाश करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे महिलांचे सबलीकरण करणे म्हणजे पुरुषांना हिणवणे किंवा त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ करणे असे नाही तर फक्त महिलांना त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म, क्षमता, परंपरा यांच्यासह समानतेने वागविणे होय.

महिला शक्तीच्या रुपात देशात असलेले मनुष्यबळ विकसीत करुन स्त्री शक्तीचे शिक्षण, संस्कार, आरोग्य व स्वावलंबन हे चार आधारस्तंभ समाजाने भक्कम केले तर महिलांचे सबलीकरण होण्यास सतत मदत होईल. देशास सक्षम व विकसीत करण्यासाठी व परिपूर्ण विकासाचे लक्ष पूर्ण करण्यासाठी महिला सबलीकरण महत्वाचे ठरेल. शासन महिलांच्या विकासासाठी कटीबध्द आहे. महिलांना सुरक्षित निकोप वातावरण उपलब्ध करुन देणे हे सर्वांचे कर्तव्य आहे.

पंचायतराज व्यवस्था महिलांच्या सबलीकरणासाठी महत्वाची व्यवस्था आहे. 73 व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायतराज संस्थामधील महिलांना सत्तेची दारे खुली झालेली आहेत. आणि जास्त प्रमाणात महिला राजकारणात पुढे

आल्यात आणि मुक्तपणे विविध क्षेत्रात भरारी घेत आहेत. महाराष्ट्र शासनाने पंचायतराज व्यवस्थेत 50% महिला आरक्षणाचा निर्णय घेतला आहे.

हि महिला सबलीकरणाच्या दृष्टीने महत्वाची गोष्ट आहे पंचायतराज व्यवस्थेत महिलांना संधी मिळाल्याने त्यांनी ग्रामपंचायत पासुन ते जिल्हा परिषद पर्यंत आजपर्यंतची कामगिरी कौतुकास्पद आहे. अजूनही महिला खऱ्या अर्थाने सक्षम व्हावयाच्या असतील तर त्यांना राज्यांची विधिमंडळे, लोकसभा व राज्यसभेत 33% जागांचे आरक्षण दिले पाहिजे. महिलांचे सशक्तीकरण करणे हि काळाची गरज आहे. त्यांना समाजामये अनेक संकटांना सामोरे जावे लागते.

## 14.8 भारतात महिला सक्षमीकरणाची गरज का भासत आहेत त्याची काही कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील:

1. स्त्रीयांना आजही दुय्यम स्वरुपाची वागणूक दिली जाते.
2. समाजामध्ये स्त्री-भ्रुण हत्या होतांना दिसून येत आहे.
3. स्त्रियांचे लैंगिक शोषण होत आहे.
4. अनैतीक व्यापार वाढत आहे.
5. महिलांना पिता व पती यांच्या मालमत्तेतील वाटा नाकारला जातो.
6. समाजात आजही हिंसक घटना घडत आहेत.
7. ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण फारच अल्प आहे.
8. महिला भीतीमय वातावरणात जीवन जगतांना दिसत आहेत.
9. खावटी प्रकरणांची संख्या न्यायालयात वाढत आहे.
10. देशात बलात्कारासारख्या घटना दिवसेंदिवस वाढतच आहेत.

11. हुंडा प्रथा आजही समाजात अस्तित्वात असून पैसे, सोने, इतर वस्तु वधुपित्याकडून घेतली जातात.

वरील परिस्थिती थांबवावी यासाठी देशात आणि राज्यामध्ये सतत प्रयत्न केले जात आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रागतीक राज्याने विविध उपक्रम धोरणे राबवून निर्णय घेऊन महिलांचा सन्मान वाढावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी सतत प्रयत्न करुन देशासमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये महिला आपल्या कार्याचा ठसा उमटवित आहेत. त्यांना संधी मिळाली की त्याचे त्या सोन करतात हे सातत्याने सिध्द झाले आहे. पण असे असूनही समाजामध्ये महिलांना पाहिजे तेवढा सन्मान दिला जात नाही. देशाची निम्मे लोकसंख्या महिलांची आहे असे असूनही त्यांना पुरुषांएवढ्या संधी मिळत नाही. असुरक्षितता त्यांना नेहमीची जाणवत आहे. जीवनव्यवहारात महिला मुख्य आधार असूनही त्यांना दुय्यम भूमिका दिली जाते.

महिलांवर होणारा अन्याय, अत्याचार त्यांना देण्यात येणारी असमान वागणूक, त्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने अनेक कायदे केलेले आहेत. परंतू कायदे करुन हा बदल होत नसतो. त्यासाठी मानसिकतेत बदल करणे गरजेचे आहे. म्हणून समाजाचा जास्तीत जास्त सहभाग असला पाहिजे. महिला सक्षम करण्यासाठी समाजव्यवस्थेतील सर्व घटकांनी पुढाकार घेतला पाहिजे. विकास योजनेत महिलांचा सहभाग आणि त्यांचे योगदान लाभल्याशिवाय सर्वांगिण आणि सर्वसमावेशक विकास होऊच शकत नाही. पुर्वीच्या काळात समाजात सतीप्रथा होती. त्यावेळेस ती प्रथा बंद होण्यासाठी ब्रिटीश सरकारने कायदे केलेत. राजा राममोहन रॉय यांनी पुढाकार घेऊन प्रबोधनाचे कार्य केले तेव्हा ती प्रथा बंद झाली. महिलांचे प्रश्न एवढ्यापुरते संपले नाहीत. हुंडा पध्दत आणि इतर कारणांमुळे स्त्रीभ्रुण हत्या करण्याचे प्रमाण मध्यंतरीच्या काळात

वाढले होते. पण सरकारने कडक कायदे केल्याने व समाजातील लोकांनी या कामी चळवळ उभारल्यामुळे स्त्रीभ्रुणहत्येसारख्या कुप्रथेला आपण पायबंद घालु शकलो. पण मुलींना जोपर्यंत आपण समजत नाही तोपर्यंत हा प्रश्न मुळासकट संपणे शक्य नाही. शासनाने विविध कायदे करण्याबरोबर बेटी बचाओ - बेटी पढाओ, माझी कन्या भाग्यश्री यासारख्या विविध योजना हाती घेतल्या आहेत. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त मुलींना घेता यावा यासाठी या योजनेमध्ये काही बदल करण्यात आले आहेत. त्या बदलानंतर हि योजना अधिक गतीमान होऊ शकेल. मुलीच्या जन्मासाठी पालकांना प्रोत्साहन देणे, तिच्या जन्माचे स्वागत करणे, तिला सकस आहार मिळवून देणे व तिच्या शिक्षणासाठी सहाय्य करणे यासारख्या अनेक बाबी या योजनेत अंतर्भूत आहेत. त्यामुळे राज्यात लिंग गुणोत्तर प्रमाण समान होण्यास सहाय्य होईल. तसेच मुलींना सक्षम करण्याच्या दृष्टीने हि योजना महत्वाची ठरेल यात शंका नाही. तसेच पालकांनी पुढाकार घेऊन मुलगा-मुलगी असा भेदभाव दूर केला पाहिजे. त्याचबरोबर शिक्षणामध्ये मुलीला मुलांसारखीच समान संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. कारण मुलगी शिकली तर ती संपूर्ण कुटूंबाला शिक्षित करु शकते हि बाब लक्षात घेतली पाहिजे. महिला सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाने बचतगटाची चळवळ हाती घेतली आहे. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत. महिला बचत गटांच्या लघुउद्योगासाठी कर्जे उपलब्ध करुन दिली जात आहेत. महिला आपल्या कुटूंबाला आर्थिक आधार देत आहेत. तसेच देशाच्या आर्थिक विकासात महत्वाचे योगदान देत आहेत.

पीडीत महिलांना निवास उपलब्ध करुन देणे त्यांचे पुनर्वसन करण्याच्या उद्‌देशाने अनेक क्षेत्रात योजना राबविल्या जात आहेत. महिला आधारगृहे, संरक्षणगृहे, उज्वला योजना, अल्पमुदती निवासगृहे, स्वाधार योजना यांच्या

माध्यमातून पीडीत महिलांच्या पुनर्वसनावर तसेच समुपदेशनावर भर देण्यात येत आहे. मनोधैर्य योजनेमार्फत बलात्कार पीडित ॲसिड हल्ल्यात जखमी असलेल्या महिलांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. महिलांवर होणारा अत्याचार हा निषेधार्हच असतो. पण अशा अत्याचारांना बळी पडलेल्या महिलांना मदत देण्याचा तसेच त्यांचे समुपदेशन पुनर्वसन करण्याचा प्रयत्न या योजनेमधून केला जातो. या योजना बरोबरच महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी समाजातील विविध घटकांनी पुढे येणे गरजेचे आहे.

महिला सक्षम व्हाव्यात यासाठी शासनाने अनेक योजना कार्यान्वीत केलेल्या आहेत. या योजनांचा लाभ घेऊन शालेय विद्यार्थीनी, तरुणी, नोकरी करणाऱ्या महिला, वयोवृध्द महिला, गृहिणी आदिंना स्वावलंबी व आत्मविश्वासाने जीवन जगण्याची उर्मी मिळत आहे. शासनाच्या योजना 1) मनोधैर्य योजना, 2) महिलांसाठी वसतीगृहे, 3) निर्वाह अनुदान योजना, 4) व्यक्तिगत सहाय्य, 5) स्वाधार योजना, 6) राज्यगृह योजना, 7) मातृत्व सहयोग योजना.

महिलांचा सामाजिक सन्मान आणि समानतेसाठी जनजागृतीपासून ते महिलांच्या समस्यांवर सुनावणी घेऊन न्याय करण्यापर्यंत काम करण्यासाठी शासनाने महिला आयोगाची स्थापना केली आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून महिलांना त्यांच्या तक्रारी घेऊन महिला आयोगाकडे मुंबईला येणे शक्य नाही हे लक्षात घेऊन महिला आयोग राज्यभर जाईल असा निर्णय या आयोगाने घेतला हि एक अभिमानाची गोष्ट आहे. "महिला आयोग तुमच्या दारी" अशी घोषणा करत या आयोगाने काही प्रमुख शहरात जाऊन जनसुनावण्या केल्यात. त्या त्या भागातील प्रलंबित प्रकरणांचा निपटाराही केला. महाराष्ट्रातील महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोगाचे इतर सदस्य कार्य करीत आहेत. या आयोगामार्फत विविध विषयांवर कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत असून कौटुंबिक

हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण व कायद्यातील तरतूदींबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम 14 नुसार कायद्यापुढे सर्व समान आहेत. कलम 15 नुसार धर्म, जात, लिंग भेद करता येत नाही तर कलम 16 नुसार सर्वांना विकासाच्या समान संधी मिळतात. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्व कलम 38, 39, 39 (अ) आणि 42 नुसार समाजात असलेली विषमता दूर करुन जनतेच्या कल्याणासाठी न्यायव्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी हक्कांची सनद निर्माण झाली. महिलांसाठी विविध कायदे करण्यात आले. कायदा हा महिला सबलीकरणाच्या मार्गातील सर्वात महत्वाचा आधारस्तंभ ठरला आहे. कायद्याच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा, सामाजिक परिवर्तन यांना वेग आणता येतो. म्हणून भारतात कायद्याद्वारे महिला सबलीकरण साधण्यासाठी पुढीलप्रमाणे कायदे महत्वाचे आहेत. 1) सवतीबंदी कायदा, 2) मजूरी दर अधिनियम, 3) वारसा हक्क अधिनियम, 4) हिंदू विवाह कायदा, 5) नोंदणी विवाह कायदा, 6) विशेष विवाह कायदा, 7) बालविवाह प्रतिबंधक कायदा, 8) दत्तक घेण्याचा हक्क, 9) वेश्या व्यवसाय विरोधी कायदा, 10) द्विभार्या प्रतिबंधक कायदा, 11) हुंडा प्रतिबंधक कायदा, 12) मातृत्व लाभ कायदा, 13) पोटगी कायदा, 14) घटस्फोटाचा कायदा, 15) गर्भजल चिकित्सा विरोध कायदा, 16 अनैतीक व्यापार कायदा, 17) समान वेतन कायदा, 18) बलात्कार विरोधी कायदा, 19) राष्ट्रीय महिला आयोग कायदा, 20) कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा इत्यादी विविध कायद्यांच्या माध्यमातून महिलांना विशेष हक्क प्राप्त झालेले आहेत.

महिला सक्षमीकरणासाठी आपल्या समाजात सध्या अस्तित्वात असलेल्या पितृसत्ताक विचारसरणीत बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी नैसर्गिक,

मानवी, बौध्दिक, आर्थिक अंतर्गत साधनसंपत्तीवरील नियंत्रण महिलांकडे येणे आवश्यक आहे. त्यांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सामावून घेतले पाहिजे. महिला सक्षमीकरणची अनेक महत्वाची क्षेत्रे आहेत. ज्यांच्याकडे यापूर्वी पाहिजे तेवढे लक्ष दिले गेले नाही त्यांच्यावर आता भर देणे आवश्यक आहे. या क्षेत्राकडे अतिशय काळजीपूर्वक लक्ष देऊन त्यांच्याबाबत प्रभावी धोरण आखण्याची गरज आहे. समाजामध्ये महिलांचे स्थान कमी असल्याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे मालमत्ता आणि इतर उत्पादक साधनांबाबत त्यांना अधिकार नाहीत. स्वामी विवेकानंदांनी म्हटले होते "महिलांची स्थिती सुधारल्याशिवाय जगाचे कल्याण घडणार नाही, केवळ एका पंख्याच्या आधारे भरारी घेणे कोणत्याही पक्षाला शक्य नाही."

## 14.9 निष्कर्ष:

महिलांच्या सबलीकरणासाठी शासनाकडून अनेक उपाययोजना केल्या जात असून त्यात पुरुषी वर्चस्वाची मानसिकता बदलली जात आहे. महिलांना सर्वच क्षेत्रात संधी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच त्यांच्या विरोधातील हिंसाचार रोखण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी नविन राष्ट्रीय महिला धोरण तयार केले जात आहे. त्यात शिक्षण, आरोग्य, प्रशासन, अर्थव्यवस्था, निर्णयक्षमता, हिंसाचार प्रतिबंध, पायाभूत सुविधा, सामाजिक सुरक्षा, क्रिडा, मदत सुविधा यावर भर देण्यात येत आहे. महिलांसाठी सायबर क्षेत्र सुरक्षित करण्यात येत आहे. वेतनात भेदभाव दूर केला जात आहे. घटनात्मक तरतुदीनुसार कायदे महिलांसाठी अनुरुप केले जात असून त्यात त्यांना न्याय दिला जात आहे.

*ISBN: 978-93-90847-09-9*

# प्रकरण 15

# स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण

## 15.1 प्रस्तावना:

लोकशाहीच्या मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करुन समान आर्थिक व सामाजिक विकासासाठी "अल्पबचत नियोजन" या तत्वाचा स्विकार करणे गरजेचे आहे आणि तसे प्रयत्न करणे हे महत्वाचे आहे. भारतीय ग्रामीण भाग हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा व पाया असून स्वयं-सहाय्यता बचत गटाचे महत्व वाढत चाललेले दिसून येते. त्यादृष्टीने शासन देखील पाऊले उचलत आहेत. बचतगटाच्या माध्यमातुन महिलांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी व अंमलबजावणीसाठी शास्त्रीय दृष्टीकोनाद्वारे अभ्यास होणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्याचे निर्मुलन करुन आणि महिलांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक याबाबत सबलीकरण करणे हि मुलभूत स्वरुपाची उद्दिष्टे स्वयंसहाय्यता बचत गटाची आहेत. या उद्दिष्टांपैकी दारिद्र्याचेनिर्मुल करणे हे फार मोठे आव्हान बचतगटासमोर आहे. परंतू तरीही त्यावर बचतगट मात करीत असतांना दिसत आहेत. दारिद्र्याचेनिर्मुलन केल्यावरच खऱ्या अर्थानेच समाजाची प्रगती होईल.

आज जगातील बहुतेक देशांमध्ये दारिद्र्याचेप्रमाण कमी जास्त स्वरुपाचे आढळून येते. भारताची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येपैकी 14% असून या लोकसंख्येपैकी 37.6% लोकसंख्या दारिद्र्यात हालअपेष्टा सहन करुन आपले जीवन जगत आहेत. यासाठी समाजातील गरीब लोकांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती सुधारणे आवश्यक आहे. समाजात दारिद्र्य मोठ्या प्रमाणात असेल

तर अंधश्रध्दा, निरक्षर, अज्ञानी, दैववादी, व्यसनाधीन लोकांची संख्या जास्त असते. पर्यायाने समाजात शांतता नांदू शकत नाही. या सर्व गोष्टीतून मुक्तता करायची असेल तर स्वयं-सहाय्यता बचत गटाचा मार्ग अतिशय सुकर स्वरुपाचा आहे. म्हणून अर्थतज्ञ डॉ. महमंद युनुस म्हणतात की, दारिद्र्याच्या दृष्टचक्रावर उत्तम उपाय म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट आहे. स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या माध्यमातून महिला आपल्या गावाच्या विकासात सहभागी होऊ शकतात. महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्था असल्याने महिलांच्या 2 ग्रामसभा राज्य सरकारच्या नियमानुसार आवश्यक आहेत. त्यामुळे जर अल्पबचत गटाच्या 11 ते 20 महिला जर ग्रामसभेत गेल्या तर ग्रामपंचायतीच्या येणाऱ्या योजना गाव विकासात योग्य योगदान देऊ शकतात. एक महिला बचतगटाच्या माध्यमाद्वारे संपूर्ण गावास पुढे नेई हे तत्व लागु होते. तसेच शिक्षणाचा स्तर प्रौढ शिक्षणाच्या माध्यमातुन महिला स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या सहाय्याने सुरु करु शकतात आणि त्यातुन खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होईल.

## 15.2 विषयाची ओळख:

देशाची अर्थव्यवस्था अविकसीत, विकसनशील आणि विकसीत अशा कोणत्याही स्वरुपाची असली तरी प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेचे उद्‌दिष्ट आर्थिक स्वरुपाचा मोठ्या प्रमाणात विकास करणे हे असते. विकास हि प्रक्रिया दिर्घकालीन चालणारी असते. समाज जीवनात घडणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक घडामोडींवर विकास हा खऱ्या अर्थाने अवलंबून असतो. भारत हा शेतीप्रधान देश असून ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय राष्ट्राचा विकास होऊच शकत नाही. यामुळे ग्रामीण विकास हि आर्थिक विकासाची पूर्वअट होय. ग्रामीण भागाच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद) चा वाटा फार

महत्वपूर्ण आहे. तसेच ग्रामीण विकासातील सुवर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या माध्यमातून महिलांचा विकास होतो.

## 15.3 विषयाचे महत्वः

ग्रामीण भागात स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाच्या माध्यमातून समाजातील असहाय्य, दुर्बल, दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या लोकांमध्ये क्रांतीकारक स्वरुपाचा बदल होतांना आढळून येत आहे. हजारो वर्षांपासून पुरुषांच्या मानसिक संस्कृतीमध्ये अडकलेली स्त्री आता हळूहळू स्वयंपूर्णरित्या आर्थिक विकासावर स्वावलंबनाने चाललेली आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत आहे. आज महिला अल्पबचत गटाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टीकोनातुन सक्षम होण्याचा निर्धार करीत आहेत. ग्रामीण भागात अल्पबचत गटांच्या माध्यमातून जी क्रांती घडून आलेली आहे ती उल्लेखनीय आहे. तसेच वाढत चाललेली आर्थिक उलाढाल, लघुउद्योगांना मिळणारी चालना, त्यातून ग्रामीण भागात महिलांच्या हाती आलेले आर्थिक नियंत्रण त्या आधारावर त्यांच्यात झालेले सामाजिक, आर्थिक, राजकीय सबलीकरण व जनजागरण हे ग्रामीण भागाच्या विकासास गती देण्याचे महत्वपूर्ण कारण ठरलेले आहे.

## 15.4 संशोधन पध्दती:

प्रस्तुत लघुशोध निबंधासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यात प्रकाशित, अप्रकाशीत ग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके, दै. वृत्तपत्रे,

इंटरनेट यांचा वापर करण्यात आला आहे. संकलीत माहितीच्या आधारे शोधनिबंधाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

## 15.5 अध्ययन उद्देश:

स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण - एक विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

## 15.6 लघुशोध निबंधाची उद्दिष्टे:

1. महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट तयार करुन त्यांना संघटित करणे.
2. महिलांना आर्थिकदृष्टा सक्षम करुन त्यांच्या श्रमाला आर्थिक प्रतिष्ठा मिळवून देणे.
3. महिला बचत गटांना संघटीत करुन त्यांना योग्य ते प्रशिक्षण देणे आणि त्यांच्या वस्तुंसाठी बाजारपेठ मिळवून देणे.
4. महिला अल्पबचत गटांची चळवळ हि फक्त महिलांच्या आर्थिक उन्नतीची चळवळ न राहता तिला सामाजिक प्रतिष्ठेची चळवळ बनविणे.
5. नवनवीन उद्योगधंदे सुरु करण्याची प्रेरणा महिलांमध्ये निर्माण करणे.

## 15.7 संशोधनाची गृहितके:

1. स्वयंसहाय्यता बचतगट योजनेमुळे महिला स्वावलंबी बनतात.
2. आर्थिक सक्षमतेमुळे महिलांचे सबलीकरण घडून येते.
3. महिला सबलीकरणातून राजकीय सहभाग वाढतो.
4. स्वयंसहाय्यता अल्पबचत चळवळीतुन विधायक नेतृत्व जन्मास येते.

5. स्वयंसहाय्यता अल्पबचत गटांमुळे ग्रामीण भागातील खेडी सावकारमुक्त होण्यास मदत होईल.
6. जनसहभागातून वाढणारे नेतृत्व हे लोकशाहीस पूरक ठरते.
7. स्वयंसहाय्यता अल्पबचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना आर्थिक विकासाच्या संधी प्राप्त होण्यास मदत होईल.

1951 पासुन भारतात नियोजनबध्द सामाजिक आर्थिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. पंचवार्षिक योजनेच्या काळात दारिद्रयनिर्मुलन योजना राबवून रोजगार निर्मितीवर भर दिला आहे. यापूर्वी गरीबी निर्मुलनासाठी तसेच महिला सबलीकरणासाठी अनेक योजना राबविल्या गेल्या. परंतू मूल्यमापन पातळीवर निराशा झाली. सर्व योजनांचे एकत्रीकरण करुन 1 एप्रिल 1999 पासून सुवर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेतंर्गत स्वयं-सहाय्यता बचतगटांना प्रोत्साहन देण्यास सुरुवात झाली. त्याद्वारे ग्रामीण भागातील गरजू व दारिद्रयरेषेखालील लोकांना कर्ज व अनुदान योजना राबविली. दारिद्र¶ निर्मुलनाचे उत्तम कार्यक्रम म्हणून स्वयंसहाय्यता बचतगटांकडे लोक पाहु लागले.

स्वयंसहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना सबलीकरणासाठी मोठी गती मिळालेली आहे. त्यातूनच महिलांचे मोठे प्रमाणात संघटन होत आहे. स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमातून महिला केवळ संघटीत होत नाहीत तर स्वत:च्या कष्टातून काही बचत करतात व त्यातून एकमेकांना अडीअडचणीस आर्थिक मदत करतात. आज स्वयंसहाय्यता अल्पबचत गटांच्या माध्यमातून 7.67 लाख महिलांचे संघटन तयार केलेले आहे. सदर महिलांची एकूण बचत 168.40 कोटी असून अंतर्गत कर्जाची रक्कम 475.29 कोटी इतकी असुन एकूण महिलांपैकी 17 हजार 732 महिला शेतीवर आधारीत व बिगर शेतीवर आधारीत उद्योगांमध्ये सामील

झालेल्या आहेत. अल्पबचत गट निर्मितीमुळे महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी आशेचा किरण दिसु लागला आहे. सामाजिक व आर्थिकदृष्टा कमकुवत महिलांना स्वतंत्र, स्वयंपूर्ण बनविणे, त्यांना समाजिक न्याय मिळवून देण्यासाठी महिला बचत गटाने मोलाचे सहकार्य केले आहे. राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील गरीब महिलांना, अल्पबचत गटांना सवलतीच्या व्याजदराने कर्जपुरवठा उपलब्ध होऊ लागला आहे. अल्पबचत गटांमध्ये सहभागी झालेल्या महिला आर्थिकदृष्टा सक्षम झाल्यामुळे त्या राजकारणामध्येही सक्रीय होत आहेत.

## 15.8 स्वयंसहाय्यता अल्पबचत गटासमोरील अडचणी:

1. अल्पबचत गटातील महिलांना उद्योगव्यवसायाविषयीचे ज्ञान नसते.
2. स्वयंसहाय्यता अल्पबचत गटातील महिलांना उद्योग व्यवसायाबद्दलचे योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळत नाही.
3. स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाजवळ अत्याधुनिक यंत्र वापरण्यासाठी आवश्यक असलेले भांडवल नसलयाने वस्तुंचा पुरवठा करु शकत नाही.
4. स्वयंसहाय्यता अल्पबचत गटांना मार्गदर्शक तत्वानुसार कार्य करावे लागते. हिशेब ठेवावे लागतात. योजनांचा अभ्यास करुन त्यांची कार्यवाही करावी लागते. परंतु गटातील महिला सदस्या साक्षर नसल्याने त्यांचे अनेक प्रश्न निर्माण होतात.

## 15.9 मूल्यमापन:

स्वयंसहाय्यता अल्पबचत गटांमुळे महिलांचे आर्थिक दारिद्र्य दूर झाले आहे. तसेच त्यांच्या आयुष्यात क्रांतीकारक बदल घडून आला आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात महिलांनी नेत्रदिपक कामगिरी केली आहे. निरक्षरता, दारिद्र्य, व्यसनाधीनता, सामाजिक अन्याय, अत्याचार या विळख्यात खितपत

पडलेल्या असहाय्य, अबला यांच्या जीवनात स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाने नवीन पहाट उगवली आहे. महिलांमध्ये आत्मविश्वास वाढून समाजात त्यांना प्रतिष्ठा मिळत आहे. महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासाबरोबर समाजाच्या व देशाच्या विकासात हातभार लागत आहे. स्वयंसहाय्यता अल्पबचत गटामुळे भारताचे महासत्ताधारक होण्याचे स्वप्न पुर्ण होऊ शकेल. महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50% आरक्षण दिल्याने ग्रामीण भागामध्ये महिलांचे नेतृत्व विकसीत होणार असुन त्यामुळे महिला सक्षमीकरणाचे अनेक प्रयत्न महिलांकडून होण्यास मदत होईल.

## 15.10 संदर्भ सूची:

1. डोळे ना.य. - प्रमुख भारतीय राजकीय विचारवंत
   विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
2. व्होरा, पळशीकर - राज्यशास्त्र कोश
   दास्ताने रामचंद आणि कंपनी, पुणे
3. गयकवाड जयदेव- संविधान सभेत डॉ. आंबेडकर
   पद्यगंगा प्रकाशन, पुणे
4. पटेल शारदा डी - भारतीय संविधान : एक आयाम
   सार्थ पब्लिकेशन, आनंद
5. भोळे भा.ल. - भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण
   पिंपळापुरे अँड कंपनी, नागपूर
6. कुलकर्णी प्र.रा. - भारतीय अर्थव्यवस्था
   विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद

7. प्रा. चव्हाण एन.एल- भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास (भाग - 2)
प्रशांत पब्लीकेशन्स, पुणे
8. भोसले, काटे - भारतीय अर्थव्यवस्था
फडके प्रकाशन, कोल्हापुर
9. कृषी पुरवणी - जागतिकीकरणाचे शेतीवरील अनिष्ट परिणाम
दै. देशदूत दि. 02/01/2001
10. संपादकीय अग्रलेख- जागतिकीकरणाच्या व्यथा
दै. लोकमत पेपर दि. 04/12/2010
11. प्रा. राऊत गणेश - महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास
डायमंड पब्लीकेशन, पुणे
12. गायकवाड जयदेव- संविधान सभेत डॉ. आंबेडकर
पद्यगंधा प्रकाशन, पुणे
13. डॉ. पाटील वा.भा. - भारतीय राज्यघटना
प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव
14. कुलकर्णी स्वाती - मानवी हक्कातील मुलभूत संकल्पना
प्रकाशक डॉ. प्रकाश अतकारे यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
15. कसबे रावसाहेब - डॉ. आंबेडकर आणि राज्यघटना
सुगावा प्रकाशन, पुणे
16. डॉ. वाघमारे बी.एस.- मानवविकास संसाधन व मानवाधिकार
पिअरसन प्रकाशन, नवी दिल्ली
17. डॉ. भोळे भा.ल. - भारताचे शासन आणि राजकारण
पिंपळापुरे आणि कंपनी पब्लीशर्स, नागपुर
18. प्राचार्य डॉ. देवरे पी.डी.- संपादक मानवाधिकार - 2005
19. कुलकर्णी बी.वाय - भारतीय राजकीय विचारवंत

विद्याभारती प्रकाशन, लातुर

20. बाचल वि.मा. - भारतीय गणराज्य
सुविचार प्रकाशन, पुणे - 30

21. पंडित माया - महाराष्ट्र सरकारचे महिला धोरण 1994
प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी

22. डॉ. आगलावे प्रदिप- भारतीय समाज संरचना आणि समस्या
साईनाथ प्रकाशन, नागपूर

23. प्रा. देशमुख भाऊराव- भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन
मंगेश प्रकाशन, नागपूर

24. प्रा. देशमुख बी.टी.- भारतीय संविधान
विद्या प्रकाशन, नागपूर

25. डॉ. कटारिया सुरेंद्र - मानवाधिकार समाज एवंम पुलीस
किताब महल, कानपूर

26. डॉ. भोगले शांताराम - भारतीय राष्ट्रीय आंदोलन आणि घटनात्मक विकास
विद्या प्रकाशन, नागपूर

27. मुळीक आर.जी. - भारतीय शासन
प्लॉट नं. 5, साई प्रतिभा अपार्टमेंट जवळ 613 वसंत नगर, सांगली

28. देशमुख बी.टी. - भारतीय संविधान
पिंपळापुरे पब्लीशस, नागपूर

29. प्रा. पाटील बी.बी. - भारतीय शासन
फडके प्रकाशन, कोल्हापूर

30. डॉ. देवरे पी.डी. डॉ. एम.एम. विसपपुते - भारतीय लोकशाही गणराज्य डॉ. निकम डी.एस. प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव

31. डॉ. पवार प्रमोद, डॉ. सौ. राठी शुभांगी – भारतीयलोकशाही गणराज्य, वृंदा पब्लीकेशन्स, जळगाव
32. फाडीया बी.एल. - राजनिती विज्ञान - प्रतियोगिता साहित्य प्रकाशन, आग्रा 2008
33. मुख्य संपादक निता प्रसाद - योजना, 26 नोव्हेंबर, 2009 - ग्रामीण आर्थिक विकासात महिला बचत गटाची भुमिका व महत्व - डॉ. अनिल शिंदे
34. संपादक वी. रमणी यशदा - यशमंथन, जुलै सप्टे. 2009 - महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता बचत गट सद्यस्थिती - डॉ. रफिक मुलानी
35. लोकराज्य मासिक मार्च 2008, महाराष्ट्र शासन, मुंबई
36. डॉ. चौसाळकर अशोक - तेरावी लोकसभा निवडणूक, प्रबोधन प्रकाशन 1999
37. योजना मासिक - ऑक्टोबर 2008
38. दै. आपला महाराष्ट्र
39. पाटील बी. बी. - भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापुर, तृतीय आवृत्ती 2006
40. फाडीया बी.एल. - राजनिती विज्ञान - प्रतियोगिता साहित्य प्रकाशन, आग्रा 2008
41. मुख्य संपादक निता प्रसाद, योजना, 26 नोव्हे-2009, ग्रामीण आर्थिक विकासात महिला बचत गटाची भुमिका व महत्व - डॉ. सुनिल शिंदे
42. संपादक वी रमणी यशदा - यशमंथन, जुलै - सप्टे 2009 महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता बचत गट सद्यस्थिती - डॉ. रफिक मुलानी
43. श्री. टी.एफ. ठेकेकरा, व्यवस्थापकीय संचालक, माविम, "सहयोगिनी" माविम, मुंबई - 2008

44. डॉ. आहेडवाड ल.जा. स्वयंसहाय्यता समुह कार्यक्रम मार्गदशक हस्तपुस्तिका सोसायटी फॉर ॲक्शन इन क्रियेटीव्ह एज्युकेशन ॲन्ड डेव्हलपमेंट, औरंगाबाद - 2005
45. श्री. वौद्य मोहन - 'महिला बचत गट हस्तपुस्तिका' विश्व प्रकाशन, पुणे - 2005
46. मुलाणी एम.यु. - 'महिला स्वयंसहाय्यता बचत गट', डायमंड पब्लिकेशन, पुणे
47. लोकराज्य मासिक मार्च 2008, महाराष्ट्र शासन, मुंबई
48. लोकराज्य - ऑगस्ट 2009, महाराष्ट्र शासन, मुंबई
49. लोकराज्य - नोव्हे 2009 महाराष्ट्र शासन, मुंबई
50. सत्याग्रही - सप्तश्री कुमार
51. केसरी दिवाळी अंक, पुणे
52. नवभारत - संपादक, भावे श्री.मा.
53. प्रबोधन प्रकाशन - संपादक, भटकळ रामदस
54. फाडीया बी.एल. -राजनिती विज्ञान प्रतियोगीता साहित्य प्रकाशन, आग्रा 2018
55. गुप्ता कमलेश कुमार - महिला सशक्तीकरा बुक एनक्लेव्ह, जयपुर
56. ॲड. मुजुमदार आरती - महिला सबलीकरण आणि कायदे दै. देशदूत वृततपत्र दि. 21/10/2018
57. पाटील वा.भा. - पंचायतराज प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव
58. राणे रेश्मा मलकापुर - स्त्री सक्षमीकरण हि एक काळाची गरज (जागतिक महिला दिन 8 मार्च 2015) reshurane.blogspot.com
59. श्री. वौद्य मोहन - महिला बचत गट हस्तपुस्तिका विश्व प्रकाशन, पुणे 2005
60. मुलानी एम.यु. - महिला स्वयंसहायता बचत गट

डायमंड पब्लिकेशन, पुणे

61. पाटील भारती - स्त्रियांचा सत्तेतील सहभाग सबलीकरणाच्या प्रक्रियेत महत्वाचा टप्पा प्रबोधन प्रकाशन समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, कोल्हापूर
62. बाणखेळे प्रगती - बचतगट आत्मसन्मानांची पाऊलवाट लोकराज्य मासिक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र, मुंबई
63. डॉ. पाटील वा.भा. - पंचायतराज प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव
64. डॉ. जोशी श्रीनिवास - स्वयंसहाय्य चळवळ दै. आपला महाराष्ट्र दि. 08/03/2012
65. भारतीय संविधान - भारत सरकार
66. भारतीय पंचायत राज्यव्यवस्था - डॉ. वा.भा. पाटील
67. स्पर्धा परीक्षा - आनंद पाटील
68. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण - डॉ. भा.ल. भोळे
69. महाराष्ट्रातील पंचायत राज - दि.रा. पाटील
70. पंचायतराज आणि सामुहिक विकास - डॉ. श.गो. देवगांवकर
71. जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वशासन - डॉ. सतिश ठोंबरे
72. पंचायतराज व ग्रामीण विकास - डॉ. श्रीनाथ शर्मा
73. मुळीक आर.जी. - भारतीय शासन
74. देशमुख बी.टी. - भारतीय संविधान पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर
75. डॉ. जोशी सुधाकर - भारतीय शासन आणि राजकारण
76. प्रा. चोपडे किसन विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद
77. प्राचार्य डॉ, देवरे पी.डी. - भारतीय लोकशाही गणराज्य प्राचार्य डॉ. विसपुते एस.एम. प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव
78. डॉ. पवार प्रमोद - भारतीय लोकशाही गणराज्य
79. डॉ. सौ. राठी शुभांगी - वृंदा पब्लीकेशन्स, जळगाव

80. जाधव शिलानाथ - आपले हक्क व त्यांची परिपुर्ती य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक
81. डॉ. भोंडे दिनेश - सामाजिक शास्त्रांचा अधिष्ठान अभ्यासक्रम य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक
82. जाधव शिलानाथ - भारतीय राजकारण प्रक्रीया य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक
83. संपा. डॉ. झाल्टे दंगल - ग्रामीण महिला और बालविकास राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था, हैद्राबाद - 30
84. गपांग गिरीधर - अनुसुचित जाती और अनुसुचित जनजाती संवैधानिक उपबंध, हिमालय प्रकाशन हाऊस, मुंबई - 4
85. भारतीय संविधान - मराठी आवृत्ती 1992
86. प्रा. क्षीरसागर श्री.के. - स्त्री जीवन आणि विवाह विषयक लेखसंग्रह, महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि सांस्कृतिक मंदीर, मुंबई
87. बाचल वि.म. भारतीय गणराज्य - सुविचार प्रकाशन, पुणे - 30
88. युनोचे घोषणापत्र - 1948
89. महाराष्ट्र सरकारचे माहिती धोरण 1994 (प्रा. माया पंडीत यांचा लेख) प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी
90. डॉ. गुरुनाथ नाडगेडी - भारतीय आदिवासी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे
91. डॉ. काळदाते सुधा - भारतातील सामाजिक समस्या, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
92. भारंबे नंदकुमार - मानवी हक्क व समाज, निराली प्रकाशन, पुणे
93. 1. डॉ. राठी शुभांगी - भारतीय संविधानाची ओळख अथर्व पब्लीकेशन्स, जळगाव
94. जाधव शिलानाथ - भारतातील राजकारण प्रक्रिया यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

95. ड ॉ. पाटील वा.भा. - पंचायतराज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव
96. डॉ. जोशी श्रीनिवास - स्वयंसहाय्य चळवळ, दै. आपला महाराष्ट्र दि. 08/03/2012
97. श्री. वैद्य मोहन - महिला बचत गट हस्तपुस्तिका, विश्वप्रकाशन, पुणे - 2005
98. सिंघल विनिता - सन्मान आणि समान वागणूक
99. लोकराज्य मासिक, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, महाराष्ट्र मुंबई मार्च 2017
100. मुख्य संपादक प्रसाद निता - योजना, ग्रामीण आर्थिक विकासात महिला बचत गटांची भूमीका व महत्व डॉ. सुनिल शिंदे
101. संपादक वी रमणी यशदा - यशमंथन, जुलै सप्टें 2009, महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता बचतगट सद्यस्थिती - डॉ. रफीक मुलानी
102. श्री. वैद्य मोहन - महिला बचत गट हस्तपुस्तीका विश्व प्रकाशन पुणे 2005
103. मुलानी एम.यु. - महिला स्वयंसहाय्यता बचत गट, डायमंड पब्लीकेशन, पुणे
104. पाटील जगन्नाथ - महिला आर्थिक विकास मंडळाच्या बचत गटांची विकासात भरारी, दै. आपला महाराष्ट्र दि. 27/02/2012
105. डॉ. जोशी श्रीनिवास - स्वयंसहाय्य चळवळ, दै. आपला महाराष्ट्र दि. 08/03/2012
106. राजपूत धोडीरामसिंह - बचत गट (महिला सक्षमीकरणाचे प्रभावी माध्यम), दै. गावकरी 08/03/2011

लेखक परिचय :



डॉ. संभाजी संतोष पाटील

(एम.ए., बी.एड., एम.फील., पीएच.डी.)

राज्यशास्त्र विभाग : श्री.शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब ना.स.पाटील साहित्य व मु.फि.मु.अ.वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे (महाराष्ट्र)

ग्रंथ : 15

सहसचिव : महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद

सचिव : खान्देश राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद

सहा.संपादक : विचारमंथन संशोधन पत्रिका

केंद्रसंयोजक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, शिंदखेडा.

मा.आध्यक्ष : ओ.बी.सी. सेवा संघ, धुळे.

समन्वय : स्पर्धा परिक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र. श्री.शि.वि.प्र.संस्थेचे महाविद्यालय, धुळे.

पुरस्कार : 1.गुरूगौरव पुरस्कार (2017)
2.गौरव गुरूवर्यांचा पुरस्कार - दिव्य मराठी (2021)

- राष्ट्रीय राज्य विभागीय परिषदा व चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन व व्याख्याने.
- वर्तमानपत्र व नियतकालीकातून अनेक लेख प्रसिध्द.
- विविध विषयांवर प्रभावी व्याख्याने.
- विविध जनप्रबोधनात्मक जनजागृती रॅलींचे अयोजन.

KRIPA DRISHTI PUBLICATIONS

Kripa-Drishti Publications
A-503 Poorva Heights, Pashan-Sus Road, Near Sai Chowk,
Pune – 411021, Maharashtra, India.
Mob: +91 8007068686
Email: editor@kdpublications.in
Web: https://www.kdpublications.in

ISBN: 978-93-90847-09-9